इचलकरंजी R.N.I. Regi. No. 63119/94 ■ पोस्टल रजि.नं. KLR/78/2024-2026 ■ अंक -१६३ ■ वर्ष - ४२

राष्ट्रीय विचाराचे एकमेव निर्भिड दैनिक

# महासत्ता

कोल्हापूर - सांगली - सातारा - बेळगांव

श्री मात्रे नमः।।



श्रीमाता चंद्रघंटा

ॐ पिण्डज प्रवरारुढ
चण्डकोपास्त्रकैर्युता ।
प्रसादं तनुते मध्यं
चन्द्रघण्टेति विश्रुता ।।

नवरात्र उत्सवाच्या हार्दिक शुभेच्छा!

मंगळवार,ता. १३ ऑक्टोबर २०२६ ● अश्विन शु. ३ ● www.emahasatta.com ● mahasatta@gmail.com ● पाने १२ ● किंमत ५ रूपये

नवदुर्गामधील तृतीय दुर्गा चंद्रघंटा माता आहे. चंद्रघंटा मातेचे शरीर स्वर्ण क्रांती सम असून दहा भुजांमध्ये खड्ग बाण आदि विविध आयुधे धारण केली आहेत. चंद्रघंटा मातेच्या मस्तकावर घंटेच्या आकारात अर्धचंद्र आहे. त्यामुळे त्यांना चंद्रघंटा हे नाव मिळाले. स्त्री जीवनातील तारुण्य अवस्थेमध्ये स्त्री विवाह योग्य होते. त्यावेळेस तिच्यामध्ये असणारे चैतन्य व संस्कार तिचे वैवाहिक जीवन सक्षम बनवतात. ह्याच अवस्थेला चंद्रघंटा म्हणले आहे.



कोल्हापूर-श्री अंबाबाईची सर्वस्याद्यादेवी रुपात बांधण्यात आलेली अंलकार पूजा.

## गोकुळ निवडणुकीत पाच रंगांच्या मतपत्रिका

### ३५ मतदान केंद्रांसाठी ४० पथके सज्ज

■ कोल्हापूर,ता.१२(प्रतिनिधी)-

गोकुळ दूध संघाच्या निवडणुकीसाठी मतदान प्रक्रिया सुरळीत पार पाडण्याच्या दृष्टीने प्रशासनाने तयारीला गती दिली आहे. रमणमळा येथील शासकीय बहुद्देशीय सभागृहात सोमवारी मतदान कर्मचाऱ्यांचे दुसरे प्रशिक्षण घेण्यात आले. या निवडणुकीत पाच प्रवर्गांसाठी पाच वेगवेगळ्या रंगांच्या मतपत्रिका वापरण्यात येणार आहेत.

सर्वसाधारण प्रवर्गासाठी पांढरी, महिला राखीव प्रवर्गासाठी गुलाबी, इतर मागास प्रवर्गासाठी फिकट हिरवी, अनुसूचित जाती-जमाती प्रवर्गासाठी फिकट निळी आणि विशेष मागास (पान २ वर)

## ज्ञानेश कुमारांविरोधात याचिका

### आज सुनावणी ; विरोधकांचा मोर्चा

■ नवी दिल्ली,ता.१२-

मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार आणि मतदार याद्यांच्या विशेष सखोल पुनरावलोकना (एसआयआर) विरोधात निषेध व्यक्त करत, विरोधी पक्ष इंडी अलायन्सचे खासदार आणि नेत्यांनी सर्वोच्च न्यायालयाकडे मोर्चा काढला. याप्रसंगी घोषणा केल्याप्रमाणे काँग्रेस नेते राहुल गांधी आणि इंडीया आघाडीतील अन्य नेत्यांनी मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्याविरोधात सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल केली आहे. या याचिकेत राहुल गांधी हे प्रमुख याचिकाकर्ते आहेत. त्यांच्या समवेत विरोधी पक्षातील अन्य नेत्यांचाही याचिकाकर्त्यांमध्ये समावेश आहे.

भारताचे सरन्यायमूर्ती सूर्यकांत यांनी विरोधी पक्षाच्या नेत्यांना भेटण्यास नकार देऊन न्यायालयात याचिका दाखल करण्याचा सल्ला दिल्यानंतर काही तासांतच हा घटनाक्रम घडला. त्यानंतर 'इंडिया' आघाडीच्या सर्वोच्च न्यायालयापर्यंतच्या (पान २ वर)



इंडिया आघाडीने सर्वोच्च न्यायालयाकडे मोर्चा काढला त्याचे छायाचित्र.

### न्यायालयाचे दरवाजे सर्वांसाठी खुले

विरोधी पक्षाच्या नेत्यांनी रविवारी मोर्चानंतर सरन्यायाधीश सूर्य कांत यांची भेट घेण्यासाठी वेळ मागितली होती. मात्र, आपण भेटू शकणार नसल्याची कारणे नमूद करून त्याला रविवारी रात्रीच उत्तर दिले होते. त्याचबरोबर संबंधित मुद्द्यांवर न्यायालयात याचिका दाखल करण्यास सांगितले होते. ते म्हणाले की, सर्वोच्च न्यायालयाचे दरवाजे सर्वांसाठी खुले आहेत. आम्ही त्यांच्या समस्या ऐकून घेऊ आणि कायद्यानुसार योग्य ती कार्यवाही करू. तेव्हा मुख्य निवडणूक आयुक्तांविरोधातील विरोधकांच्या भूमिकेकडे आणि न्यायालयातील पुढील कार्यवाहीकडे राजकीय वर्तुळाचे लक्ष लागले आहे

## एमपीएससी विद्यार्थ्यांचे आंदोलन स्थगित

### चौकशी समिती सचिवपदी तुकाराम मुंढे

### आयोगाचे अध्यक्ष भीमनवार सक्तीच्या रजेवर

■ मुंबई/पुणे,ता.१२-

महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या कारभाराविरोधात पुण्यात सुरू असलेले विद्यार्थ्यांचे आंदोलन रविवारी मध्यरात्री स्थगित करण्यात आले.

सरकारकडून प्रमुख मागण्यांवर सकारात्मक निर्णय घेण्यात आल्यानंतर विद्यार्थ्यांनी हा निर्णय घेतला. दरम्यान या प्रकरणाच्या चौकशीसाठी पाचसदस्यीय समिती स्थापन करण्यात आली असून, आयोगाचे अध्यक्ष विवेक भीमनवार यांना चौकशी पूर्ण होईपर्यंत सक्तीच्या रजेवर पाठवण्यात आले आहे. तसेच या समितीचे सचिव म्हणून तुकाराम मुंढे यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

मंत्री शिवेंद्रराजे भोसले यांनी माध्यमांशी बोलताना सांगितले की, विद्यार्थ्यांच्या मागण्यांसाठी मुख्यमंत्री सकारात्मक आहेत, यापुढे तुकाराम मुंढे हे एमपीएससीच्या चौकशी समितीचे सचिव म्हणून काम पाहतील.एमपीएससी संदर्भात आपल्या (पान २ वर)

### || दुःखद निधन ||



**श्री. राजेंद्र श्रीपती पाटील**

आमचे ज्येष्ठ बंधू राजेंद्र श्रीपती पाटील यांचे दि. १२ रोजी आकस्मिक निधन झाले. ईश्वर त्यांच्या आत्म्यास चिरशांती देवो हिच प्रार्थना!

**पाटील परिवार**
इचलकरंजी.

रक्षाविसर्जन : बुधवारी सकाळी ९ वाजता पंचगंगातिरी, इचलकरंजी.




विनम्र आदरांजली !

माणसं जोडायची,
त्यांना आधार द्यायचा,
सुख-दुःखात जवळीक ठेवायची,
कायम मदतीची ओंजळ
सदैव इतरांसाठी मुक्त ठेवायची...
स्वतःबरोबर इतरांचेही
आयुष्य चांगले घडवायचे......

अशा विचारांचे
एक दानशूर
व्यक्तीमत्व हरपले....

भाईंची
प्रेरणा
एक
आठवण

स्वर्गीय कुंतीलालजी
मांगीलालजी पाटणी
जन्म : दि. 26/11/1941 | मृत्यू : दि. 02/10/2026

सप्रेम नमस्कार.... जय जिनेंद्र,
अत्यंत दुःख वियोगाने कळविण्यात येते की,
आमच्या परिवारातील प्रिय व आदरणीय
श्री. कुंतीलालजी पाटणी (भाईसाहब) यांचे
शुक्रवार, दि. 2 ऑक्टोबर 2026
रोजी दुःखद निधन झाले.

त्यांच्या पवित्र स्मृतीस विनम्र अभिवादन
करण्यासाठी आयोजित केलेल्या कार्यक्रमास
आपण सहकुटुंब उपस्थित राहून दिवंगत आत्म्यास
भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करावी, ही नम्र विनंती.

आपली उपस्थिती हीच त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली ठरेल.

मंगळवार, दि. 13 ऑक्टोबर 2026

णमोकार महामंत्र एवं श्रद्धांजली
संध्याकाळी 7.30 वाजल्यापासून
अग्रसेन भवन



शोकाकुल
पाटणी कन्स्ट्रक्शन,
इचलकरंजी.

# श्री अंबाबाईची सर्वस्याद्यादेवी रुपातील अंलकार पूजा

**कोल्हापूर,ता.१२(प्रतिनिधी)–**

**सोमवार आश्विन शुद्ध द्वितिया पराभवनाम सवत्सर शके १९४८ सोमवारी करवीर निवासिनी श्री अंबाबाई (महालक्ष्मी) देवीची सर्वस्याद्यादेवी रुपातील अंलकार पूजा बांधण्यात आली आहे. ही पूजा अजिंक्य मुनिश्वर, वेदांग मुनिश्वर, सोहम मुनिश्वर आणि रवी माईणकर यांनी बांधली.**

शारदीय नवरात्रोत्सवाच्या पार्श्वभूमीवर मंदिर व परिसरात साडेतीन शक्तिपीठांपैकी एक असणाऱ्या करवीरनिवासिनी श्री अंबाबाईच्या दर्शनासाठी भाविकांनी मोठी गर्दी केली आहे. मात्र नवरात्रौत्सवाच्या दुसऱ्या दिवशी म्हणजे सोमवारी मंदिरात श्रीपूजक आणि पश्चिम महाराष्ट्र देवस्थान समिती, पोलिस यांच्यात काहीसा वाद झाला. धार्मिक कार्यात अडथळा आणून आपला अपमान केल्याचा गंभीर आरोप श्रीपुजकांनी केला आहे. त्यामुळे संतप्त श्रीपुजकांनी थेट मंदिराच्या गाभाऱ्यातच आंदोलन सुरू केले. प्रशासनाच्या भूमिकेबद्दल तीव्र संताप व्यक्त करत पूजकांनी धार्मिक कार्यामध्ये असा हस्तक्षेप सहन केला जाणार नाही अशी आक्रमक भूमिका घेतल्यामुळे काहीकाळ तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. मात्र परिस्थितीचे गांभीर्य ओळखून मंदिर प्रशासनाने लावलेले बॅरिकेटस तात्काळ हटविल्याने परिस्थिती पूर्ववत झाली.

# गोकुळ निवडणुकीत पाच रंगांच्या मतपत्रिका

(पान १ वरून)

प्रवर्गासाठी फिकट पिवळी मतपत्रिका निश्चित करण्यात आली आहे. मतदानावेळी प्रवर्गानुसार मतपत्रिकांचा वापर कसा करायचा, याची माहिती कर्मचाऱ्यांना देण्यात आली.

निवडणूक निर्णय अधिकारी मोसमी चौगुले यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी युसुफ शेख यांनी मतदान प्रक्रियेचे प्रात्यक्षिक दाखविले. मतपत्रिकेची योग्य घडी घालणे, मतदानानंतर मतपेटी सुरक्षितपणे सील करणे आणि निर्धारित पद्धतीने संपूर्ण प्रक्रिया पूर्ण करण्याबाबत सूचना देण्यात आल्या.

निवडणुकीसाठी जिल्ह्यातील ३५ मतदान केंद्रांवर राखीव पथकांसह एकूण ४० पथके नियुक्त केली आहेत. प्रत्येक पथकात एक केंद्राध्यक्ष आणि सहा मतदान अधिकारी असतील. या कामासाठी एकूण २८० अधिकारी तसेच जिल्ह्यातील १२ तालुक्यांतील क्षेत्रीय अधिकाऱ्यांना प्रशिक्षण देण्यात आले. मतदान केंद्रांवरील जबाबदाऱ्या, मतपत्रिकांचे व्यवस्थापन आणि मतपेट्या हाताळण्याबाबत कर्मचाऱ्यांना मार्गदर्शन करण्यात आले.

१८ ऑक्टोबर रोजी सकाळी आठ ते सायंकाळी पाच या वेळेत मतदान होणार आहे. प्रत्येक तालुक्याच्या ठिकाणी मतदानाची व्यवस्था केली आहे. मतदान संपल्यानंतर सर्व मतपेट्या रमणमळा येथील शासकीय बहुद्देशीय सभागृहात आणण्यात येणार आहेत. चंदगड, आजरा आणि गडहिंग्लज या दूरच्या तालुक्यांतील मतपेट्या रमणमळ्यात पोहोचण्यास रात्री नऊ वाजेपर्यंत वेळ लागू शकतो.

# एमपीएससी विद्यार्थ्यांचे आंदोलन स्थगित

(पान १ वरून)

विविध मागण्यांसाठी विद्यार्थ्यांनी गेल्या ११ दिवसांपासून पुण्यामध्ये आंदोलन सुरू केले होते. महाराष्ट्र लोकसेवा आयोगाचे अध्यक्ष विवेक भीमनवार यांचा राजीनामा घ्यावा, ही त्यामधील प्रमुख मागणी आहे. रोहित पवारांच्या नेतृत्वाखाली हे आंदोलन सुरू होते. दरम्यान सरकारसोबत झालेल्या चर्चेनंतर विद्यार्थ्यांनी आता हे आंदोलन मागे घ्यावे, यासाठी मंत्री शिवेंद्रराजेंनी रोहित पवार आणि आंदोलकांची भेट घेतली. यावेळी शिवेंद्रराजेंनी सरकारने मान्य केलेल्या मागण्यांचा मसुदा हा रोहित पवारांकडे सुपूर्द केला.

आंदोलकांनी विवेक भीमनवार यांच्या राजीनाम्याची मागणी केली होती. मात्र, सरकारने त्यांना चौकशी पूर्ण होईपर्यंत सक्तीच्या रजेवर ठेवण्याचा निर्णय घेतला. चौकशी पूर्ण होईपर्यंत पदावर कार्यरत न राहता रजेवर जाण्याचा निर्णय घेतल्याचे विवेक भीमनवार यांनी सांगितले. आयोगाची स्वायत्तता, विश्वासार्हता आणि विद्यार्थ्यांचे हित यांना आपण नेहमीच प्राधान्य दिले असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. आंदोलनादरम्यान विद्यार्थ्यांवर दाखल झालेली प्रकरणे मागे घेण्याबाबतही आश्वासन देण्यात आले आहे.

**दिलीप भोसले यांच्या अध्यक्षतेखाली समिती**

एमपीएससीशी संबंधित प्रकरणाची सखोल चौकशी करण्यासाठी दिलीप भोसले यांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमण्यात आली आहे. या समितीचे सचिव म्हणून तुकाराम मुंढे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. समितीला चौकशीसाठी दोन महिन्यांचा कालावधी देण्यात आला आहे. आयोगातील आजी-माजी अध्यक्षांसह इतर संबंधित अधिकारी आणि कर्मचाऱ्यांच्या भूमिकेचीही तपासणी केली जाणार आहे.

याशिवाय पुढील तीन वर्षांत ७० हजार रिक्त पदे भरण्याचे आश्वासन सरकारने दिले आहे. पोलीस भरतीसाठी एकच अभ्यासक्रम ठेवण्याबाबतही सहमती दर्शवण्यात आली आहे. आता चौकशी समितीच्या अहवालाकडे आणि सरकारकडून दिलेल्या आश्वासनांच्या अंमलबजावणीकडे एमपीएससी विद्यार्थ्यांचे लक्ष लागले आहे.

# ज्ञानेश कुमारांविरोधात याचिका दाखल

(पान १ वरून)

मोर्चात हजारो काँग्रेस समर्थक सहभागी झाले. राहुल गांधी आणि प्रियंका गांधी यांनी या मोर्चाचे नेतृत्व केले. मोठ्या गर्दीमुळे राहुल गांधी निर्धारित वेळेत सर्वोच्च न्यायालयात पोहोचू शकले नाहीत. त्यांना सायंकाळी ४.३० वाजेपर्यंत न्यायालयात पोहोचायचे होते. त्यामुळे त्यांचे वकील एस. प्रसन्ना यांनी त्यांच्या वतीने याचिका दाखल केली.

या याचिकेत राहुल गांधी, काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे, सौगत रॉय, अखिलेश यादव, तेजस्वी यादव, संजय राऊत, एम. ए. बेबी, डी. राजा, महुआ माझी, सुप्रिया सुळे आणि ई. टी. मोहम्मद बशीर यांचा समावेश आहे.याचिका दाखल करण्यापूर्वी राहुल गांधी आणि 'इंडिया' आघाडीच्या नेत्यांनी सर्वोच्च न्यायालयापर्यंत मोर्चा काढला. या मोर्चात काँग्रेस आणि राष्ट्रीय जनता दलाचे नेते, समाजवादी पक्षाचे प्रमुख अखिलेश यादव तसेच विविध पक्षांचे कार्यकर्ते मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. विद्यार्थी संघटनांचे प्रतिनिधी आणि वकीलही या मोर्चात सहभागी झाले.

राहुल गांधी, प्रियंका गांधी, काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे आणि 'इंडीया' आघाडीचे अन्य नेते बसने कॉन्स्टिट्यूशन क्लब येथे एकत्र आले. तेथून त्यांनी सर्वोच्च न्यायालयाच्या दिशेने मोर्चाला सुरुवात केली. काही विरोधी पक्षांचे नेते ट्रकमधूनही मोर्चात सहभागी झाले. या ट्रकमध्ये राहुल गांधी यांच्यासोबत तेजस्वी यादव, अखिलेश यादव, तेलंगणाचे मुख्यमंत्री रेवंत रेड्डी, दीपेंद्र हुड्डा आणि आघाडीचे अन्य नेते उपस्थित होते. राहुल गांधी आणि प्रियंका गांधी यांनी समर्थकांसह मोर्चात सहभाग घेतला.

# ज्येष्ठ अभिनेत्री मधू कांबीकर यांचे निधन

■ पुणे,ता.१२–



**मराठी लोककला आणि चित्रपटसृष्टीत आपल्या अभिनयाचा ठसा उमटवणाऱ्या ज्येष्ठ अभिनेत्री आणि लावणी कलावंत मधू कांबीकर यांचे पुण्यात दीर्घ आजाराने निधन झाले. त्या ७३ वर्षांच्या होत्या. त्यांच्या निधनाची माहिती सुनेने दिली.**

गेल्या काही वर्षांपासून त्या अंथरुणाला खिळून होत्या. रंगमंचावर लावणी सादर करत असताना अचानक त्यांची प्रकृती बिघडली होती. त्यानंतर त्यांना पक्षाघाताचा झटका आला होता. लावणी, लोकनाट्य, नाटक आणि चित्रपट अशा विविध माध्यमांतून त्यांनी आपल्या अभिनयाची आणि नृत्यकलेची वेगळी ओळख निर्माण केली. ग्रामीण महाराष्ट्रातील लोककलेला व्यापक व्यासपीठ मिळवून देण्यात त्यांचे महत्त्वपूर्ण योगदान राहिले. प्रतिकूल परिस्थितीवर मात करत त्यांनी कलाक्षेत्रात स्वतःचे स्थान निर्माण केले होते.

# आम.पडळकरांच्या वैध उमेदवारीवर आज सुनावणी

**सांगली, ता.१२(प्रतिनिधी)–**

**जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या निवडणुकीतील जत अ सोसायटी गटातून आम.गोपीचंद पडळकर यांचा उमेदवारी अर्ज वैध निर्णयाला माजी आमदार विक्रमसिंह सावंत व बाजार समितीचे माजी सभापती सुजय शिंदे यांनी कोल्हापूर सर्किट बेंचमध्ये आव्हान दिले आहे. या याचिकेवर मंगळवारी सुनावणी होत आहे, त्यामुळे खंडपीठ निर्णय देणार की पुढील तारीख मिळणार याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.**

जिल्हा बँकेच्या निवडणुकीच्या अर्जासोबत आ. पडळकरांनी जोडलेल्या कुणीकोन्नूर सर्वसेवा सहकारी सोसायटीच्या सभासदत्वावर आणि निंबवडे ग्रामीण बिगरशेती पतसंस्थेतील संचालकपदाच्या अनुभवावर याचिकाकर्त्यांनी आक्षेप घेतला आहे.

आठवे पुण्यस्मरण



" शिक्षण हेच खरे सामर्थ्य आणि शिक्षणातूनच समाजाचा सर्वांगीण विकास "

शिक्षण महर्षी
विकास शिक्षण प्रसारक मंडळाचे संस्थापक
कै. इराप्पा आप्पू चौगुले (आण्णा)
यांच्या आठव्या स्मृती दिनास
विनम्र अभिवादन..!

श्रीमती फुलाबाई चौगुले, श्री. विकास चौगुले - अध्यक्ष, सौ. स्मिता चौगुले
श्री. अमित पाटील, श्री. दत्ता देसाई, श्री. शिवानंद टावळ, श्री. अतुल अंबी, श्री. विक्रम कनवाडे,
सौ. सपना मेळवंकी (मुख्याध्यापिका), श्री.यश चौगुले, श्री. प्रेम चौगुले, सर्व संचालक, मार्गदर्शक

भावपूर्ण श्रध्दांजली!



श्री. राजेंद्र श्रीपती पाटील
आमचे परममित्र श्री. राजेंद्र श्रीपती पाटील यांचे सोमवार, दि.१२/१०/२०२६ रोजी आकस्मिक निधन झाले. त्यांच्या आत्म्यास शांती लाभो, हिच ईश्वरचरणी प्रार्थना!

तात्यासाहेब बाळीसा गतारे
जयसिंगपूर

* रक्षाविसर्जन : बुधवार, दि. १४/१०/२०२६ रोजी सकाळी ८.३० वा. पंचगंगा नदीतीरी, इचलकरंजी

॥ भावपूर्ण श्रध्दांजली ॥



श्री. कुंतीलालजी मांगीलालजी पाटणी (भाई साहब)
आमचे परममित्र श्री. नितेश कुंतीलालजी पाटणी यांचे वडिल, श्री. कुंतीलालजी मांगीलालजी पाटणी (भाई साहब) यांचे शुक्रवार, दि. २/१०/२०२६ रोजी दुःखद निधन झाले. त्यांच्या आत्म्यास चिरशांती लाभो हिच ईश्वरचरणी प्रार्थना..!

बिरदेव टाईल्स सोल्युशन, शिरोली

॥ भावपूर्ण श्रध्दांजली ॥



आमचे आधारस्तंभ, श्री. कुंतीलालजी मांगीलालजी पाटणी (भाई साहब) यांचे शुक्रवार, दि. २/१०/२०२६ रोजी दुःखद निधन झाले. त्यांच्या आत्म्यास चिरशांती लाभो हिच ईश्वरचरणी प्रार्थना..!

श्री. कुंतीलालजी मांगीलालजी पाटणी (भाई साहब)

नवभारत पेंट्स, इचलकरंजी

विनम्र आदरांजली!

आमचे
आधारवड,
आमचे
परमस्नेही
स्वर्गीय कुंतीलालजी मांगीलालजी पाटणी (भाई साहब)
यांचे शुक्रवार, दि. २/१०/२०२६ रोजी दुःखद निधन झाले. त्यांच्या आत्म्यास चिरशांती लाभो हिच ईश्वरचरणी प्रार्थना ! त्यांच्या कुटुंबियावर कोसळलेल्या दुःखात आम्ही सहभागी आहोत!



स्वर्गीय कुंतीलालजी मांगीलालजी पाटणी (भाई साहब)

आदिनाथ माईन्स् कॅम, भिलवाडा

# ।। ऋ ण नि र्दे श ।।

## वस्त्रनगरीचे कुंतीभाई । सर्वजनांचे प्रियतमभाई ।।



## स्व. कुंतीलालजी मांगीलालजी पाटणी (भाई साहब)

जन्म : दि. 26/11/1941 । मृत्यू : दि. 02/10/2026

- इचलकरंजी नगरीच्या बांधकाम क्षेत्रातील विश्वसनीय नाव.
- इंदिरा गांधी मेमोरियल हॉस्पिटल, घोरपडे नाट्यगृह, कै. शंकरराव पुजारी जलतरण तलाव अशा इचलकरंजी शहराच्या सौंदर्यात भर घालणाऱ्या ऐतिहासिक वास्तुंचे स्थापत्यकार.
- आदिनाथ बँकेचे संस्थापक.
- कुंथुगिरी मठाचे कार्याध्यक्ष.
- दिगंबर जैन समाजाचे आधारस्तंभ.
- सदाचाराचे श्रावक शिरोमणी.
- उदार दातृत्व आणि सामाजिक कार्यात सदैव अग्रणी.
- राजस्थानी समाजाचे आघाडीचे नेतृत्व.
- राजस्थानी गो सेवा संघ - संस्थापक.
- बिल्डर्स असोसिएशन ऑफ इंडिया - आजीवन सदस्य.
- सर्वधर्म स्वभाव व सामाजिक बंधुत्वाचे पुरस्कर्ते.



प्रसादगृहाची भक्कम कामे ।
वास्तुंची बनली सुंदर धामे ।।

धर्मानुरागी हा नर ।
कुंथुगिरी शिल्पीले थोर ।।

समाजाशी नाते मंगळ ।
भेदाभेद भ्रम अमंगळ ।।

सर्वसामान्यांचे आप्त आधार ।
दीनदुबळ्यांसाठी मुक्तद्वार ।।

सर्वांठायी अपार प्रीती
म्हणूनी वाढली तुमची किर्ती ।।

मुनीसेवेचे व्रत आचरले ।
अवघे जीवन धन्य जाहले ।।

निखळला हा नभीचा तारा ।
कसे आवरावे या तिमिरा ।।

पप्पांच्या दु:खद निधनप्रसंगी अनेकांनी समक्ष, सोशल मिडिया आणि प्रसिद्धी माध्यमांद्वारे आपल्या सहवेदना व्यक्त केल्या... त्या भावनांचा आधार वाटला. त्या सर्वासर्वांचे आम्ही ऋणी आहोत!

# पाटणी परिवार

इचलकरंजी - अजमेर

संकल्पप्रसिद्धी/9850149098

महासत्ता सुविचार :- संघर्षाशिवाय यश नाही, झगडल्याशिवाय विजय नाही.

मंगळवार,ता.१३ ऑक्टोबर २०२६

■ संपादकीय ■

# अघोषित आणीबाणी ?

देशाचे मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या राजीनाम्यासाठी कॉक्रोच जनता पार्टी आणि इतर विरोधी पक्षांतर्फे पुकारण्यात आलेल्या आंदोलनाला दडपून टाकण्यासाठी केंद्रातील सरकारने जी पावले उचलली त्याचे वर्णन आणीबाणी सदृशस्थिती असेच करावे लागेल. पंतप्रधान नरेंद्र मोदी ज्या राजकीय पक्षाचे प्रतिनिधित्व करतात त्या भारतीय जनता पक्षाने यापूर्वी काँग्रेसच्या कारकिर्दीवर टीका करण्यासाठी नेहमीच काँग्रेस सरकारने लागू केलेल्या आणीबाणीवर टीका केली आहे. काँग्रेस सरकारने त्या काळात नागरिकांचे घटनात्मक अधिकार दडपून टाकून हुकूमशाही पद्धतीने कारभार केला अशा प्रकारची भाषणबाजी भाजपाच्या नेत्यांनी गेल्या कित्येक वर्षांपासून चालू ठेवली आहे. आता नवी दिल्लीमध्ये किंवा देशातील इतर राज्यांच्या राजधानीच्या शहरांमध्ये किंवा प्रमुख शहरांमध्ये आंदोलने होऊ नयेत म्हणून ज्या प्रकारे दडपशाहीची भूमिका घेण्यात येत आहे, त्याला 'आणीबाणी' हेच विशेषण लावणे योग्य ठरू शकेल. शांततेच्या मार्गाने आंदोलन करणे हा भारतीय संविधानाने भारतीय नागरिकांना दिलेला एक महत्त्वाचा असा मूलभूत हक्क आहे. आंदोलन करणाऱ्यांनी शांततेच्या मार्गाने आंदोलन करावे आणि सत्तेवर बसलेल्यांनी दडपशाही न करता आंदोलकांचे म्हणणे ऐकून घ्यावे हाच या घटनात्मक तरतुदीचा अर्थ आहे. असे असतानाही काही दिवसांपूर्वी कॉक्रोच जनता पार्टीने पेपरफुटीच्या प्रकरणाच्या निमित्ताने तेव्हाचे केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांचा राजीनामा घेण्यासाठी जे तीव्र आंदोलन केले होते, त्याचा अनुभव समोर असल्याने केंद्र सरकारने यावेळी कोणत्याही परिस्थितीत आंदोलन होऊ द्यायचे नाही अशी भूमिका घेतलेली दिसते. खरे तर मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्याबाबत जे विविध आक्षेप आहेत, त्यावर मोठ्या प्रमाणात चर्चा झाली आहे आणि त्यांच्या एकूण कार्यपद्धतीबाबत संशय घेण्यासारखी परिस्थितीसुद्धा आहे. असे असतानासुद्धा केंद्र सरकार त्यांच्या पाठीशी राहून त्यांना वाचवण्याचा प्रयत्न का करीत आहे हे समजत नाही. ज्ञानेश कुमार यांच्याऐवजी दुसरा कोणताही अधिकारी त्यांची जबाबदारी घेऊ शकतो. फक्त व्यक्ती बदलणार आहे. पण असे असूनही केवळ विरोधक किंवा आंदोलक यांना आपल्या वरचढ होऊ द्यायचे नाही या एकाच हेतूने अहंकाराच्या भूमिकेतून सरकारने ही ताठर भूमिका घेतलेली दिसते. शेवटी एखादा विषय मांडण्यासाठी जर काही राजकीय पक्ष किंवा सामाजिक संघटना आंदोलनाच्या निमित्ताने समोर येत असतील तर त्यांचा आवाज हुकूमशाही पद्धतीने दडपणे योग्य नव्हे. मागच्या आंदोलनावेळी जो पोलिसांचा लाठीमार झाला किंवा तथाकथित पॅलेट गनचा गोळीबार झाला, ते समोर असल्याने या आंदोलनानंतर सुद्धा अशा प्रकारची परिस्थिती निर्माण होऊ शकते आणि अमित शहा यांच्या नेतृत्वाखालील केंद्रीय गृह खात्याच्या कार्यक्षमतेबाबत आणि कार्यपद्धतीबाबत शंका व्यक्त केली जाऊ शकते अशी भीती असल्यानेही कदाचित हे आंदोलन दडपण्याचा आदेश निघाला असावा. मागच्या आंदोलनाचा अनुभव असतानाही केंद्र सरकार ज्ञानेश कुमार यांच्या राजीनाम्याचा विषय एवढा का ताणत आहे हे एक कळत नाही. धर्मेंद्र प्रधान यांचा राजीनामासुद्धा अगदी शेवटच्या क्षणी घेण्यात आला. यावेळीसुद्धा जर ज्ञानेश कुमार यांचा राजीनामा घेण्याशिवाय अन्य कोणताही पर्याय केंद्र सरकार समोर नसेल तर विनाकारण हा विषय ताणण्यातही काही अर्थ नाही. कारण जेवढा या निर्णयाला उशीर केला जाईल तेवढा सरकार आणि निवडणूक आयोग यांच्यातील संशयास्पद संबंधांना बळकटी मिळू शकेल. अशा प्रकारचे आंदोलन करून विनाकारण कोणत्याही व्यक्तीचा राजीनामा मागण्याची सवय देशातील आंदोलकांना लागेल अशा प्रकारचा युक्तिवादही आता केला जाऊ लागला आहे. पण एखाद्या व्यक्तीचा खरोखरच दोष नसेल तर त्याचा राजीनामा मागण्यासाठी आंदोलन करण्याची वेळ येत नाही आणि जर एखादी व्यक्ती दोषी असेल तरीसुद्धा आंदोलन करण्याची वेळ येऊ नये. सरकारने आपणहून कारवाई करून अशा व्यक्तींना बाजूला करायला हवे. सुदैवाने अशा प्रकारे राज्यकारभार चालू नसल्यानेच लोकांना आंदोलनाचे हत्यार उपसावे लागले आहे. विरोधी पक्ष आपले काम करत आहे. सामाजिक संघटनासुद्धा आपले काम करीत आहेत. गेल्या काही महिन्यांपासून देशाच्या विविध राज्यांमध्ये आणि विशेषतः राजधानी नवी दिल्लीत ज्या प्रकारे आंदोलनयुक्त वातावरण आहे, ते देशाला परवडणारे नाही. पण सरकारी पातळीवर काहीतरी चूक होत असल्यानेच आंदोलने करावी लागत आहेत हे लक्षात घेऊनच सरकारला आपली भूमिका ठरवावी लागणार आहे. आंदोलने दडपून काहीही होणार नाही उलट नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील सरकार अघोषित आणीबाणी जाहीर करून कारभार करत आहे, हाच ठपका सरकारवर लागणार आहे.

# मस्क यांची दबंगगिरी कशासाठी?

**एलॉन मस्क यांच्या स्टारलिंकला भारतीय बाजारपेठेत प्रवेश देण्याच्या प्रश्नाने आता तांत्रिक आणि व्यावसायिक चौकट ओलांडली आहे. मुकेश अंबानी यांच्या रिलायन्सशी असलेली स्पर्धा, राजकीय हस्तक्षेपाचे आरोप, राष्ट्रीय सुरक्षेच्या चिंता आणि उपग्रह स्पेक्ट्रमच्या वाटपावरून सुरू असलेला संघर्ष यामुळे या प्रकरणाला वेगळेच वळण मिळाले आहे. मात्र, दोन उद्योगपतींच्या संघर्षात देशाचे दूरसंचार धोरण ठरता कामा नये.**




भारतीय ग्राहकांचे हित, निकोप स्पर्धा आणि डिजिटल सार्वभौमत्व यांनाच प्राधान्य मिळाले पाहिजे. भारतातील दूरसंचार क्षेत्र ही जगातील सर्वाधिक वेगाने विस्तारलेली बाजारपेठ आहे. स्वस्त मोबाइल डेटा, वाढता इंटरनेट वापर आणि डिजिटल व्यवहारांच्या विस्तारामुळे या क्षेत्रातील व्यावसायिक संधी प्रचंड वाढल्या आहेत. आता उपग्रहांच्या साहाय्याने इंटरनेट सेवा पुरवण्याच्या नव्या तंत्रज्ञानामुळे या बाजारपेठेत आणखी एका स्पर्धेची सुरुवात होत आहे. जगातील सर्वाधिक चर्चेत असलेले उद्योगपती एलन मस्क यांच्या स्टारलिंकला भारतात व्यवसाय सुरू करायचा आहे. मात्र, या प्रवेशाभोवती निर्माण झालेला वाद केवळ परवानग्या किंवा तांत्रिक अटींपुरता राहिलेला नाही. रिलायन्स उद्योगसमूहाचे प्रमुख मुकेश अंबानी यांच्याविषयी मस्क यांनी केलेल्या कथित उपरोधिक टिप्पण्या आणि त्यावरून सुरू झालेल्या राजकीय आरोप-प्रत्यारोपांमुळे मूळ प्रश्न मागे पडण्याचा धोका निर्माण झाला आहे. भारतात कोणत्याही विदेशी कंपनीला व्यवसाय करण्याची संधी मिळाली पाहिजे, यात दुमत असण्याचे कारण नाही. मात्र, ती संधी समान नियमांच्या चौकटीतच मिळाली पाहिजे. भारतीय कंपनीला संरक्षण देण्यासाठी विदेशी स्पर्धकाची अडवणूक करणे जितके अयोग्य, तितकेच विदेशी गुंतवणूक आकर्षित करण्याच्या नावाखाली राष्ट्रीय सुरक्षेशी संबंधित अटी शिथिल करणेही चुकीचे. त्यामुळे या वादाकडे मस्क विरुद्ध अंबानी किंवा सरकार विरुद्ध विरोधक अशा मर्यादित दृष्टिकोनातून पाहणे गैर ठरेल.

उपग्रह इंटरनेट सेवा ही पारंपरिक मोबाईल इंटरनेटपेक्षा वेगळ्या तंत्रज्ञानावर आधारित आहे. पृथ्वीच्या कमी उंचीवरील कक्षेत फिरणाऱ्या उपग्रहांच्या जाळ्याद्वारे इंटरनेट सुविधा पुरवली जाते. दुर्गम डोंगराळ प्रदेश, सीमावर्ती गावे, समुद्रातील जहाजे आणि नैसर्गिक आपत्तीमुळे जमिनीवरील संपर्क व्यवस्था विस्कळीत झालेल्या भागांसाठी हे तंत्रज्ञान विशेष उपयोगी ठरू शकते. त्यामुळे भारतासारख्या विशाल आणि भौगोलिक विविधता असलेल्या देशात अशा सेवेला निश्चितच वाव आहे. मात्र, उपग्रह सेवांसाठी लागणाऱ्या स्पेक्ट्रमचे वाटप कोणत्या पद्धतीने करावे, यावरून उद्योगक्षेत्रात मतभेद राहिले आहेत. पारंपरिक दूरसंचार कंपन्यांनी स्पेक्ट्रमच्या लिलावाला महत्त्व दिले, तर उपग्रह सेवांच्या कंपन्यांनी प्रशासकीय पद्धतीने वाटप करण्याची भूमिका मांडली. या दोन पद्धतींमधील फरक केवळ प्रक्रियेचा नाही. स्पेक्ट्रम मिळवण्यासाठी लागणारा खर्च, बाजारपेठेत प्रवेश करण्याची क्षमता आणि भविष्यातील स्पर्धेचे स्वरूप यांवर त्याचे परिणाम होतात. सरकारने कोणतीही पद्धत स्वीकारली, तरी तिच्यामागील आर्थिक आणि तांत्रिक कारणे स्पष्ट असली पाहिजेत. स्पेक्ट्रम ही सार्वजनिक मालमत्ता असल्यामुळे त्याच्या वाटपातून काही मोजक्या कंपन्यांना अवाजवी फायदा मिळणार नाही, याची काळजी घेणे आवश्यक आहे. त्याचबरोबर नव्या कंपन्यांच्या प्रवेशासाठी अनावश्यक अडथळेही निर्माण होता कामा नयेत.

मस्क यांनी मुकेश अंबानी यांचा उल्लेख भारताचे 'खरे बॉस' असा केला आणि त्यानंतर 'पंतप्रधान अंबानी' असे संबोधत त्यांच्यावर उपरोधिक टीका केली. स्टारलिंकच्या भारतातील प्रवेशात अंबानी यांचा प्रभाव अडथळा ठरत असल्याचा त्यांचा आरोप आहे. मात्र, या आरोपाच्या समर्थनार्थ ठोस पुरावे अद्याप सार्वजनिक झालेले नाहीत.

**दैनंदिनी**

दुसरीकडे केंद्र सरकारने कोणत्याही कंपनीला विशेष वागणूक दिली जात नसल्याचे स्पष्ट केले आहे. स्टारलिंक, जिओ आणि वनवेब या तिन्ही कंपन्यांना परवाने मिळाले असले, तरी व्यावसायिक सेवा सुरू करण्यापूर्वी आवश्यक सुरक्षा अटी आणि स्पेक्ट्रमविषयक प्रक्रिया पूर्ण कराव्या लागणार आहेत. मस्क यांच्या टिप्पण्यांकडे केवळ विनोद म्हणून पाहता येणार नाही. एखाद्या उद्योगपतीचा सरकारी निर्णयांवर प्रभाव असल्याचा आरोप करणे आणि त्यासाठी पंतप्रधानपदाचा उपरोधिक उल्लेख करणे, या दोन वेगळ्या गोष्टी आहेत. आपल्या कंपनीला बाजारपेठेत प्रवेश मिळण्यात विलंब होत असल्यामुळे संपूर्ण नियामक प्रक्रियेलाच संशयाच्या भोवऱ्यात उभे करणे, ही व्यावसायिक संघर्षाची योग्य पद्धत ठरू शकत नाही. तथापि, मस्क यांच्या आरोपांमध्ये पुराव्यांचा अभाव आहे म्हणून भारतातील मोठ्या उद्योगसमूहांच्या प्रभावाविषयीचे प्रश्नही गैरलागू ठरत नाहीत. दूरसंचारसारख्या भांडवलप्रधान क्षेत्रात मोजक्या कंपन्यांचे वर्चस्व निर्माण होण्याचा धोका असतो. त्यामुळे सरकारने केवळ भेदभावाचे आरोप फेटाळून न लावता परवानग्या, सुरक्षा मंजुरी आणि स्पेक्ट्रम वाटपाच्या निर्णयांमध्ये अधिकाधिक पारदर्शकता ठेवली पाहिजे. या वादात राहुल गांधी यांनी मस्क यांच्या टिप्पण्यांना दिलेल्या प्रतिसादामुळे राजकीय संघर्षाची भर पडली. सरकारने आपल्या निर्णयांची कारणमीमांसा स्पष्ट केली, तर अशा आरोपांना उत्तर देणे अधिक सोपे होईल.

# करवीर निवासिनी कोल्हापूरची श्री अंबाबाई

> कोल्हापूरच्या अंबाबाई (महालक्ष्मी) मंदिराचा समावेश शक्तीपिठांमध्ये केला जातो. संपूर्ण भारत तसेच नेपाळ आणि बांग्लादेशचा काही भाग यामध्ये मिळून एकूण ५१ शक्तीपिठे सांगितली जातात. हे सर्व शक्तीपिठ हे आदि शक्तीच्या विविध रूपांना समर्पित आहेत.

शक्तीपिठांच्या निर्मितीबद्दल एक कथा विविध पुराणांमध्ये समाविष्ट आहे. शक्तीने जेव्हा सती रूपामध्ये अवतार घेऊन महादेवांसोबत विवाह केला होता, त्यावेळची ही कथा आहे. सतीचे वडील दक्ष यांनी एक यज्ञ आयोजित केलेला होता, जेथे महादेवांना सोडून इतर सर्व जावयांना दक्षाने आमंत्रित केले होते. दक्षाचे सर्व जावई हे विविध देवतागण होते. सतीला वाटले की महादेवांना आमंत्रित करणे दक्ष चुकून विसरले असावे. त्यामुळे सती न बोलावणे येताही तेथे उपस्थित झाली. यावेळी दक्ष राजाने महादेवांच्या राहणीमान आणि वेशभुषेवरून सतीला हिणवले. पतीचा अपमान सहन न झाल्याने रागाच्या भरात तिने यज्ञकुंडात उडी मारून आत्मदाह करून घेतला. सतीच्या अशा प्रकारे निघून जाण्यामुळे महादेवांना खूप राग आला. विरभद्र रूपात त्यांनी दक्ष राजाचा यज्ञ उद्ध्वस्त केला आणि दक्ष राजास मारून टाकले. मात्र त्यांचा राग येथेच शांत झाला नाही. राग आणि शोकाच्या भरात त्यांनी सतीचे अर्धवट जळालेले मृतदेह आपल्या खांद्यावर घेतले आणि संहार तांडव हे नृत्य आरंभ केले.

संहार तांडवामुळे संपूर्ण ब्रम्हांड नष्ट होईल अशी भिती सर्व देवतांना वाटू लागली. महादेवांना शोकस्थितीतून बाहेर काढण्यासाठी विष्णूंनी आपल्या सुदर्शन चक्राने सतीच्या शरिराचे तुकडे केले. सतीच्या शरीराचे हे तुकडे पृथ्वीवर ज्या ज्या ठिकणी पडले, तेथे एक शक्तीपिठ निर्माण झाले. महाराष्ट्रामध्ये कोल्हापूर सोबतच तुळजापूर (जि. धाराशिव) आणि माहू (जि. नांदेड) अशी आणखी दोन शक्तीपिठे आहेत. तर वणी(जि. नाशिक)



येथील सप्तशृंगी देवीला अर्थ शक्तीपिठ मानण्यात येते. कोल्हापूर येथे सतीचा डोळा पडला होता असे मानले जाते. यामुळे आपोआपच या जागेचा संबंध सती (शक्तीचे एक रूप) यांच्यासोबत जोडला गेलेला आहे. तमोगुणयुक्त रूपात महाकाली तर सत्वगुणायुक्त रूपात महासरस्वती झाली. अशी कथा आहे. पुढे तिने लक्ष्मी, ब्रह्मदेव यांना जन्म दिला. महाकालीने शंकर, त्रयी, विद्या यांना तर महासरस्वतीने विष्णू, गौरी यांना जन्म दिला. अशाप्रकारे विश्वनिर्मितीला प्रारंभ झाला. विराट स्वरूपात प्रगट झालेली काश्मीर, कांची, कामाख्या ही देवीची तीन पीठे होत. अंबाबाई, महालक्ष्मीच्या देवालयाबाबत संशोधन परिपूर्ण नाही. शिलाहार देवीचे भक्त असल्याने देवीचा वरप्रसाद त्यांना मिळाल्याचे संदर्भ काही ठिकाणी आढळतात. मंदिरातील रचना चक्रराज आढळतात.

महालक्ष्मीची मूर्ती दगडी चौथऱ्यावर असून सुंदर नक्षीकाम केलेला घाटी दरवाजा, गरुड मंडप,पाच शिखरांसह गर्भगृह मंडप, मध्यमंडप, गरुडमंडप असे तीन मंडप आहेत. भगवान शंकर आणि परमदेवीमध्ये स्थानाच्या महानतेवरून झालेला वाद भगवान विष्णूंनी संपवला. विश्वनिर्मितीनंतर भगवान विष्णूने काशी,करवीरची निर्मिती केली असे जाणकार सांगतात. लक्ष्मीने कोल्हासूर राक्षसाचा वध केल्यानंतर नगराचे नाव त्याच्या नावावर ठेवण्याची त्याची इच्छा असल्याने हे शहर कोल्हापूर म्हणून ओळखले जाऊ लागले. शैवांच्या मते अंबाबाई पार्वतीचे रूप आहे तर वैष्णव तिला महालक्ष्मीचे रूप मानतात. करवीरक्षेत्र श्रीमहालक्ष्मीचं आवडतं ठिकाण असल्याने तिथं नतमस्तक होणाऱ्या भक्ताला भक्तीचा पाझर फुटतो.अशा महाकाली महालक्ष्मी, महासरस्वती रूपातल्या करवीर निवासिनी अंबाबाई, श्री महालक्ष्मीला आमचा दंडवत...!!श्री.अंबाबाईच्या नावाने चांगभलं...!!

■ **शिवाजी चौगुले**,कागल.

**नवरात्री म्हणजे देवीच्या उपासनेचे पर्व. महालक्ष्मी, महासरस्वती आणि महाकाली या तीन प्रमुख देवींच्या उपासनेचा काळ. विज्ञानाने कितीही प्रगती केली असली, तरी साऱ्या जगाला नियंत्रित करणारी अशी अलौकिक शक्ती सूक्ष्म रूपाने सदैव कार्यरत असते, हे मोठमोठ्या शास्त्रज्ञांनीही मान्य केले आहे.**

# नवरात्री:अलौकिक शक्तीचे पर्व

शक्तीविना कोणताही जीव हा मृतवत समजला जातो. सजीवांचे सजीवपण हे शक्तीमध्ये असते. या शक्तिलाच हिंदू धर्माने देवतेचे स्थान दिले आहे. जगनियंत्या परमेश्वरावर, देवतांवर श्रद्धा ठेवून आपल्या संसाराचे रहाटगाडे हाकणारा मोठा सश्रद्ध वर्ग भारतात आहे. त्यामुळे देवतांचे उत्सव, सण, व्रतवैकल्ये इथे घराघरात श्रद्धेने आणि जल्लोषात साजरे केले जातात. देवतांच्या कृपेमुळे आपले अस्तिव आहे. आपल्या प्रत्येक कृतीकडे आणि विचारांकडे भगवंताचे लक्ष आहे, तो आपली सारी दैन्य दुःख हरतो, आपल्या इच्छा आकांक्षा पूर्ण करतो यावर श्रद्धा ठेवून वैयक्तिक जीवनात प्रत्येक कृती प्रामाणिकपणे आणि भगवंताला अपेक्षित अशी करण्याचा प्रयत्न करणारा मोठा सश्रद्ध वर्ग इथे असल्याने सध्याच्या रज-तमात्मक वातावरणातही भारतात काही प्रमाणात का होईना सात्विकता टिकून आहे, असे संत महंत सांगतात. नवरात्रीपर्वात जसे ठरलेल्या रंगाचे कपडे परिधान करणारा तरुण वर्ग इथे पाहायला मिळतो तसा या नऊ दिवसांत पादत्राणे परिधान न करता घराबाहेर पडणारा युवा वर्गही मोठ्या प्रमाणात पाहायला मिळतो. एरव्ही चपला आणि बुटांमध्ये फॅशन शोधणारा हा वर्ग नवरात्री काळात शाळा महाविद्यालयात, कार्यालयात जाण्यासाठी बस-रेल्वे प्रवासात, ऊन-पावसात अनवाणी फिरताना पाहून आश्चर्य वाटते. शक्तीचेच रूप असलेल्या पृथ्वीला हिंदू धर्मात देवतेचे स्थान आहे. नवरात्री काळात शक्ती प्रकट रूपात असते, मग तिच्या अंगाखाद्यावरून फिरताना पादत्राणे कशी घालायची ? हा भाव ठेवून या काळात ही मंडळी अनवाणी प्रवास करतात. एरव्ही अनवाणी चालताना कधी कुठला खिळा किंवा काच पायाला टोचेल याची खात्री नसते; मात्र पृथ्वीमातेवर श्रद्धा ठेवून अनवाणी प्रवास करणाऱ्या या समस्तांची काळजी ती माता पदोपदी वाहते, याची अनुभूती प्रत्येक जण या काळात घेत असतो.

■ **जगन घाणेकर**

## वाचकांचा पत्रव्यवहार

### दुर्मिळ वनौषधी संवर्धनाकडे वनविभाग लक्ष देणार का ?

सह्याद्रीच्या कुशीत वसलेल्या पन्हाळा, गगनबावडा आणि शाहुवाडी तालुक्यांच्या जंगलात केवळ मोठमोठी झाडेच नाहीत तर औषधी आणि जैवविविधतेच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण असलेल्या असंख्य वनस्पतींचा अमूल्य ठेवा असल्याचे वृत्त वाचनात आले. नरक्या, कळलावी, कंदील, सर्पगंधा, काळी मुसळी, सफेद मुसळी, रानहळद, रानआले, शतावरी, कांचन, करवंद, हिरडा, बेहडा, आवळा,अडुळसा, कुडा, कडुनिंब,अर्जुन, जांभूळ, उंबर, पांगरा आणि सोनकी यासारख्या वनस्पतींचे अस्तित्व या जंगलांच्या जैवविविधतेचे महत्त्व अधोरेखित करते. मात्र या वनसंपदेच्या संवर्धनासाठी प्रत्यक्ष जंगलात किती नियोजनबद्ध काम केले जाते असा सवाल उपस्थित होतो आहे. अनेक नव्याने उगवलेल्या रोपांभोवती वेली, काटेरी झुडप, गवत आणि इतर वनस्पती मोठ्या प्रमाणात वाढल्याने लहान रोपांना आवश्यक प्रकाश, हवा रोपं वाढीसाठी जागा मिळत नसल्याने औषधी वनस्पतींची वाढ खुंटण्याची शक्यता आहे. त्यासाठी दुर्मिळ आणि औषधी वनस्पतींची स्वतंत्र नोंद, नियमित पहाणी, आवश्यक अधिवास व्यवस्थापन आणि नैसर्गिक पुनरुत्पादनासाठी ठोस नियोजन करणे गरजेचे आहे. सद्या आपल्या देशांमध्ये आयुर्वेदाला महत्त्व आले आहे,त्यामुळे जंगलातील औषधी वनस्पतींना महत्त्व देणे तितकेच गरजेचे आहे. वनसंपदेच्या संवर्धनाला प्राधान्य दिले जाते का ? याचाही आढावा घेणे आवश्यक आहे. जंगल केवळ मोठ्या झाडांनी तयार होत नाही जमिनीपासून उगवणाऱ्या प्रत्येक वनस्पतीपासून जंगलांची जैवविविधता तयार होते, त्यामुळे पन्हाळा, गगनबावडा आणि शाहुवाडी यासह महाराष्ट्रातील इतरही भागातील वनौषधी व दुर्मिळ वनस्पतींचे शास्त्रीय सर्वेक्षण करून त्यांची नोंद, संवर्धन आणि देखभालीसाठी स्वतंत्र आराखडा तयार करणे गरजेचे आहे.

■ **राजू जाधव**,मांगूर

### भारनियमनाचे संकट

पावसाने दिलेली ओढ आणि दुष्काळी परिस्थिती पाहता पुढील काळात मोठ्या भारनियमनाच्या संकटाला सामोरे जावे लागेल अशी परिस्थिती आहे. सध्या तातडीचे भारनियमन (ईमर्जन्सी लोडशेडींग) औद्योगिक भागामध्ये तास, दीड तास सुरु झालेले आहे.ऑक्टोबर हिटमुळे वीज वापर अचानक मोठ्या प्रमाणात वाढलेला आहे. पुढे हिवाळा सुरु होणार असला तरी जलविद्युत प्रकल्पातून निर्माण होणाऱ्या विजेची कमतरता नक्कीच भासणार आहे.धरणातील पाणीसाठा दुष्काळामुळे आरक्षित करण्यात येत आहे. औष्णिक वीज प्रकल्पावरही कोळशाअभावी मर्यादा येऊ शकतात. त्यामुळे सर्वत्र वीज प्रकल्पावरही मर्यादा येऊ शकतात.त्यामुळे वीज निर्मिती मर्यादित राहू शकते. भविष्यातील भारनियमन कमी करण्यासाठी आजपासूनच विजेची बचत करणे आवश्यक आहे. अन्यथा याचे गंभीर परिणाम महाराष्ट्रापुढे उभे राहतील.

■ **सचिन कांबळे**,इचलकरंजी

### पोलिसांचा धाक कुणाला,अभय कुणाला?

दिल्लीमध्ये १० ऑक्टोबर रोजी आंदोलनादरम्यान पोलिसांनी मोठ्या प्रमाणावर आंदोलकांची धरपकड केली. मात्र, दुसरीकडे तथाकथित उजव्या विचारसरणीच्या संघटनांच्या कार्यकर्त्यांनी आंदोलकांना आणि पत्रकारांना मारहाण केल्याची घटना समोर आली आहे. या मारहाणीचे व्हिडिओ समाजमाध्यमांवरही मोठ्या प्रमाणावर व्हायरल झाले आहेत. विशेष म्हणजे, काही ठिकाणी पोलिसांसमोरच आंदोलकांना मारहाण होत असल्याचे वृत्त प्रसिद्ध झाले आहे. या प्रकरणी चार जणांना अटक झाल्याचेही वृत्त आहे. लोकशाहीत आंदोलन करण्याचा अधिकार आहे, तसेच कायदा आणि सुव्यवस्था राखण्याची जबाबदारी पोलिसांची आहे. आंदोलन बेकायदा वाटत असेल तर पोलिसांनी कायद्यानुसार कारवाई करावी; पण आंदोलकांना मारहाण करणाऱ्यांना मोकळीक मिळता कामा नये. आंदोलकांची धरपकड करण्यासाठी तत्पर असलेले पोलीस मारहाण करणाऱ्यांना रोखण्यात तेवढेच तत्पर का दिसले नाहीत? कायदा सर्वांसाठी समान आहे, हे केवळ सांगण्यासाठी आहे की प्रत्यक्षातही त्याची अंमलबजावणी होणार आहे?

■ **दीपक गुंडये**

## दैनिक पंचांग(सुर्योदयकालीन ग्रहस्थिती)




**मंगळवार,ता.१३.१०.२०२६**, विक्रमसंवत २०८२, शिवशक ३५३, शालिवहन शके १९४८, पराभव नाम संवत्सरे, दक्षिणायणे, शरद ऋतो, अश्विन मासे,शुक्ल पक्षे,तृतीया तिथी,२३.२८ नंतर चतुर्थी तिथी, विशाखा नक्षत्र, २५.४३ नंतर अनुराधा नक्षत्र,तुला रास१९.१३ नंतर वृश्चिक रास,प्रीती योग २०.२४ नंतर आयुष्मान योग,तैतिल करण १०.४७ नंतर, गरज करण २३.२८ पर्यंत,दिनमान ११.४२, सुर्योदय ६.२८, सुर्यास्त १८.१० (कोल्हापूरचे) राहू काळ दुपारी २ ते ४.३०,मु.जमादिलावल मास आरंभ.

**ज्यो:केशव पेटकर महाराज-९६०४७०९१५९**

## ✻ राशीभविष्य ✻

**मेष**-पुरातन वस्तू आणि दागदागिन्यांमधील गुंतवणूक फायदा आणि समृद्धी आणेल. कामातून समाधान मिळवाल.कोणताही निर्णय तडकाफडकी घेऊ नये.नवीन ओळख होईल. येणाऱ्या काळात ओळखीचा फायदा होईल.

**वृषभ**-अनपेक्षित पाहुण्यांमुळे तुमचे प्लॅन कदाचित बारगळतील, पण तुमचा दिवस निश्चितच चांगला जाईल.धनाची काळजी घ्या. तुमचे मार्गदर्शन इतरांना लाभदायक ठरेल. मित्रांच्या मदतीने काही लाभ संभवतात.

**मिथून**- निराशाजनक आर्थिक परिस्थितीमुळे काही महत्त्वाच्या कामामध्ये खंड पडू शकतो. तुमच्यापैकी काही जण दागदागिने खरेदी कराल किंवा गृहोपयोगी वस्तुची खरेदी संभवते.

**कर्क**- घराच्या दृष्टीने केलेली गुंतवणूक फायदेशीर ठरेल. घरामध्ये तुमची मुलं तुमच्यासमोर अत्यंत बिकट अशी परिस्थिती निर्माण करतील.

**सिंह**- धनप्राप्तीची अपेक्षा करत असाल तर सुरक्षित अशाच आर्थिक योजनांमध्ये पैसे गुंतवा.कामाच्या ठिकाणी आज तुम्हाला एखादी चांगली बातमी मिळेल.

**कन्या**- महत्त्वाच्या कामाची फाईल सर्व बाबतीत चोख आणि परिपूर्ण असल्याची तुम्हाला खात्री असल्याशिवाय वरिष्ठांच्या हाती सोपवू नका. आनंदवार्ता समजेल.

**तुळ**-आजच्या दिवशी धन हानी होण्याची शक्यता आहे म्हणून देवाण-घेवाणीने जोडलेल्या गोष्टींमध्ये जितके तुम्ही सतर्क राहाल तितकेच तुमच्यासाठी चांगले असेल.

**वृश्चिक**-दुसऱ्यांवर प्रभाव पडावा म्हणून मर्यादेच्या बाहेर खर्च करू नका. प्रलंबित प्रस्तावांची अंमलबजावणी होईल. वरिष्ठांची मर्जी राहील. दिवस आनंदात जाईल.

**धनु**-अचानक पैसा आल्याने तुमची प्रलंबित बिले आणि ताबडतोब करावयाचे खर्च भागतील. मित्र आणि कुटुंबातील सदस्यांबरोबर तुमचा बराच वेळ व्यतीत होईल.

**मकर**-तुमचा दुर्दम्य आत्मविश्वास आणि कामाची सुटसुटीत वेळ यामुळे आज दिवसभरात विश्रांती घेण्यास वेळ मिळेल. मित्रांच्या मदतीमुळे आर्थिक अडचण सुकर होईल.

**कुंभ**-घरगुती कामं कंटाळवाणी होतील आणि मानसिक तणावाला निमंत्रण देणारी असतील. वायफळ खर्च टाळा.अचानक धनलाभाची शक्यता.

**मीन**- नवीन ग्राहकांशी वाटाघाटी करण्यासाठी उत्तम दिन आहे. सहलीचे प्लॅन होतील. आरोग्य चांगले राहील. बोलताना विचार करुन बोला नाहीतर संकटात येऊ शकता.

महासत्ता हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक वसंतराव कृष्णाजी दत्तवाडे यांनी तरुण आर्टस् अॅन्ड प्रेस, गट नं. ४४४/२/३-ए , महासत्ता चौक, इचलकरंजी येथे छापून इचलकरंजी, सांगली, कराड व सातारा येथील कार्यालयातून प्रसिद्ध केले. आर.एन्.आय.रजि.नं. ६३११९/९४ मुख्य कार्यालय:'मँचेस्टर भवन' ४४४ /२/३-ए, महासत्ता चौक, इचलकरंजी-४१६११५. , दूरध्वनी क्रं.-०२३०-२४३४३४५ संपादकीय विभाग,२४३४३४३ जाहिरात विभाग, फॅक्स क्र. २४३५५११. विभागीय कार्यालय- मुंबई -दूरध्वनी क्र. २२६२४५६० , पुणे - दूरध्वनी २४४९१०६० , सातारा दूरध्वनी क्र. २३३४०१. कराड -दूरध्वनी क्र. २२४५६४ , इस्लामपूर- २२४११९., सांगली - दूरध्वनी क्रं.२३७३७५५.✻ कोल्हापूर - दूरध्वनी क्रं. २५४५४०१ , गडहिंग्लज - दूरध्वनी क्र.२२२९४९., निपाणी- दूरध्वनी क्रं.२२२१६५., चिकोडी दूरध्वनी क्र.२७३०३१. टीप- पी.आर.बी.कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी जाहिरात प्रतिनिधी श्री. दि. पा. मोमीन यांचेवर राहील. मा. संपादक किंवा व्यवस्थापकीय संपादक यांचेवर रहाणार नाही.

# निपाणी परिसरात दुष्काळाचे गडद सावट

## नदी, विहीर,बोअरवेलच्या पाणी पातळीत घटःरब्बी पेरणीचे मोठे संकट

निपाणी,ता.१२(प्रतिनिधी)–

**निपाणी परिसरात दुष्काळाचे सावट दिसू लागले असून नदीचे, विहिरीचे पाणी कमी होवू लागले आहे. विद्युत पुरवठा खंडीत होवू लागला आहे. त्यामुळे शेतात आहे त्या पिकांना पाणी देण्यासाठी शेतकऱ्यांना रात्रंदिवस कसरत करावी लागत आहे. तर सोयाबीन, भुईमूग पीक काढणीनंतर रब्बी हंगामाला सुरूवात होणार होती पण पावसाने दडी मारल्याने आणि शेतातील ओलावा नाहीसा झाल्याने शाळू,हरभरा,गहू पेरणीबरोबर कांदा लागवड आणि ऊस लागवडीलाही खो बसण्याची शक्यता आहे.त्यामुळे दुष्काळाचे सावट गडद होवू लागले आहेत.**



### मुक्या जनावरांना वाचविण्यासाठी आतापासूनच तयारी करा

यावर्षीच्या संभाव्य दुष्काळात आपल्या जनावरांना जगवणे खूप जिकिरीचे ठरू शकते.चारा आणि पाण्याची टंचाई निर्माण झाल्यानंतर धावपळ करण्यापेक्षा दुष्काळाची आधीच कल्पना असल्याने आतापासूनच त्यांच्या खाण्या–पिण्याची तजवीज करणे गरजेचे आहे. ऊस पिकाचे वाढे वाचवा,सोयाबीनचा भुसा गोळा करून ठेवा, डोंगरावरील गवताचा उपयोग करा,रब्बी हंगामात वैरणीच्या पिकांवर भर द्या,पाण्याचेही नियोजन करा.दुष्काळ पडल्यावर चारा महाग होतो. उपलब्धता कमी होते आणि अशा वेळी जनावरे सांभाळणे कठीण बनते. म्हणूनच आजपासून केलेले नियोजन उद्या मोठा आधार ठरू शकते.जनावरे ही शेतकऱ्याच्या संसाराचा अविभाज्य भाग आहेत. त्यांच्या संगोपनासाठी आपण वर्षभर मेहनत घेतो.त्यामुळे संकटाच्या काळात त्यांना वाचवण्यासाठी शक्य ते सर्व प्रयत्न करूया.

– चैतन्य नेसरीकर, शेतकरी मित्र.

निपाणी परिसरातील शेतीला वेदगंगा, दूधगंगा आणि चिकोत्रा नदीच्या पाण्याचा वापर करून घेता येतो.दरवर्षी ऑक्टोबर ते नोव्हेंबरपर्यंत किरकोळ प्रमाणात शेतातील पिकांना पाणी देण्याचा प्रसंग येत होता.मात्र यावर्षी सप्टेंबरपासूनच शेतातील पिकांना पाणी देण्याची वेळ आली आहे. त्यामुळे ऑक्टोंबरमध्ये विहींरींच्या पाण्यांनी तळ गाठला आहे. ही परिस्थिती खरे तर फेब्रुवारी आणि मार्चमध्ये ओढावत होती. पण यावर्षी ही परिस्थिती ऑक्टोंबरमध्येच ओढावली आहे. त्यामुळे विहीरी आणि बोअरवेल्सच्या पाण्याची पातळी आतापासून घटताना दिसत आहे. त्यामुळे रब्बी हंगामातील पिकांची अद्याप पेरणीची झाली नाही तर आतापासून पाणी देवून पिकांची उगवणी आणि पिके काढणीपर्यत येईपर्यंत पाणी देण अशक्य आहे. त्यातच माळ रानाची परिस्थिती तर अत्यंत कठीण होवून बसली आहे. त्यामुळे रब्बी हंगाम वाया जातो की काय अशी भिती शेतकरी वर्गाला लागून राहिली आहे.

निपाणी परिसरातील अत्यंत महत्वपूर्ण आणि आर्थिक उलाढालीचे पीक म्हणून तंबाखू पिकाची लागवड केली जाते. मात्र या हंगामातील तंबाखू पिकाला जीवदान देताना शेतकरी वर्गाची दमछाक होताना दिसत आहे.तंबाखू लावणीच्या सुरूवातीपासून पावसाने दडी मारली आहे. त्यामुळे तंबाखू लावल्यानंतर ती रोपे जगविताना शेतकऱ्यांना कसरत करावी लागती होती. आता थोडी तग धरली अशी वाटत असताना त्या पिकांना आता पावसाची गरज भासू लागली आहे. मात्र पाऊस नसल्याने ज्याच्याकडे सोय असेल तो पाणी देण्याचा प्रयत्न करीत आहे. तर ज्याच्याकडे पाण्याची सोय नाही तो आभाळाकडे पाहत राहिला आहे. पाणी देताना आता विद्युत पुरवठाही खंडीत होवू लागला आहे. वेळी अवेळी विद्युत पुरवठा होत असल्याने शेतकरी रात्रंदिवस शेतात थांबून राहू लागला आहे. कसेही करून आहे, त्या पिकांना वाचविण्याचा केविलवाणा प्रयत्न करीत आहे. त्यामुळे आता शेतकरी पावसाच्या प्रतिक्षेत आहे. कांहिही होवो वादळ वाऱ्यासह येवू दे पण पाऊस पडू दे अशी मागणी करताना शेतकरी वर्ग दिसत आहे.त्यामुळे दुष्काळाच्या सावटात येणाऱ्या सण उत्सवाला आनंदालाही विरजण लागण्याची शक्यता आहे.

## कागवाडात दुर्गामाता दौडला प्रारंभ

कागवाड,ता.१२(वार्ताहर)–

**कागवाड येथे श्री शिवप्रतिष्ठान हिंदुस्थान आणि सकल मराठा समाजाच्या वतीने प्रतिवर्षाप्रमाणे घटस्थापनेच्या मुहूर्तावर आयोजित नऊ दिवसीय दुर्गामाता दौडला त्साहात प्रारंभ झाला.**

श्री अंबाबाई व श्री विठ्ठल–रुक्मिणी मंदिरासमोर पहाटे साडेपाच वाजता युवा नेते तथा श्री दत्त शेतकरी सहकारी साखर कारखान्याचे संचालक ज्योतिकुमार पाटील यांच्या हस्ते भगव्या ध्वजाचे पूजन करून दौडचा प्रारंभ करण्यात आला.दुर्गामाता दौडीच्या पहिल्याच दिवशी धारकऱ्यांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदविला.भगव्या ध्वजाच्या साक्षीने आणि हिंदू जनजागृतीपर गीतांच्या गजरात ही दौड गावातील प्रमुख मार्गांवरून काढण्यात आली. यावेळी विविध देवी–देवतांच्या मंदिरांना भेटी देण्यात आल्या. याप्रसंगी जे.के.पाटील, युवा कार्यकर्ते बाळासाहेब कळ्ळोळे, मराठा समाज कमिटीचे अध्यक्ष राजू लांडगे,सुधीर गायकवाड, दीपक जाधव, सरकारी मराठी शाळेचे शिक्षक भरत खोत, बाळू जाधव यांच्यासह धारकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते. श्री शिवप्रतिष्ठान हिंदुस्थान आणि सकल मराठा समाजाच्या वतीने आयोजित दुर्गामाता दौड नऊ दिवस चालणार आहेत. या धार्मिक उपक्रमात हिंदू बांधवांनी दररोज पहाटे मोठ्या संख्येने सहभागी व्हावे,असे आवाहन श्री शिवप्रतिष्ठान हिंदुस्थान, कागवाडचे अध्यक्ष प्रवीण पांडुरंग पाटील यांनी केले आहे.

## सोयाबीनला प्रति क्विंटल ६६०० ते ६७०० रुपये दर

संकेश्वर,ता.१२(प्रतिनिधी)–

**कर्नाटक सरकारने हुक्केरी तालुका दुष्काळग्रस्त जाहीर करावा, अशी शेतकऱ्यांतून जोरदार मागणी केली जात आहे.पावसाच्या बे–भरवशाने सोयाबीन उत्पादनात मोठी घट झालेली असताना सोयाबीनला प्रति क्विंटल ६६०० ते ६७०० रुपये चांगला दर दिला जात असल्याने शेतकऱ्यांत सोयाबीनचा विषय चांगलाच चर्चेत दिसत आहे.**



**दर १० हजारावर जाण्याची शक्यता?**

बाजारात सोयाबीनची आवक घटल्याने दरवाढ झाल्याचे सोयाबीन व्यापारी दिपक भिसे यांनी सांगितले. ते म्हणाले, हंगामाच्या सुरवातीला सोयाबीनचा दर प्रति क्विंटल ५८०० ते ५९०० रुपये होता. आता प्रति क्विंटल ६६०० ते ६७०० रुपये झाला आहे.बाजारात एकीकडे सोयाबीनची आवक घटली असून सोयाबीन बियाणे दर्जेदार भरीव दिसेनासे झाले आहे. गतवर्षी सोयाबीनची आवक चांगली होती.सोयाबीन बियाणे दर्जेदार भरीव होते पण दर मात्र प्रति क्विंटल ४५०० ते ४८०० रुपये मिळाला होता.यावर्षी सोयाबीनची आवक घटली असून सोयाबीन बियाणे दर्जेदार भरीव नसताना दर मात्र चांगला मिळताना दिसत आहे.यंदा मान्सूनच्या सुरुवातीला सोयाबीनची पेरणी केलेल्या काही शेतकऱ्यांना सोयाबीन लाभदायक तर बऱ्याच शेतकऱ्यांना नुकसानदायक ठरलेले दिसत आहे.

मान्सूनच्या सुरुवातीला पेरणी केलेल्या शेतकऱ्यांचे सोयाबीन बियाणे मोठे भरीव असून एकरी उत्पादन ९ ते १२ क्विंटल झाले आहे. १५ दिवसांच्या विश्रांतीनंतर पाऊस झाल्यावर पेरणी केलेल्या शेतकऱ्यांचे सोयाबीन चांगलेच मार खाल्लेले दिसत आहे. एकरी ४ ते ५ क्विंटल उत्पादन मिळाले आहे. बाजारात सोयाबीनची आवक जेमतेम असून गरजू शेतकरी सोयाबीनची विक्री करीत आहेत.डिसेंबर अखेरपर्यंत सोयाबीनला प्रति क्विंटल ९००० ते १०००० रुपये इतका चांगला दर मिळणार म्हणून बऱ्याच शेतकऱ्यांनी सोयाबीन साठवून ठेवणे गरजेचे समजलेले दिसत आहे.त्यामुळे ते चांगल्या दराच्या प्रतिक्षेत राहणार आहेत.

## भुदरगड तालुक्यात प्रबोधनपर कार्यक्रम संपन्न

गारगोटी,ता.१२(प्रतिनिधी)–

**वन्यजीव सप्ताहाच्या निमित्ताने भुदरगड तालुक्यातील विविध जिल्हा परिषदेच्या शाळा, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांमध्ये वन्यजीव चित्र रंगभरण, प्रश्नमंजुषा व वन्यजीव जनजागृती प्रबोधनपर कार्यक्रम संपन्न झाले. हे कार्यक्रम वनपरीक्षेत्र गारगोटी, सामाजिक वनीकरण विभाग गारगोटी व पर्यावरणमित्र अवधूत पाटील यांच्या संयुक्त विद्यमाने घेण्यात आले.**



स्पर्धेतील विजेत्या विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र देताना मान्यवर.

वन्यजीवांबद्दल खऱ्या अर्थाने प्रबोधन व्हायचे असल्यास शाळा व महाविद्यालयीन विद्यार्थी हा उत्तम पर्याय होऊ शकतो म्हणून जिल्हा जिल्हा परिषदेच्या शाळा, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांमध्ये चित्र रंगभरण स्पर्धा,निबंध स्पर्धा, प्रश्नमंजूषा सर्वविषयक प्रबोधन असे कार्यक्रम घेत विजेत्यांना प्रोत्साहनपर शैक्षणिक साहित्य व प्रशस्तीपत्रे देऊन गौरविण्यात आले. वनपरीक्षेत्र गारगोटी परिसरातील विविध शाळांमध्ये उप वनसंरक्षक कोल्हापूर. धैर्यशील पाटील, सहाय्यक वनसंरक्षक काळे सामाजिक वनीकरणच्या सहाय्यक वनसंरक्षक स्नेहल मगर यांच्या मार्गदर्शनाखाली प्रबोधनपर उपक्रमात वनक्षेत्रपाल सामाजिक नितीन खताल,वनक्षेत्रपाल प्रादेशिक अविनाश तायनाक, वनपाल राजेंद्र बरगे,मधुकर काशिद, वनपाल स्नेहल सावंत,पर्यावरण मित्र अवधूत पाटील,जान्हवी पाटील, वनरक्षक संतोष गोजारे, एस. बी .तांबेकर,संजय चौगुले, नितीन शिंदे, उत्तम कांबळे, मारुती कांबळे, सारिका बेडगे, निकिता चाळस, वर्षा लोंढे,सौ. सुषमा सरवदे , विद्यार्थी, शिक्षक व पालक आदींनी सहभाग घेतला.

## राज्यस्तरीय वक्तृत्व स्पर्धेत प्रज्ञा माळकर प्रथम

मुरगूड,ता.१२(प्रतिनिधी)–

**येथील मंडलिक महाविद्यालयाच्या वतीने लोकनेते सदाशिवराव मंडलिक यांच्या ९२ व्या जयंतीनिमित्त घेण्यात आलेल्या रौप्यमहोत्सवी राज्यस्तरीय वक्तृत्व स्पर्धेमध्ये सांगलीच्या श्रीमती मथुबाई गरवारे कन्या महाविद्यालयची विद्यार्थिनी प्रज्ञा श्रीकांत माळकर हिने प्रथम क्रमांक पटकावून तिने सदाशिवराव मंडलिक चषक व रोख १० हजाराचे पारितोषिक पटकावले.**



राज्यस्तरीय वक्तृत्व स्पर्धेतील विजेत्यांना बक्षिसे देताना प्राचार्य डॉ.शिवाजी होडगे सोबत इतर प्रमुख मान्यवर.

या स्पर्धेत द्वितीय क्रमांक – रु.७,००१/– चषक व प्रमाणपत्र विजेती अमृता पांडुरंग सागर (डी. के. शिंदे महाविद्यालय गडहिंग्लज), तृतीय क्रमांक–रु.५००१/– चषक व प्रमाणत्र विजेती सानिया उदय यादव (एम.के.एस.व्ही कॉलेज लांजा, रत्नागिरी), चतुर्थ क्रमांक रु.३००१/– चषक व प्रमाणत्र कु. अभय कृष्णकांत आळशी (मुंबई विद्यापीठ, मुंबई) यांनी पटकावला.

या स्पर्धेसाठी जय शिवराय एज्यु. सोसा.चे सेक्रेटरी प्रा. संजय मंडलिक, संस्थेचे कार्याध्यक्ष ॲड.विरेंद्र मंडलिक, संस्थेचे अध्यक्ष गजाननराव गंगापुरे, संस्थेचे कार्यवाह आण्णासाहेब थोरवत यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. स्पर्धेतील विजेत्यांना प्राचार्य .डॉ. शिवाजी होडगे यांच्या हस्ते बक्षिसे देण्यात आली.या स्पर्धेचे परीक्षक म्हणून प्रा. दत्ता देशपांडे, प्रा. माधव भोसले,प्रा.महेश कदम यांनी काम पाहिले. टाईम किपर म्हणून प्रा. दिगंबर गोरे, प्रा.सुशांत पाटील यांनी काम पाहिले.

## बेडकिहाळात नाना पाटेकरांना श्रद्धांजली

बेडकिहाळ,ता.१२(वार्ताहर)–

**हिंदी मराठी चित्रपटासह नाट्य कलाकार म्हणून बरीच वर्षे समृद्ध व चरित्र प्रधान भूमिका करून आपल्या वेगळ्या संवाद सृष्टीतून अजरामर ठरलेले, जेष्ठ अभिनेते नाना पाटेकर यांचे हृदय विकाराने निधन झाले. त्यांच्या निधनाबद्दल बेडकिहाळ येथील साहित्य संस्कृती व शेती सोशल फौंडेशनच्यावतीने त्यांना श्रद्धांजली वाहण्यात आली.**

स्वागत व प्रास्ताविक गजानन पाटील यांनी केले. प्रधान कुंभार यांनी अभिनेते नाना पाटेकर यांच्या नाट्य,चित्रपट व सामाजिक कार्याबद्दल मनोगत व्यक्त करून त्यांना श्रद्धांजली अर्पण केली. यावेळी सुरेश देसाई ,उपाध्यक्ष अभय खोत यांनी मनोगतातून श्रद्धांजली वाहिली.यावेळी सुरेश गोणे,सुधाकर बिजले,कुमार पाटील, राजू पाटील आदी उपस्थित होते. कुमार संकपाळ यांनी आभार मानले.

## मुदाळतिट्टा परिसरात भात कापणी-मळणीची धांदल

### परतीच्या पावसाअभावी पिके कोमेजली, उत्पन्नात घट

मुदाळतिट्टा,ता.१२(प्रतिनिधी)–

**गतवर्षीच्या तुलनेत यंदा दमदार पाऊस झाल्याने भात, भुईमूग,सोयाबीन,नाचणा या पिकांची उगवण जोमाने झाली. शिवाय इतर पिकापेक्षा भात पिकाला पुरेशा प्रमाणात आवश्यकतेनुसार यंदाचा जोरदार पाऊस हा भात पिकास पुरक झाला. पण शंभर ते १२० दिवसांची भाते पोसवतेवेळी व भरतेवेळीच पावसाने दडी मारल्याने भात पिकासह भुईमूग, सोयाबीन,नाचणा हि पिकेही अडचणीत आली आहेत. परंतु रोहिणी नक्षत्राच्या मुहुर्तावर पेरणी केलेली भात पिके आता कापणीला आली असून सुधारीत भात वाणांच्या भात कापणी, मळणीची भुदरगड तालुक्यासह मुदाळतिट्टा परिसरात एकच धांदल सुरू झाली आहे.**



मुदाळतिट्टाःपरिसरात सुरू असलेल्या भाताची मळणी.

दिड महिन्याच्या कालावधीत परतीच्या पावसाने दडी मारल्याने उभे भात–ऊस, सोयाबीन ,नाचणी पिके कोळमसुन गेली आहेत.परतीच्या पावसाची वाट बघत बसलेल्या बळीराजाने कमी दिवसांत कापणे साठी आलेली भाते कापणेस सुरुवात केली आहे. शेतीमध्ये खरीप पिकांतर्गत भात, सोयाबीन,भुईमुग यासारख्या पिकांच्या काढणीची धांदल उडाली आहे.शेतीमध्ये खाटाच्या, चारपाईच्या साहाय्याने भात झोडणे, भात वारे देणे,पिंजर वाळविणे,भात वाळविणे इत्यादी कामे जोरात सुरु झाली आहेत.

आदमापूर,मुदाळतिट्टा, मुदाळ परिसरात भात पीक काढण्याची लगबग सुरू आहे. कांही ठिकाणी कमी कालावधीत कापणीस येणाऱ्या भात पिकांच्या मळण्या सुरू आहेत.तर मागास असणारी व रोप लागणीची भात पिकांची लोंबे बाहेर पडून परिपक्क होत आहेत. भुदरगड तालुक्यात कांही भागात मागील आठवड्यात झालेला परतीच्या पाऊस समाधानकारक झाला नाही. यंदा भात, भुईमूग, सोयाबीन, नाचण, पिकांच्या उत्पन्नात घट होण्याची शक्यता शेतकऱ्यांना वाटत आहे.

### मळणी रस्त्यावरच... खळी झाली कालबाह्य....

**भाताची मळणी काढण्यासाठी पुर्वीच्या काळी शेतकरी शेतातील मोकळ्या जागी खळ्यावर बैलांच्या सहाय्याने भात मळणी करत होते. आता त्या ठिकाणी ट्रॅक्टर व मळणी यंत्राची उपलब्धता झाल्याने शिवाय जागेची कमतरता झाल्याने शेताच्या बांधावरच किंवा रस्त्यावरच भात मळण्या सुरू असल्याने जुन्या खळ्यांची परंपरेला पूर्ण विराम मिळाला असून हि पध्दत आता कालबाह्य झाली आहे.**

## जीवन साळोखे यांच्या चरित्र संग्रहाची शासनमान्य यादीत निवड

मुरगूड,ता.१२(प्रतिनिधी)

**महाराष्ट्र राज्य ग्रंथ निवड समिती, मुंबई यांनी २०२४ ची ग्रंथनिवड यादी नुकतीच जाहीर केली आहे. त्यामध्ये अभिनंदन प्रकाशन, कोल्हापूर यांनी प्रकाशित केलेल्या ज्येष्ठ साहित्यिक जीवन साळोखे यांच्या 'भारतरत्न प्राप्त महाराष्ट्राची नवरत्ने' या चरित्र संग्रहाचा समावेश करण्यात आला आहे.**



२०२४ मध्ये प्रसिद्ध झालेल्या या चरित्रसंग्रहात महाराष्ट्रातील आजपर्यंतच्या भारतरत्न पुरस्कार प्राप्त विविध क्षेत्रातील नऊ थोर व्यक्तींच्या चरित्रांचा प्रवाही शैलीत समावेश करण्यात आला आहे. अभ्यासू वाचकांबरोबरच कुमार वाचकांना उपयुक्त ठरणाऱ्या या वाचनीय पुस्तकाच्या दोन आवृत्त्या प्रसिद्ध झाल्या आहेत.यापूर्वी जीवन साळोखे यांच्या कविता शहराच्या,काटशह (कथासंग्रह), मी यशस्वी होणारच..!, पैलू प्रभावी व्यक्तिमत्त्वाचे, अस्वस्थ वळणावर, सोपे आहे आनंदाने जगणे, पालकांनो जागे व्हा, बुक नव्हे बुके.., नॉन स्टॉप हसा इ.पुस्तकांचा शासनमान्य पुस्तक यादीत समावेश झालेला आहे. राज्यातील सर्व शासकीय अनुदानित सार्वजनिक वाचनालयांना दरवर्षी पुस्तके खरेदी करताना, शासनमान्य निवड यादीतील पुस्तके खरेदी करणे बंधनकारक असते.

## शाहू प्रबोधिनीच्यावतीने २७ रोजी महिलांसाठी मोफत तीर्थदर्शन यात्रा

कुर,ता.१२(वार्ताहर)–

**महिलांना धार्मिक स्थळांचे दर्शन घडावे, त्यांना आध्यात्मिक आनंद मिळावा आणि सामाजिक बांधिलकी जपली जावी, या उद्देशाने शाहू प्रबोधिनी,कोनवडे(ता.भुदरगड) यांच्यावतीने गावातील महिलांसाठी मंगळवार,ता.२७ ऑक्टोबर २०२६ रोजी मोफत तीर्थदर्शन यात्रेचे आयोजन करण्यात आले आहे.**

या यात्रेअंतर्गत महिलांना पंढरपूर, अक्कलकोट आणि नृसिंहवाडी या प्रमुख धार्मिक स्थळांचे दर्शन घडविण्यात येणार आहे.या उपक्रमामध्ये सर्व वयोगटातील महिलांना सहभागी होता येणार असून, वयाची ७५ वर्षे पूर्ण केलेल्या ज्येष्ठ महिलांना विशेष प्राधान्य देण्यात येणार आहे.महिलांना एकत्र आणून त्यांच्यासाठी भक्तिमय आणि आनंददायी अनुभव उपलब्ध करून देण्याचा शाहू प्रबोधिनीचा हा प्रयत्न कौतुकास्पद मानला जात आहे. श्रद्धा, भक्ती, आनंद आणि सामाजिक बांधिलकी यांचा सुंदर संगम घडविणारी ही मोफत तीर्थदर्शन यात्रा कोनवडे गावातील महिलांसाठी संस्मरणीय ठरणार आहे.

## मुरगूडमध्ये नवरात्र उत्सवानिमित्त दंगल काबूची रंगीत तालीम

मुरगूड,ता.१२(प्रतिनिधी)–

**मुरगूडमध्ये मुरगूड पोलिसांनी नवरात्र,दसरा सण उत्सव पार्श्वभूमीवर एसटी बसस्थानक परिसरात दंगल काबू योजना रंगीत तालीम केली. सदर दंगल काबू योजना प्रात्यक्षिक पार पडल्यानंतर मुरगुड एसटी स्टँड– तुकाराम चौक –शिव शंभू शासन चौक– मुख्य बाजारपेठ – कबरस्थान मशीद रोड– अशा मार्गे कायदा व सुव्यवस्था अनुषंगाने रूट मार्च घेण्यात आला.**

या दंगल काबू योजना व रूट मार्च करिता मुरगुड पोलीस ठाणे कडील २ अधिकारी, १५ पोलीस अंमलदार व २२ होमगार्ड हजर होते. तसेच मुरगूड ग्रामीण रुग्णालय कडील वैद्यकीय अधिकारी व ॲम्ब्युलन्स पथक, मुरगुड नगरपरिषद कार्यालयाकडील अग्निशामक दल पथक उपलब्ध ठेवण्यात आले होते.सदरची रंगीत तालीम घेऊन सर्व अधिकारी,पोलीस अंमलदार व उपस्थित लोकांना रंगीत तालीमचा आशय व उद्देश समजावून सांगण्यात आला.

## न्यू इंग्लिश स्कूलच्या विद्यार्थिनींची विभागीय खो-खो स्पर्धेसाठी निवड

पट्टणकोडोली,ता.१२(प्रतिनिधी)–

**कुरुंदवाड येथे पार पडलेल्या जिल्हास्तरीय १४ व १७ वर्षे वयोगटातील मुलींच्या खो–खो स्पर्धेत पट्टणकोडोली (ता. हातकणंगले) येथील तिरुपती बालाजी शिक्षण प्रसारक मंडळ संचलित, न्यू इंग्लिश मीडियम स्कूलच्या विद्यार्थिनींनी घवघवीत यश मिळवून तृतीय क्रमांक पटकाविला.**

१४ वर्षाखालील विभागीय खो–खो स्पर्धेसाठी श्रावणी संदीप म्हाकवे व सलोनी कृष्णात भानसे या दोघींची निवड झाली आहे.१७ वर्षाखालील विभागीय खो–खो स्पर्धेसाठी शर्वरी युवराज रांगोळे हिची निवड झाली आहे.या यशस्वी विद्यार्थिनींना क्रीडा शिक्षक योगेश सुतार, क्रीडा व्यवस्थापक गौराप्पा धनगर,मुख्या.उदय बिरांजे,संस्थेचे शैक्षणिक सल्लागार जितेंद्र वसगडेकर, सचिव प्रमोद बोरगावे यांचे मार्गदर्शन लाभले.विजयी स्पर्धकांचे अभिनंदन करुन पुढील स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या.यशस्वी विद्यार्थिनींचे पट्टणकोडोली पंचक्रोशीतून अभिनंदन होत आहे.

## अकोळ जि.पं.क्षेत्रातून काँग्रेसतर्फे शेंडूरचे संजय कांबळे इच्छुक

निपाणी,ता.१२(प्रतिनिधी)–

**आगामी जिल्हा पंचायत निवडणुकीसाठी नुकतेच आरक्षण जाहीर झाले आहे.त्यामुळे निपाणी मतदारसंघात राजकीय हालचालींना वेग आला आहे. मतदारसंघातील एससी प्रवर्गासाठी राखीव झालेल्या अकोळ जिल्हा पंचायत क्षेत्रातून निवडणूक लढवण्यासाठी रासाई शेंडूर गावचे काँग्रेसचे निष्ठावंत कार्यकर्ते व निपाणी तालुका ब्लॉक काँग्रेस प्रचार समितीचे अध्यक्ष संजय कांबळे यांनी आपली पक्ष नेतृत्वाकडे इच्छा व्यक्त केली आहे.**



संजय कांबळे हे गेल्या अनेक वर्षांपासून काँग्रेस पक्षाचे एकनिष्ठ कार्यकर्ते म्हणून वरिष्ठ नेतेमंडळींच्या मार्गदर्शनाखाली कार्यरत आहेत. ते सध्या निपाणी तालुका ब्लॉक काँग्रेस प्रचार समितीचे अध्यक्ष आहेत. तळागाळातील लोकांचे प्रश्न प्रशासकीय पातळीवर मांडणारे नेतृत्व म्हणून त्यांची ओळख आहे. पक्षाच्या कठीण काळातही त्यांनी संघटनेची ध्येयधोरणे लोकांपर्यंत पोहोचवून पक्ष मजबूत करण्याचे काम केले आहे. अकोळ जिल्हा पंचायत क्षेत्र एससी राखीव झाल्यामुळे, या भागात जनसंपर्क असलेला आणि पक्षाशी एकनिष्ठ राहिलेला उमेदवार देणे काँग्रेससाठी फायदेशीर ठरेल,अशी कार्यकर्त्यांची भावना आहे.शेंडूर व परिसरातील कार्यकर्त्यांनी, 'पक्षासाठी अहोरात्र झटणाऱ्या संजय कांबळे यांच्यासारख्या स्थानिक आणि प्रामाणिक कार्यकर्त्याला संधी दिल्यास या जागेवर काँग्रेसचा विजय निश्चित आहे,'असा विश्वास व्यक्त केला जात आहे.

**पहिल्या पंधरा शब्दास ७५ रू, पुढील प्रत्येक शब्दास ७ रू, शब्द मर्यादा ५० पर्यंत**

## * खरेदी विक्री *

**प्लॉट विकणे** १५ बाय ५० चा प्लॉट सोसायटी फर्निचर समोर, सांगली रोड, इचलकरंजी. १५ फुटी रोड टच, मो. ९८८१८१४६०५, ९८५०१६८६९९

**सर्व सोईनीयुक्त** घर विकणे आहे. राणाप्रताप चौक, गावभाग, इचलकरंजी. ७७५७८१०८०९.

**अर्जंट २ बीचके** फ्लॅट विकणे आहे. पुजारी मळा, राजमाता चौक, इचलकरंजी. मो. ९१७५५१५२९६.

**१ बीएचके** फ्लॅट विकणे आहे. सिध्दी विनायक प्लाझा, महालक्ष्मी नगर, सांगली रोड, इचलकरंजी. मो. ९८२३८२२८८६.

**विकणे आहे** २६.६३ गुंठे जागा, १२ हजार फूट शेड बांधकाम लाईट/बोअर, ६० फूट व ३० फूट रोड टच शेड विकणे आहे. मो. ९४२२६२२६०८.

**आरजेके कंपनीचे** साठ ड्रमचे वायडिंग मशिन विकणे आहे. माफक दरात दिले जाईल. मो. ९०९६३८२७६५, ९३५९४६१६८४.

**फ्लॅट बुकिंग–** दसरा दिवाळीची खास संधी. स्वत:च्या हक्काच्या घरी चला, महासत्ता चौक, स्वामी समर्थ मंदिराजवळ, २ बीएचके मोजकेच फ्लॅट शिल्लक. संपर्क– ९३२५८३०५९२

**विकणे आहे.** तारदाळ संगमनगर ड्रिम रिसॉर्ट हॉटेल मागे २० बाय ५५= ११०० फूट प्लॉट विकणे आहे. संपर्क–अजय सांबरे– ९८५०११५१३४

**७० गुंठे शेती विकणे आहे.** ४० फुटी डांबरी रोडटच, आरसीसी विहीर, पाईपलाईन लाईट कनेक्शन, गोठा, शेड इ. शेती फार्म हाऊससाठी उपयुक्त पुराचे पाणी न येणारी व गावठाणपासून ५०० मी. अंतरावर आणि नियोजित रूकडी गांधीनगर १०० फुटी रिंगरोडपासून १०० मी. अंतरावर निर्वेध शेती विकणे आहे. संपर्क–डॉ. चौगुले, इचलकरंजी. ८२०८१४०२९५, ८४८४९२०२९२

**२ बीएचके फ्लॅट** रेडी पझेशन विक्रीसाठी उपलब्ध. २४ तास पाणी, लिफ्ट कर्जाची सोय. स्वामी समर्थ प्लाझा, जवाहरनगर, इचलकरंजी. ९८९०११६१६१

**शिरढोणमधील** राधाकृष्ण कमर्शियल बिल्डींग विकणे. डांबरी रोडटच सरसकट ७५० रू. स्क्वे. फूट ३० गुंठे जमीन. संपर्क– ९३४२५२७१६९

**जुने व नवीन** पॉवरलूम घेवू व देवू तसेच फवारा, कांडी मशिन, डक्टींग व रिकामे बिमे देवू व घेवू. मो. ८३१७२९१००८.

## * बोअरवेल विषयक *

**सिध्देश्वर बोअरवेल–**आमचेकडे ४।।'' व ६।।'' बोअरवेल योग्य दरात मारून मिळेल. सांगली नाका, इचलकरंजी. मो. ८५५४९८४५६३, ७७७५९३७५७२

**नारळ व जर्मन** टेक्नॉलॉजी मशिनद्वारे विहिर व बोअरवेल पाण्याचे पॉईंट सांगितले जातील. मो. संजय पाटील ९६०४२९६१०२.

## * व्यवसाय विषयक *

**समर्थ कंपनीच्या** उच्च दर्जाच्या लाकूड व कोळसा शेगडीच्या व्यवसायासाठी कमीत कमी भांडवलामध्ये स्वत:चा व्यवसाय करा. संपर्क– समर्थ एंटरप्रायईजेस, अशोक नगर, निपाणी, मो. ८१४७६८४७४५, ८०८८७४२९०२.

## * कर्ज विषयक *

**होमलोन मॉरगेज** चालू कर्ज, कमी रेटने, प्लॉटतारण खरेदी, एनए असो नसो खात्रीने मंजूरी. मो. ९०९६०६६५०५.

**सिबिल कमी** आहे ? चिंता करू नका ! गृहकर्ज, प्लॉट कर्ज, मालमत्तेवर तारण कर्ज (लॅप) कर्जासाठी आजच संपर्क साधा. मो. ९७६५३८०८७६.

## * नोकरी विषयक *

**जोडपे पाहिजे** रामलिंग रोड, हातकणंगले फार्म हाऊससाठी किचन/बागकाम,राहण्यासाठी दोन खोल्या/टॉयलेट,बाथरूमची सोय. आकर्षक पगार, मो. ९५७९४९४२१४

**बेडसीट,पडदे,** कारपेटच्या दुकानासाठी कामगार पाहिजेत. ओम एन्टरप्राईज, कल्पना टॉकीज जवळ, इचलकरंजी. मो. ९३७३७८५९५५.

**कोरोची येथील** हॉटेल, लॉजवर अनुभवी रूम बॉय पाहिजे. वय ३५ वर्षापुढील, अनुभव असलेल्यांना प्राधान्य. मो. ७०२००४२०६५, ९४२२४१९९०९.

**१३,५००/- ते ३०,०००/- रूपयापर्यंत पैसे मिळवण्याची सुवर्णसंधी**
**Required Following Staff :**
नामवंत मोबाईल कंपनीमध्ये
**Promoter** भरतीसाठी स्टाफ पाहिजे.
**Fix Salary Incentive, PF, Insurance**
**18 to 35 Age Boys + Grils** प्राधान्य
**Contact No:**
**8698774649, 9321658741**
**Join Our Team! Apply Now!**

**गोडाऊन कामासाठी** अनुभवी हमाल पाहिजे. पगार ५००० ते ५५०० आठवडा. संपर्क– ९४२२०४४२९२, जय किसान पशुखाद्य, सांगली रोड, इचलकरंजी.

**व्हीआय कंपनी** इचलकरंजीमध्ये सिमकार्ड विक्रीसाठी मुले/मुली पाहिजेत. आकर्षक पगार+इन्सेटिव्ह+पीएफ+ईएसआयसी. मो. ८५३०७६६४२९.

**हॉटेल द बिर्याणीवाला** गुरू टॉकीजसमोर येथे कुक, वेटर, लेडीज हेल्पर पाहिजेत. मो. ८५३००३६०६३.

**इचलकरंजी बीजेपी** मार्केट परिसरातील कंपनीमध्ये ऑफिस बॉय पाहिजे. वेळ सकाळी ९.३० ते संध्या. ७, इंग्रजी, मराठी लिहिता वाचता येणे आवश्यक. मो. ७३८७२०३४५४.

**सुवर्णसंधी (वर्क फ्रॉम होम)** वाढत्या महागाईमध्ये एक्स्ट्रा इन्कम कसे घेऊ शकतो ? घरबसल्या कामाची सुवर्णसंधी. नोकरदार, गृहीणी, विद्यार्थी इतर सर्वांसाठी घर, मोबाईल/ऑफिसमधून काम करा. वय १८+. संपर्क– योगीता खामकर, ७७९६३५२००१.

**ड्रायव्हर कामासाठी** कामगार पाहिजे. पत्ता– खंजिरे इंड.इस्टेट, शहापूर, सावली सोसायटीजवळ, इचलकरंजी. मो. ८४८५०५११९८२.

**लेडीज टेलिफोन** ऑपरेटर पाहिजे व कॉम्प्युटर ऑपरेटर पाहिजे. मो. ९६०४०००८४५.

**होलसेल औषध** दुकानामध्ये कामाकरीता १० वी/१२ वी झालेली मुले/मुली पाहिजेत. पत्ता– सुशिल फार्मा एलएलपी, नाईट कॉलेजवळ, इचलकरंजी. मो. ९०९६२६१२७२, मुलाखतीची वेळ: स.१०.०० ते दु.१.०० वाजेपर्यंत, रविवार बंद.

**इचलकरंजीमध्ये किडसवेअर** व लेडीज वेअरमध्ये अनुभवी/शिकाऊ स्टाफ पाहिजे. मो. ९३०९५१२४९६, ९८८१८१४१५१.

**आवाडे पार्क** तारदाळमधील नामवंत कंपनीकरीता अर्जंट सिक्युरिटी गार्ड भरती. ड्युटी १२ तास, पगार १४०००+. संपर्क– ९०६७९८५२३३.

**फॅब्रीकेशन वर्कशॉपमध्ये** वेल्डर व फिटर पाहिजेत. मो. ७७४१०९६८९९, कोरोची.

**ऑफिस कामासाठी** मुलगा/मुलगी पाहिजे. संपर्क–संगिता कन्सलटन्सी, इचलकरंजी. मो. ९१३०८१३७२० (रिझ्युम व्हॉटस्अप करा).

**रेडिमेड कापड** दुकानात लेडीज, जेन्टस् पाहिजेत. पगाराच्या अपेक्षेसह भेटा. बीडीएच फॅशन, इचलकरंजी स्टॅण्डजवळ, मो. ९९६०३३४००६.

**लेथ मशिन** वर्कशॉपमध्ये टर्नर, वेल्डर, हेल्पर व दिवाणजी कामासाठी मुलगा पाहिजे. मो. ९८२२४२०४९७, वर्धमान चौक, हॉटेल प्रतिनिधी समोर, इचलकरंजी.

**इचलकरंजीमध्ये बार** आणि रेस्टॉरंटमध्ये अनुभवी वेटर भांडी/चपातीसाठी महिला व साफसफाई कामगार पाहिजे. मो. ९८५०९५०९७८.

**हेल्पर पाहिजे** डिजीटल साईन बोर्ड कंपनीमध्ये हेल्पर पाहिजेत. संपर्क– शिव ब्रॅण्डींग, मो. ९७६३६०११७७, इचलकरंजी.

**महिलांसाठी सुवर्णसंधी** घर बसल्या अश्वगंधा बिया पॅकींग करा. फक्त ६००/– रूपये भांडवलात. दररोज १०००/– रूपये मिळवा. बाळासो भोसले, जांभळी, मो. ९२७०५८१४५२.

**त्वरीत सिक्युरिटी** भरती करणे आहे. कोंडीग्रे, पार्वती, प्राईड इंडिय, इचलकरंजी. आकर्षक पगार, १२ तास काम. मो. ८०५५६६७७६६.

**पाहिजेत–संस्थेत** कामाचा अनुभव असलेला व पतसंस्थेतील कामाचा अनुभव. १) लेडीज क्लार्क– पदवीधर २) वसली क्लार्क– कोर्ट कामाचा अनुभव आवश्यक ३) शिपाई लेडीज/पुरूष– १२ वी पास. पगाराच्या अपेक्षेसह संस्थेकडे दि. १६/१०/२०२६ पर्यंत अर्ज करावेत. श्री चौंडेश्वरी महिला नागरी सह. पतसंस्था, इचलकरंजी. मंगळवार पेठ, चौंडेश्वरी मंदिर, इचलकरंजी. मो. ०२३०– २४३४४९३, ९५२७७६४४८६.

**दिवाळीनंतर पाहिजे** १) शर्टींग फिनीश कापड चेकींगसाठी ४ वर्ष अनुभवी चेकर २) ऑफिस काम आणि ड्रायव्हिंगसाठी अनुभवी ड्रायव्हर. ३) ऑटोलूम जॉबच्या हिशेबासाठी अनुभवी दिवाणजी. संपर्क– 'राजमहल' आवाडे नगर, ९३२६०३९०८७.

**दिवाळीनंतर पाहिजे** १) ऑटोलूम कारखान्यात यार्न हिशेबासाठी अनुभवी दिवाणजी २) पीएलसी सायझिंगवर अनुभवी खरड दिवाणजी आणि दिवाणजी.संपर्क– 'राजमहल' आवाडे नगर, ९३२६०३९०८७.

**मावशी पाहिजे** घरकाम करण्यासाठी अर्जंट मावशी हव्या आहेत. (गावभागतल्यांना प्राधान्य) वेळ– सकाळी ९ ते १, दुपारी ४.३० ते ८.३०. पत्ता– श्रीपादनगर, चांदणी चौक, इचलकरंजी. मो. नं. ९०४९०४२३७५.

**लेडीज क्लार्क** पाहिजे कॉम्प्युटर ज्ञान आवश्यक. अर्जासह भेटा, ओम मोटर्स, शाहू पुतळ्याजवळ, इचलकरंजी.

**नेटवर्क मार्केटिंगसाठी** मुले/मुली/महिला पार्ट–फुल्ल टाईम पाहिजेत. जागा–८, महिना २५ ते ३० हजार कमावण्याची संधी. मो. ९८५०३०२३४३.

**अर्जंट वेटर** व साफसफाईसाठी कामगार पाहिजे. ३ जागा, हॉटेल चंद्रशिला, हुपरी, मो. ९०९६९९३३३३, ९०९६९९२२२२

**लेडीज स्टाफ** पाहिजे मगदूम आयुर्वेदिक क्लिनिक, गांधी पुतळा, इचलकरंजी. मो. ७३८५११२०३९.

**रिटेल मेडिकल** शॉपसाठी अनुभवी फार्मासिस्ट, नाईट स्टाफ नेमणे आहे. समक्ष भेटा: मो. ८५३००४०४६७, ९८२२१८६८६९

**किराणा दुकानात** कामगार पाहिजेत. फुल टाईम, मेन रोड, नारायण पेठ, हॉटेल कुबेर समोर, लक्ष्मीकृपा किराणा स्टोअर्स, मो. ९४०५६२२९२२.

**नामांकित क्रिकेट** टर्फसाठी युवा मॅनेजर आणि वॉचमन पाहिजे. मो. ९९७०११२३४६.

**इचलकरंजी येथील** व्हेज रेस्टॉरंटमध्ये वेटर/कॅप्टन, मुले/मुली त्वरीत पाहिजे. अनुभव असल्यास प्राधान्य. आकर्षक व वेळेवर पगार, जेवणाची सोय, बाहेरगावचा असल्यास राहण्याची सोय. संपर्क–९८९०२१७६५१

**नवीन एअरजेट** युनिटसाठी मॅनेजर आणि (मास्टर विव्हर बिमगेटर) टीम आणि दिवस पाळीसाठी वॉचमन पाहिजे. फक्त अनुभवींना प्राधान्य. मो. ९९७०११२३४६.

**मिनिडोअर तीन** चाकी टेम्पो व टाटा सुमोवर निर्व्यसनी व अनुभवी लायसनधारक ड्रायव्हर पाहिजे. (लोकल कामासाठी). मो. ९८९०००९४८६.

**बसमध्ये क्लिनर** कामासाठी मुलगा पाहिजे आहे. मो. ८३७९९१५९२१

**चपाती व भाकरी** करणेसाठी व भांडी कामासाठी लेडीज कामगार पाहिजेत. मो. ९८८१४७५०१८.

**सेल्स एक्झिक्युटीव्ह** पाहिजे. किमान बारावी पास, उत्तम संभाषण कौशल्य, फ्रेशर/अनुभवी, लेडीज/जेन्टस् फॅशन डिझायनिंग झालेल्यांना प्राधान्य. ९४२११०५४४४.

**अकौंटट पाहिजे** टॅली ईआरपी अकौंटिंग जीएसटी रिटर्न तसेच बँक री कन्सिलेशनची संपूर्ण माहिती असलेल्या किमान १ वर्षांचा अनुभव असलेल्यांनी रिझ्युमसह भेटावे. ९४२११०५४४४.

**पार्टटाईम व फुल** टाईमसाठी बारमध्ये वेटर पाहिजेत. मो. ८८०६४८४९१९.

**फर्निचर शोरूममध्ये** सेल्स कामासाठी शिकाऊ/अनुभवी लेडीज कामगार पाहिजे. कोल्हापूर नाका, इचलकरंजी. मो. ९७६२०२७०१४, ८९९९०९३९६९.

**पॅकींग कामासाठी** पुरूष व महिला पाहिजेत. येण्याजाण्यासाठी गाडीची सोय मोफत, पगार पुरूष पर डे ४२०/–, महिला पर डे ३५०/–, सोमवारी सुट्टी, आठवड्याला पगार मिळेल. शिरोली एमआयडीसी कोल्हापूर, मो. ९२७०९८५१८५, ९३२२८८१५५८.

**Workers Required** For Machine Shop. CNC-VMC Operator:-2, Job Quality Inspector:- 2, Spm Operator:- 2, HR Personnel:- 1, Contact:- 9158434345, Shri Padmavati Auto Components Korochi.

**ऑफिस कामासाठी** शिकाऊ मुले पाहिजेत व कॉम्प्युटर डिझायनर (डीटीपी) ऑपरेटर पाहिजेत. संपर्क– ९९७०००७०५१.

**घरातून अथवा** ऑफिसमधून २ ते ३ तास काम करून एक्स्ट्रा इन्कम मिळवा. मो. ७४९८००३७८३.

**रेडीमेड कापड** दुकानासाठी सेल्समन/सेल्सगर्ल पाहिजे. आकर्षक पगार व कमिशन. संपर्क– महालक्ष्मी कापड दुकान, इचलकरंजी.९८५०८५८६०२.

**मॅकॅनिकल कंपनीमध्ये** फक्त डे शिफ्ट साठी १० वी/१२ वी व पदवीधर मुलांची व डे/नाईट शिफ्टसाठी आयटीआय/डिप्लोमा झालेले किंवा सीएनसी/व्हीएमसी ऑपरेटरची भरती सुरू, इचलकरंजी. मो. ८९५६१६९६९६, ९१७५९६७७६७.

**पाहिजेत चेतक** शोरूममध्ये गाडी वॉशिंग करण्यासाठी मुलगा पाहिजे. मो. ९९२३०६५४४१

**अभिज फार्म** हाऊस कामासाठी जोडपे पाहिजे. मो. ८३८२८३१००६, ९५९५९५७३०९.

**वायडिंग कामासाठी** अनुभवी दिवाणजी व कामगार पाहिजे. मो. ९५९५१७९२९२.

**खानावळीमध्ये किचन** हेल्पर लेडीज/जेन्टस् पार्ट टाईम/फुल टाईम पाहिजे तसेच चपाती, भाकरीसाठी लेडीज पाहिजे. मो. ९१३०१२००८०

**पारले बिस्किट** एजन्सीमध्ये मालाची ऑर्डर घेण्यासाठी सेल्समन पाहिजे. (मार्केटिंगचा अनुभव आवश्यक). मो. ९६०४२६६०२१.

**बिरदेव झेरॉक्स** सेंटरमध्ये लेडीज ऑपरेटर पाहिजे. मेन रोड, गोविंदराव हायस्कूल समोर, इचलकरंजी. मो. ९८९०५८०२६९.

**पंचवटी चित्रपटगृहमध्ये** तिकीट बुकींगसाठी लेडीज पाहिजे. मो. ९६२३१५०१०३, इचलकरंजी.

**सांगलीमध्ये व्हेज** हॉटेलमध्ये लेडीज किंवा जोडपे पाहिजे. मो. ८४८४००२२८९, ९५६१०२८३०५.

**ऑफिस कामासाठी** (मुली) १२ वी उत्तीर्ण, संगणक ज्ञान असणारी, टायपिंग ३० असणारी मुलगी पाहिजे. संपर्क– श्री बालाजी ड्रायव्हिंग स्कुल, इचलकरंजी. मो. ९८५०११४६६०.

**चार चाकी** गाडी शिकवण्यासाठी अनुभवी ड्रायव्हर पाहिजे. संपर्क– श्री बालाजी ड्रायव्हिंग स्कूल, इचलकरंजी. मो. ९८५०११४६६०.

**अर्जंट सिक्युरिटी** गार्ड पाहिजेत. ८ तास ड्युटी, सर्व सुविधा उपलब्ध, लक्ष्मी इंडस्ट्रीज, हातकणंगले व रूई करीता. मो. ९६०४६३९१०३.

**अर्जंट शिपाई** पदे २ भरणेचे आहेत. पुरूष/स्त्री. मो. ९८२२६५८४७६, ९१५८८९१८८५, आकर्षक पगार.

**डॉ. परदेशी हॉस्पिटल–**नर्सिंग कामासाठी अनुभवी एएनएम/जीएनएम स्टाफ पाहिजे व कंपौंडर कामासाठी मुले व मुली पाहिजेत. जिव्हाजी मंदिराजवळ, कोल्हापूर रोड, इचलकरंजी.

**ड्रायव्हर पाहिजे.** छोटा हत्ती मालवहातुक गाडीवर ट्रान्सपोर्ट लायसनधारक (LMV-TR) अनुभवी हुशार ड्रायव्हर पाहिजे. संपर्क–९८९०२२०९४३, ७५१७५०६६८२

**ऑफिस कामासाठी** हुशार आणि गरजू मुलगा अर्जंट पाहिजे. बोहरा मार्केट. संपर्क–९४१५७२११३४, ८९८३२०२०१६

**रिशेप्सनिस्ट पाहिजे.** सुशिलदत्त आर्थोपेडिक सेंटर, महासत्ता ऑफिसशेजारी, महासत्ता चौक, इचलकरंजी.

**भारतातील नामांकित ज्वेलरी** राजेश सिल्व्हर या मॅन्युफॅक्चरिंग कंपनीमध्ये काम करण्याची सुवर्णसंधी. कोल्हापूर जिल्ह्यांसाठी मार्केटिंग सेल्स एक्झीक्युटिव्ह नेमणे आहे. फ्रेशरसाठी १८ हजार व अनुभवींना २३ ते ३५ हजार. (कमीत कमी २ ते ५ वर्षापुढील) मो.७५०७३०८७८७

**इचलकरंजीकरिता** अर्जंट सिक्युरिटी भरती पगार–८ तास– १० हजार, १२ तास–१५ हजार. संपर्क–८८५७०४९५९०, ९३२५२७५३२५

**इचलकरंजी** छत्रपती संभाजी महाराज चौक येथे इंग्रजी माध्यमासाठी इ. १ ली ते ५ वी साठी शिक्षक/शिक्षिका पाहिजेत. संपर्क–८६५५१३७१७१, ८६८६१३७१७१

**गॅस एजन्सी ऑफिससाठी** महिला/पुरष ऑफिस स्टाफ पाहिजेत. कॉम्प्युटर ज्ञान आवश्यक. डेक्कन–शहापूर रोड, एचपी गॅस गोडावून, शहापूर. संपर्क–९५४५२२०१८९

**पाहिजेत.** फिटर–२, ड्रिलर–२, मिलर–२. संपर्क–९८९००६९५९८

**कापड दुकानात** अनुभवी सेल्समन व हेल्पर पाहिजेत. आकर्षक पगार+कमिशन देवू. संपर्क– ८३९०५३४१४३

**पाहिजेत.** अनुभवी वेल्डर मिस्त्री व हेल्पर पाहिजेत. (पगार– वेल्डर– २४ हजार, हेल्पर–१८ हजार) संपर्क– शिवमल्हार ट्रेडर्स, यड्राव फाटा. फोन–९०२८९२२२८९, ९८२२४५५६०४

**हॉस्पिटलमध्ये** रिसेप्शनिस्ट पाहिजे. बडबडे हॉस्पिटल, इचलकरंजी. संपर्क–८२६२९२७६१२

**जेंटस कामगार पाहिजेत.** बेसिक १३००० पगार. संपर्क– ९६०४०००८४५

**नामवंत कंपनीमध्ये** गरजू कामगार पाहिजेत. सेल्ससाठी महिला पाहिजेत. डाटा एन्ट्रीसाठी टॅली शिकलेले,गरजू कामगार, स्टोअर इनचार्जसाठी अनुभवी तरूण मुले, हेल्परसाठी तरूण मुले, कॉलिंगसाठी कॉप्युटर येणाऱ्या महिला पाहिजेत. स्टेशन रोड, इचलकरंजी. मो. ९२७२३३७९५५.

**इचलकरंजी येथे** किडस वेअरमध्ये अनुभवी व फ्रेशर मुले/मुली पाहिजेत. मो. ९९२२६२४६७६.

**इचलकरंजीमध्ये किडसवेअर** व लेडीज वेअरमध्ये अनुभवी/शिकाऊ स्टाफ पाहिजे. मो. ९३०९५१२४९६, ९८८१८१४१५१.

**होलसेल औषध दुकानामध्ये** कामाकरीता १० वी/१२ वी झालेली मुले/मुली पाहिजेत. पत्ता– सुशिल फार्मा एल.एल.पी. नाईट कॉलेजजवळ, इचलकरंजी. संपर्क–९०९६२६१२७२, मुलाखतीची वेळ– सकाळी १० ते दुपारी–१ वाजेपर्यंत. रविवार बंद.

## * भाड्याने देणे घेणे *

**७०० स्क्वे.**फूट दुकानगाळा भाड्याने देणे आहे. शाहू कॉर्नर, तारा हॉटेलसमोर, इचलकरंजी. मो. ९०२१३२१३३३.

**१ बीएचके/२** बीएचके फ्लॅट अर्जंट गहाणवट देणे आहे. कोल्हापूर नाका, जोशी दवाखान्याजवळ, इचलकरंजी. मो. ८३२९००९८०१.

**इचलकरंजीत मुख्य** रस्त्यालगत प्रतिक प्लाझा येथे नामांकित कंपनी शोरूम, ऑफिस, हॉस्पिटलसाठी व बंदिस्त गोडाऊनसाठी दुकानगाळे भाड्याने देणेचे आहे. मो. ८४४६८५१२५७.

**भाड्याने देणे** जनता चौक, अडत पेठ २ रा व ३ रा मजला १००० स्क्वे.फूट हॉल भाड्याने देणे आहे. संपर्क– ९९२२५४८२८५, ८३२९४५३२२१.

**दुकानगाळा भाड्याने** देणे महासत्ता चौक, आमराई रोड, स्वामी मळा, आयकॉन पार्क, इचलकरंजी. मो ७२१९३७२६९६.

**रूम भाड्याने** देणे. सर्व सोईनीयुक्त, मोठे तळे जवळ, इचलकरंजी. मो. ८८८८९६५१११.

**२ बीएचके** फ्लॅट भाड्याने देणे. प्रशस्त, शाकाहारी परिवारासाठी, आमराई रोड, शिक्षक कॉलनी समोर, चौगुले मळा, इचलकरंजी. मो. ९०९६१९१०७१, ८९९९०५७७२९.

**बंगला भाड्याने** देणे आहे. सर्व सोईनीयुक्त, फर्निचरसह, पार्किंग, २४ तास पाणी, पत्ता– छत्रपती कॉलनी, गल्ली नं. २, श्रीराम मंगल कार्यालय, कोरोची. मो. ९५९५४८५५६६

**गोडाऊन भाड्याने** देणे नवीन आरसीसी १७०० स्क्वे.फूट, विकास नगर, इचलकरंजी. मो. ९४२२०४६०९२, ८०८७९१८१०८.

**शहापूर चौकाजवळ** रोडटच गाळे, हॉटेल किंवा इतर कोणत्याही व्यवसायासाठी भाड्याने देणे आहे. जनता बँकेजवळ फॅमिली, विद्यार्थी व नोकरदारांना रूम उपलब्ध आहे. (घरगुती मेसची सोय) मो. ९९७५५७२७२१.

**१ बीएचके** भाड्याने (गहाणवट देणे) ९०० स्क्वे.फूट, पार्किंग, बोअरसह सर्व सोईनीयुक्त, यड्राव फाटा, रेणुका नगर, मो. ८३९०६६६६८५.

**गहाणवट देणे** आरसीसी ३ रूम सर्व सोईनीयुक्त गहाणवट देणे आहे. मो. ९०२८९०८८५२, इचलकरंजी. (भेटण्याची वेळ ४ ते ६)

**वन बीएचके** लक्झरी फ्लॅट भाड्याने देणे. बोअर पाणी+नदी+बिसलरीची सोय. पंचवटी टॉकीजमागे, तिरंगा चौक, तिवारे – ९०११७२३२९९.

**स्टेशन रोडवरील** शिरगावे कॉम्प्लेक्समधील १० बाय १५ चे चार दुकानगाळे एकमेकास लागून भाड्याने देणेचे आहेत. मो. ९८८१८१५००८, ९९२१११२३८९.

**२१ बाय ४५ स्क्वे. फूट** सुस्थितीत शेड व पुढील तेवढीच जागा भाड्याने देणे. सुतार मळा, इचलकरंजी. संपर्क– ८८८८३०००३८

**शाहू कॉर्नर** मुसळे बिल्डींगमधील पहिल्या मजल्यावरील २२५ स्क्वे. फूटाचे २ दुकनगाळे पतसंस्था, ऑफिस, ब्युटी पार्लर करिता भाड्याने देणे. संपर्क – ९४२२०४४९१४, ९१७५८३३९३९

## * इतर *

**तुमचं घरचं** पाणी शुध्द आहे किंवा नाही. फ्रीमध्ये चेक करून घ्या. वॉटर टेस्टर, मन्सुर सय्यद, मो. ७८८७५९३३५५.

## * आरोग्यविषयक *

**फिजिओथेरपी उपचार–** मानदुखी, पाठदुखी, कंबरदुखी, हातापायांना मुंग्या येणे, सर्व सांधेदुखी यावर अत्याधुनिक फिजीओथेरपी उपचारासाठी आजच भेटा. डॉ. स्वामी, हत्ती चौक. ९९७००६८९१०/०२३०– २९९११३०

## वाचकांसाठी निवेदन

**दै.महासत्ता** वृत्तपत्रामध्ये प्रसिध्द होणाऱ्या खरेदी–विक्री, नोकरीविषयक, भाड्याने देणे–घेणे, कर्ज, गुंतवणूक, व्यवसाय, आरोग्य विषयक व इतर सर्व प्रकारच्या जाहिरातीमधील मजकूर जाहीरातदाराने दिल्यानुसार प्रसिध्द केला जातो. प्रत्येक जाहीरातीच्या आशयाची सखोल शहानिशा करणे शक्य नसल्यामुळे यातील कोणत्याही माहितीच्या सत्यतेबाबत **दै.महासत्ता** व्यवस्थापन हमी घेऊ शकत नाही. याची वाचकांनी नोंद घ्यावी. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पुर्ततेसंदर्भात कोणतीही जबाबदारी **दै.महासत्ता** वृत्तपत्राचे मुद्रक, प्रकाशक, संपादक अथवा मालक हे जबाबदार राहणार नाहीत. याची कृपया नोंद घ्यावी. **व्यवस्थापक**

# कास पुष्प पठाराचा यावर्षीचा पर्यटन हंगाम आजपासून बंद

## पावसाअभावी फुलांचा बहर कमी

■ मेढा,ता.१२ प्रतिनिधी)–

**जागतिक वारसा स्थळ म्हणून ओळख असलेल्या कास पुष्प पठारावर यंदा पावसाचे अत्यल्प प्रमाण व दुष्काळसदृश परिस्थितीमुळे नैसर्गिक रानफुलांचा अपेक्षित बहर आलेला नाही. पावसाअभावी फुलांच्या वाढीवर व फुलोऱ्यावर प्रतिकूल परिणाम झाल्याने यंदाचा पुष्प हंगाम अपेक्षेप्रमाणे बहरू शकलेला नाही.**

या पार्श्वभूमीवर, कास पुष्प पठाराचा सन २०२६ मधील पर्यटन हंगाम १३ ऑक्टोबर २०२६ पासून बंद करण्यात येत आहे. त्यामुळे पर्यटकांनी याची नोंद घेऊन नियोजित भेटीचे योग्य नियोजन करावे, असे आवाहन सातारा वन विभागाच्या वतीने करण्यात आले आहे.

कास पठार हे जैवविविधतेने समृद्ध आणि दुर्मिळ रानफुलांसाठी प्रसिद्ध असलेले संवेदनशील नैसर्गिक क्षेत्र आहे. या परिसरातील जैवविविधतेचे संरक्षण व संवर्धन करणे ही सर्वांची सामूहिक जबाबदारी आहे. निसर्गातील बदलत्या परिस्थितीचा आदर करून पर्यावरण संवर्धनासाठी नागरिकांनी वन विभागास सहकार्य करावे, असे आवाहन वनपरिक्षेत्र अधिकारी, मेढा यांनी केले आहे.



# छ.राजाराम कारखान्याच्या गळीत हंगामाचा शुभारंभ

■ कोल्हापूर, ता.१२ (प्रतिनिधी)–

**कसबा बावडा येथील श्री छत्रपती राजाराम सहकारी साखर कारखान्याचा सन २०२६–२७ च्या गळीत हंगामाचा शुभारंभ सोमवारी कारखान्याचे मार्गदर्शक संचालक माजी आमदार महादेवराव महाडिक यांच्या हस्ते झाला.**

कारखान्याने यंदाच्या हंगामात प्रतिदिन ५००० मे.टन ऊस गाळप करण्याच्या दृष्टीने कारखान्याची तोडणी व वाहतूक यंत्रणा सज्ज करण्यात आली असून, सभासद शेतकऱ्यांचा ऊस वेळेत गाळपासाठी आणण्याचे नियोजन करण्यात आले आहे. कारखान्याचे चेअरमन आमदार अमल महाडिक यांनी सांगितले की, कारखान्याचा १८.५ मेगावॅट क्षमतेचा सहवीज निर्मिती प्रकल्प व मशिनरी आधुनिकीकरणाचे काम पूर्ण झाले असून, हे प्रकल्प यंदाच्या गळीत हंगामापासून कार्यान्वित होणार आहेत. यामुळे कारखान्याची कार्यक्षमता व उत्पादन वाढण्यास मदत होणार आहे.

या प्रसंगी कारखान्याचे व्हा. चेअरमन गोविंदा दादू चौगले, संचालक मंडळ, कार्यकारी संचालक प्रकाश चिटणीस, वसंतदादा ऊस तोडणी–वाहतूक संस्थेचे पदाधिकारी, छत्रपती राजाराम नागरी सहकारी पतसंस्था व श्री छत्रपती राजाराम कारखाना नोकर सहकारी सोसायटीचे पदाधिकारी, शेतकरी सभासद कारखान्याचे सर्व अधिकारी व कर्मचारी तसेच ऊस तोडणी–वाहतूक कंत्राटदार उपस्थित होते.

# सेवा संकल्प अभियानांतर्गत सोळा हजार ६८३ दाखल्यांचे वितरण

कोल्हापूर,ता.१२ (प्रतिनिधी)–

**सेवा संकल्प अभियानांतर्गत कोल्हापूर जिल्हा परिषदेमार्फत ग्रामपंचायत स्तरावर विविध लोकाभिमुख उपक्रम राबविण्यात आले. या माध्यमातून जिल्ह्यातील लाभार्थ्यांना एकूण १६ हजार ६८३ दाखल्यांचे वितरण करण्यात आले. तसेच ६१० ग्रामपंचायतींमध्ये ८ हजार ३७९ वृक्षांची लागवड करण्यात आली.**

गावांमध्ये स्वच्छता, पर्यावरण संवर्धन आणि लोकसहभाग वाढविण्याच्या उद्देशाने जिल्ह्यातील सर्व १ हजार २६ ग्रामपंचायतींमध्ये श्रमदान उपक्रम राबविण्यात आला. या उपक्रमांतून सार्वजनिक स्वच्छता, परिसराचे सुशोभीकरण आणि सामाजिक कार्यातील नागरिकांचा सहभाग वाढविण्यावर भर देण्यात आला. जिल्ह्यात राबविण्यात आलेल्या या विविध उपक्रमांमध्ये एकूण २७ हजार ५४८ नागरिकांनी सहभाग नोंदविला. शासकीय दाखल्यांचे वितरण, वृक्षारोपण आणि श्रमदान अशा उपक्रमांच्या माध्यमातून सेवा संकल्प अभियानाने ग्रामविकास, पर्यावरण संवर्धन आणि लोकसहभागाला चालना दिली.



# सीपीआरमध्ये कवटीवरील गुंतागुंतीची शस्त्रक्रिया यशस्वी

कोल्हापूर, ता.१२ (प्रतिनिधी)–

**राजर्षी छत्रपती शाहू महाराज शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व छत्रपती प्रमिलाराजे सर्वोपचार रुग्णालयाच्या (सीपीआर) न्यूरोसर्जरी विभागाने वैद्यकीय क्षेत्रात उल्लेखनीय यश मिळवले. रुग्णालयाच्या इतिहासात पहिल्यांदाच कवटीच्या तळाशी संबंधित अत्यंत गुंतागुंतीच्या दोन अत्याधुनिक शस्त्रक्रिया यशस्वीरीत्या पूर्ण करण्यात आल्या.**

शस्त्रक्रियेनंतर संबंधित रुग्णांनी वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ यांची प्रत्यक्ष भेट घेऊन कृतज्ञता व्यक्त केली. तसेच सीपीआर प्रशासनाचे व डॉक्टरांचे मनापासून आभार मानले. सीपीआरच्या या यशामुळे आता कोल्हापूरसह संपूर्ण पश्चिम महाराष्ट्रातील सर्वसामान्य रुग्णांना अशा महागड्या आणि अत्याधुनिक न्यूरोसर्जिकल उपचारांसाठी खासगी रुग्णालयांवर अवलंबून न राहता शासकीय रुग्णालयातच उच्च दर्जाची सुविधा उपलब्ध झाली आहे.

या मोहिमेत एंडोस्कोपिक एंडोनेझल ट्रान्सस्फेनॉइडल पद्धतीद्वारे नाकाच्या मार्गाने जाऊन पिट्युटरी ट्युमर काढण्याची पहिली शस्त्रक्रिया यशस्वी झाली. या आधुनिक तंत्रज्ञानामुळे पारंपरिक पद्धतीप्रमाणे कवटी उघडण्याची (क्रेनियोटॉमी) गरज भासत नाही, ज्यामुळे रुग्णांना शस्त्रक्रियेनंतर होणारा त्रास अत्यंत कमी होतो व ते जलद गतीने बरे होतात.दुसऱ्या एका क्लिष्ट प्रकरणात एथमोइड सायनसमधून मेंदू व कवटीच्या तळाकडे विस्तारलेला फंगल बॉल अत्यंत कौशल्याने आणि सुरक्षितरीत्या बाहेर काढण्यात आला.

या दोन्ही महत्त्वपूर्ण शस्त्रक्रिया न्यूरोसर्जरी विभागाचे डॉ. तेजस कामत यांनी स्वतः पार पाडल्या. त्यांना कान, नाक व घसाशास्त्र विभागाच्या सहयोगी प्राध्यापक डॉ. वासंती पाटील यांचे सहकार्य लाभले.डॉ. तेजस कामत म्हणाले, शासकीय रुग्णालयात अशा प्रकारच्या अत्याधुनिक व गुंतागुंतीच्या शस्त्रक्रिया यशस्वी होणे ही संपूर्ण संस्थेसाठी अत्यंत अभिमानास्पद बाब आहे. योग्य नियोजन, आंतरविभागीय समन्वय आणि तज्ज्ञांच्या सहकार्यामुळेच हे यश साध्य झाले. या ऐतिहासिक कामगिरीसाठी वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ यांचे मार्गदर्शन लाभले.

अधिष्ठाता डॉ. सदानंद भिसे, वैद्यकीय अधीक्षक डॉ. राजेंद्र मदने, उपवैद्यकीय अधीक्षक डॉ. गिरीष कांबळे, शल्यचिकित्सा विभागप्रमुख डॉ. वसंत देशमुख आणि कान, नाक व घसाशास्त्र विभागप्रमुख डॉ. अजित लोकरे यांच्यासह भूलशास्त्र विभाग, क्ष–किरण विभाग आणि परिचारिका कर्मचाऱ्यांचे मोठे योगदान लाभले.

# जुगार अड्ड्यावर छापा; ९ जण ताब्यात

हुपरी, ता. १२ (प्रतिनिधी)–

**रेंदाळ (ता. हातकणंगले) येथील अंबाईनगर परिसरातील एका बंद घरात सुरू असलेल्या जुगार अड्ड्यावर रविवारी रात्री पोलिसांनी धाड टाकून ९ जणांवर गुन्हा दाखल केला. गेल्या पाच दिवसांतील पोलिसांची ही दुसरी मोठी कारवाई असल्याने जुगार व अवैध धंदे चालकांचे धाबे दणाणले आहेत. या कारवाईत महागडे मोबाईल व रोख रक्कम असा एकूण १ लाख ६४ हजार ७० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला.**

रेंदाळ येथील अंबाईनगरमधील विजय गोसावी याच्या बंद घरात तीन पानी पत्त्यांचा जुगार सुरू असल्याची माहिती मिळाली. त्यानुसार पोलिसांनी सदर घरावर अचानक छापा टाकला. त्यावेळी खोलीत ९ जण पैसे लावून जुगार खेळताना रंगेहात पकडले गेले.

विकास शिवाजी गोसावी (वय ३६),विजय शिवाजी गोसावी (वय ३८.),राजेश शिवाजी गोसावी (वय ४२.)धीरज राजेश गोसावी (वय २२, सर्व रा. अंबाईनगर, रेंदाळ) किरण अनिल गोसावी (वय ३२.),आकाश बाबासो गोसावी (वय २७ .),विनोद संभाजी गोसावी (वय ३१. सर्व रा. गुलमोहर कॉलनी, रेंदाळ),अर्जुन नेताजी गोसावी (वय ३६.), पंकज अशोक शिंदे (वय ३६, दोघे रा. शिवाजी नगर, हुपरी) अशी गुन्हा दाखल झालेल्यांची नावे आहेत.

# गगनगिरी महाराज मठात कुंकूमार्चन पूजा

कोल्हापूर,ता.१२ (प्रतिनिधी)–

**नवरात्रौत्सवानिमित्त २० ऑक्टोबरपर्यंत प.पू. स्वामी गगनगिरी महाराज मठात महालक्ष्मी श्री यंत्रावर चौंडेश्वरी व महालक्ष्मी देवीच्या सानिध्यात व गगनगिरी महाराजांच्या तपोभुमीत कुंकूमार्चन पूजा व महिलांच्या हस्ते सामूहिक महाआरतीचे आयोजन केले आहे.**

१३ ऑक्टोबरला देवीची मूर्ती अर्पणकर्ते तुषार खुळे भोगवे येथील महापुरुष भजन मंडळ व राधानगरीतील फेजीवडे येथील श्री भराडी देवी भजन मंडळ यांचा कार्यक्रम होणार आहे.१४ रोजी वायरी-मालवण येथील भूतनाथ प्रासादिक भजन मंडळचे भालचंद्र केळूसकर व भुदरगडमधील बोंगार्डेवाडी विठू माऊली महिला भजन मंडळ (ओरोस) येथील श्री विश्वकर्मा भजन मंडळचे अमित मेस्त्री आणि शिष्य परिवार व पडळीतील शिव गगनगिरी भजनी मंडळचे विश्वास मोरे कार्यक्रम सादर करतील.१५ रोजी मुडये दज प्रासादिक भजन मंडळचे उमाकांत मुंडये, श्री अंबाबाई दत्तपंथी भजनी मंडळे, श्री महापुरुष भजन सेवा संघतर्फे अमोल वाईकर, स्वामी गगनगिरी भजनी मंडळकडून विलास पाटील कार्यक्रम सादर करतील. १६ रोजी वारकरी भजन मंडळचे विकास जानकर, देव रवळनाथ प्रासादिक भजन मंडळ (फोंडाघाट)चे साहील पारकर, विठू माऊली भजन मंडळचे सागर सावंत कार्यक्रम सादर करतील.१७ रोजी जय गणेश प्रासादिक भजन मंडळ गाडेधाव-कोरजाईचे भालचंद्र सारंग, स्वामीगंध भजन मंडळ राशिवडेचे नागेश पाटील, श्री हनुमान भजन मंडळ (पारंपरीक भजन) विजय पाटील, आजीवली महिला हरीपाठ भजन मंडळचे बाबल्या राणे कार्यक्रम सादर करतील. १८ रोजी श्री गणेश भजन मंडळ (कोल्हापूर)चे क्षितीज पाटील, सरस्वती स्वस्नागिणी घुमट आरती महिला (गोवा), सातेरी माऊली प्रासादिक भजन मंडळ मालवण-कट्टाचे हेमंत परब, संकल्प कुंकूमार्चन, गुरुमाऊली गांगेश्वर प्रासादिक महिला भजन मंडळ शिरगाव-देवगडच्या माया अनुभवने कार्यक्रम सादर करतील. १९ रोजी स्वामी गगनगिरी भजन मंडळचे एन.टी. कांबळे, जय भवानी भजन मंडळ जुनी पेठ, देवभौम प्रासादिक भजन मंडळ आंदूर्ले-जुवेवाडीचे वासुदेव सडवलेकर व २० रोजी राधाकृष्ण संगीत विद्यालय सिंधुदूर्गच्या वीणा दळवी, हेमंत दळवी पारंपरीक भजन सादर करतील.

# उचगावात दहा किलो गांजासह दोघे ताब्यात

कोल्हापूर,ता.१२ (प्रतिनिधी)–

**गांजा विक्रीसाठी उचगाव परिसरात आलेल्या दोन युवकांना स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेच्या (एलसीबी) पथकाने रविवारी रात्री अटक केली. राम मारुती सावंत (वय २१, रा. यादववाडी, शिरोली पुलाची) आणि राज गणेश पारखे (वय २२, रा. गणपती मंदिरा जवळ, ता. हातकणंगले) अशी त्यांची नावे आहेत. त्यांच्याकडून १० किलो गांजा, मोपेड आणि तीन मोबाईल हँडसेट असा एकूण ६ लाख ६० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. याप्रकरणी गांधीनगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे.**

जिल्ह्यातील अवैध व्यवसायांविरोधात कारवाई सुरू आहे. स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेचे पोलीस निरीक्षक सुशांत चव्हाण यांनी यासाठी पथक नियुक्त केले आहे. या पथकातील पोलीस अंमलदार वैभव पाटील आणि प्रदीप पाटील यांना माळीवाडा, उचगाव (ता. करवीर) येथे दोन युवक गांजा विक्रीसाठी येणार असल्याची गोपनीय माहिती मिळाली.या माहितीच्या आधारे पथकाने परिसरात सापळा रचला. गांजा विक्रीसाठी आलेल्या दोघांना ताब्यात घेऊन त्यांची झडती घेतली असता त्यांच्याकडे १० किलो गांजा आढळला. पोलिसांनी गांजासह मोपेड आणि तीन मोबाईल हँडसेट जप्त केले.

चौकशीदरम्यान संबंधित युवकांनी शहरासह ग्रामीण भागात गेल्या काही महिन्यांपासून चोरीछुपे गांजा विक्री केल्याची माहिती पोलिसांना दिल्याचे सांगण्यात आले. या दोघांविरोधात गांधीनगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून, या प्रकरणाचा पुढील तपास सुरू आहे.

या कारवाईत पोलीस उपनिरीक्षक जालिंदर जाधव यांच्यासह पोलीस अंमलदार महेंद्र कोरवी, सत्यजित तानुगडे, संतोष बरगे, संदीप सावंत, विशाल खराडे, शिवानंद मठपती, रवी लंबे, गजानन गुरव, सत्यजित सावंत, सागर चौगले, अशोक पवार, महादेव कुऱ्हाडे आणि अरुण धनगर यांनी सहभाग घेतला.




# कुंभी-कासारीचे सात लाख टन ऊस गाळपाचे उद्दिष्ट-आ.नरके

■ कुडित्रे,ता.१२ (प्रतिनिधी)–

**कुडित्रे येथील कुंभी-कासारी सहकारी साखर कारखान्याने २०२६-२७ च्या गळीत हंगामासाठी सात लाख मेट्रिक टन ऊस गाळपाचे उद्दिष्ट ठेवले आहे. त्यासाठी कारखान्याचे आधुनिकीकरण व विस्तारीकरण पूर्ण झाले असून, यंत्रणा गाळपासाठी सज्ज झाली आहे. शेतकऱ्यांनी आपला संपूर्ण ऊस कारखान्याकडे पाठवून सहकार्य करावे, असे आवाहन कारखान्याचे अध्यक्ष आमदार चंद्रदीप नरके यांनी केले.**

कुडित्रे येथील कुंभी-कासारी सहकारी साखर कारखान्याच्या २०२६-२७ हंगामाच्या बॉयलर अग्निप्रदीपन समारंभात ते बोलत होते. कारखान्याच्या संचालिका धनश्री प्रकाश पाटील व प्रकाश पाटील यांच्या हस्ते बॉयलरचे विधिवत पूजन करण्यात आले.

आमदार नरके म्हणाले, कारखान्याने २०२५-२६ हंगामातील एफआरपीची संपूर्ण रक्कम ऊस उत्पादक शेतकऱ्यांना अदा केली आहे. आगामी हंगामासाठी तोडणी यंत्रणा सज्ज असून, मशिनरीच्या देखभाल व दुरुस्तीची कामे पूर्ण करण्यात आली आहेत. यंदा कारखान्याकडे लागण व खोडवा मिळून १० हजार ६८४ हेक्टर ऊस क्षेत्राची नोंद झाली आहे. शेतकऱ्यांच्या सहकार्याने निर्धारित गाळप उद्दिष्ट पूर्ण करण्याचा कारखान्याचा प्रयत्न राहणार आहे.

साखर उद्योगाच्या आर्थिक स्थैर्यासाठी केंद्र व राज्य सरकारने धोरणात्मक निर्णय घेणे आवश्यक आहे. ऊस उत्पादक शेतकऱ्यांना दिल्या जाणाऱ्या रास्त व किफायतशीर दरात (एफआरपी) तसेच उत्पादनाच्या अन्य घटकांच्या खर्चात सातत्याने वाढ झाली आहे. मात्र, २०१९ नंतर साखरेच्या किमान विक्री दरात (एमएसपी) वाढ झालेली नाही. त्यामुळे वाढता उत्पादन खर्च आणि एफआरपी यांचा ताळमेळ साधताना साखर कारखान्यांना आर्थिक अडचणींचा सामना करावा लागत असून, कारखान्यांवरील कर्जाचा बोजाही वाढत आहे, असे नरके यांनी सांगितले.साखर कारखान्यांची आर्थिक स्थिती सक्षम करण्यासाठी केंद्र सरकारने साखरेचा किमान विक्री दर प्रतिक्विंटल पाच हजार रुपये करावा. तसेच इथेनॉलच्या दरात वाढ करावी. करार संपलेल्या सहवीज निर्मिती प्रकल्पांमधून उत्पादित विजेला पूर्वीप्रमाणे दर मिळावेत. याशिवाय सहवीज प्रकल्पांना पूर्वी मिळणाऱ्या करसवलतींच्या धर्तीवर कारखान्यांना आर्थिक दिलासा द्यावा, अशी मागणीही त्यांनी केली. यावेळी कारखान्याचे उपाध्यक्ष सरदार पाटील, कार्यकारी संचालक धीरजकुमार माने, सचिव प्रशांत पाटील यांच्यासह सर्व संचालक, शेतकरी व कर्मचारी उपस्थित होते.

मुंबई,ता.१२ - रणजी ट्रॉफीमध्ये चंदीगडविरुद्ध खेळताना मुंबईच्या तुषार देशपांडेने हॅट्ट्रिक करत इतिहास रचला. त्याने अवघ्या सात षटकांत पाच बळी टिपत मुंबईला या सामन्यावर वर्चस्व मिळवून दिले. प्रथम फलंदाजी करताना मुंबईने ४२९ धावा केल्या. प्रत्युत्तरात, चंदीगडचा पहिला डाव ७८ धावांवर आटोपला. यामध्ये निशंक बिर्लाने सर्वाधिक ३३ धावा केल्या.

## करवीर तालुक्यातील ठरावधारकांचा

# छत्रपती शाहू शेतकरी विकास आघाडीला पाठिंबा

■ कोल्हापूर,ता.१२ (प्रतिनिधी)–

**करवीर तालुक्यातील ठरावधारकांचा छत्रपती शाहू शेतकरी विकास आघाडीला भरभक्कम पाठिंबा आहे, असा विश्वास करवीर तालुक्यातील नेतेमंडळींनी व्यक्त केला. निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर झालेल्या नियोजनाच्या बैठकीला नेतेमंडळी उपस्थित होते.**

राहुल पी. एन. पाटील म्हणाले, करवीर तालुक्यातील ठरावधारकांची संख्या जिल्ह्यात उच्चांकी आहे. एकूण ८६५ मतदार संख्या असलेल्या या तालुक्याने सर्वांनाच नेहमीच खंबीर साथ दिली आहे. या निवडणुकीतही शेतकरी, दूध उत्पादक सभासद छत्रपती शाहू शेतकरी विकास आघाडीला पाठिंबा देतील.

विश्वास नारायण पाटील म्हणाले, गोकुळ दूध संघाचे शिल्पकार स्व. आनंदराव पाटील-चुयेकर यांच्या विचारांवरच आमची वाटचाल सुरू आहे. दूध उत्पादक शेतकऱ्यांच्या सर्वांगीण कल्याणासाठी आम्ही सदैव कटिबद्ध आहोत. नेहमीप्रमाणेच या निवडणुकीतही करवीर तालुक्यातून छत्रपती शाहू शेतकरी विकास आघाडीला ऐतिहासिक मताधिक्याची नोंद होईल. एस. आर. पाटील म्हणाले, संपूर्ण जिल्ह्याचा दौरा केल्यानंतर छत्रपती शाहू शेतकरी विकास आघाडी उच्चांकी आणि ऐतिहासिक मताधिक्याने येणार, ही काळ्या दगडावरची पांढरी रेघ आहे.

प्रताप पाटील-कावणेकर म्हणाले, गोकुळ दूध संघ सबंध महाराष्ट्रात अग्रेसर आहे. येत्या पाच वर्षांत गोकुळ दूध संघाला देशपातळीवर अग्रेसर करण्यासाठी सर्वांनी मिळून प्रयत्न करूया. या प्रयत्नांना सर्वसामान्य दूध उत्पादक सभासद निश्चितच साथ देतील.

अजित पाटील-परीतेकर म्हणाले, महायुतीच्या छत्रपती शाहू शेतकरी विकास आघाडीने एकजुटीची मोट बांधलेली आहे. दूध उत्पादक सभासदांनीही छत्रपती शाहू शेतकरी विकास आघाडीला प्रचंड बहुमताने विजयी करण्याचा निर्धार केला आहे.

# सावर्डे बुद्रुक येथे एकाचा सर्पदंशाने मृत्यू

बिद्री ता. १२ (प्रतिनिधी)–

**कागल तालुक्यातील सावर्डे बुद्रुक येथील विकास शामराव परीट ( वय ४०) यांचा सर्पदंशाने मृत्यू झाला.**



सोमवारी सकाळी विकास परीट हे शेतात मळलेले भात आणण्यासाठी गेले होते. तेथे त्यांना घोणस जातीच्या सर्पाने दंश केला. त्यांना उपचारासाठी मुरगूड येथील ग्रामीण रुग्णालय नेण्यात आले. मात्र उपचारापूर्वीच त्यांचा मृत्यू झाल्याचे डॉक्टरांनी घोषित केले. शवविच्छेदन करून मृतदेह नातेवाईकांच्या ताब्यात देण्यात आला. या घटनेची नोंद मुरगूड पोलिसात झाली आहे. ते एम. आय. डी. सी. मध्ये खासगी नोकरी करत होते. त्यांच्या मागे पत्नी, मुलगा,आई, भाऊ, भावजय असा परिवार आहे.

## जाहीर नोटीस

**मौजे तारदाळ** येथील **गट नंबर ७५९** पैकी **भुखंड क्रमांक** २ पैकी क्षेत्र २२७५-० चौरस फुट यासी चतुःसिमा- **पुर्वेस**-मस्जिद ची जागा, **पश्चिमेस**- मोटे यांची मिळकत, **दक्षिणेस**-बियानी यांनी विक्री केलेली मिळकत, **उत्तरेस**- १५ फुट रुंदीचा रस्ता. सदरची मिळकत ही **चंद्रकांत सोपान चव्हाण यांचे वतीने संतोष भाऊसो माने** रा.इचलकरंजी यांनी आमचे अशिलांचेकडून संचकार रक्कम स्वीकारून त्यांना **संचकार पावती** करून दिलेली आहे. सदर मिळकती संदर्भात कोणाचा कोणताही हक्क, दावा, पोटगी, बोजा, करार, इजमेंट इत्यादी वगैरे असलेस सदर नोटीस प्रसिध्दीपासून ७ दिवसांचे मुदतीत खालील पत्यावर कागदपत्रासह लेखी तक्रार नोंदवावी. म्हणून दिली नोटीस सही ता.१२/१०/२०२६

**ॲड.शिवकुमार सुखदेव लकडे**
**३/१५३, देवमोरेवाडा, टाकवडे वेस, राणाप्रताप चौक, इचलकरंजी, मो.९८८१०१४७२५**

## जाहीर नोटीस

**मौजे जांभळी** येथील गट नंबर ४६३ पैकी क्षेत्र ५००० **चौरस फुट** ची मिळकत. यासि चतुः सिमा- पुर्वेस - श्री. निशांत मुळे यांची मिळकत. पश्चिमेस - श्री. राहुल अंबाजी खोत यांची मिळकत, दक्षिणेस- रस्ता, उत्तरेस - श्री. कांबळे यांची मिळकत. सदरची मिळकत **सौ.श्रध्दा नागेश मुदगल. रा. इचलकरंजी** यांचे कब्जे मालकीची मिळकत असून त्यांनी सदर मिळकतीचे तोंडी करारपत्र आमचे अशिलांचे कडून संचकार रक्कम स्विकारून करारपत्र करून दिलले आहे. सदर मिळकती संदर्भात कोणाचा कोणताही हक्क, दावा, पोटगी, बोजा इजमेंट इत्यादी वगैरे असलेस सदर नोटीस प्रसिध्दीपासून ७ दिवसांचे मुदतीत खालील पत्यावर कागदपत्रासह लेखी तक्रार नोंदवावी. म्हणून दिली नोटीस सही ता. १२/१०/२०२६

**ॲड.आनंद प्रकाश पटवा**
**रा.आसरानगर, बस स्टॉप जवळ, सांगली रोड, इचलकरंजी मो.९४२०७७६४८६**

## जाहीर नोटीस

**मौजे शहापूर** येथील **गट नंबर ९१० पैकी क्षेत्र २९२.७५ चौरस मिटर** ची जागा व या वरील घर मिळकत यासी चतुः सिमा **पुर्वेस** - श्री.आनंदा माने यांची मिळकत. **पश्चिमेस** - २० फुट रुंदीचा रस्ता, **दक्षिणेस**-नीता कचरे व मारुती साळुंखे यांची मिळकत, **उत्तरेस- श्री. भालेराव यांची मिळकत.** सदरची मिळकत **१) श्रीमती लक्ष्मी दिनकर सासने, २) श्री. हंसराज दिनकर सासने, ३)श्री.श्यामसंभव दिनकर सासने, रा. इचलकरंजी** यांचे कब्जे मालकीची मिळकत असून त्यांनी सदर मिळकतीचे करारपत्र आमचे अशिलांकडून संचकार रक्कम स्वीकारून करून दिलेले आहे. सदर मिळकती संदर्भात कोणाचा कोणताही हक्क, दावा, पोटगी, इजमेंट इत्यादी वगैरे असलेस सदर नोटीस प्रसिध्दी पासून ७ दिवसांचे मुदतीत खालील पत्यावर प्रत्यक्ष कागदपत्रासह लेखी तक्रार नोंदवावी. म्हणून दिली नोटीस सही ता. १०/१०/२०२६

**ॲड.आनंद प्रकाश पटवा**
**रा.आसरानगर,बस स्टॉप जवळ, सांगली रोड, इचलकरंजी मो.९४२०७७६४८६**

## जाहीर नोटीस

**मौजे यड्राव**, ता. शिरोळ येथील **गट नं. ४७८ / अ पैकी** क्षेत्र हे . ०.१५.०० आर खुली जागा मिळकत चतुःसिमा **पुर्वेस** - बागवान यांची मिळकत, **पश्चिमेस** - २० फुट रस्ता, **दक्षिणेस**-पडियार वसाहत, **उत्तरेस**-ओपन स्पेस, येणेप्रमाणे चतुः सिमेतील मिळकत ही **शिवानिल टेक्सफॅब प्रा. लि. तर्फे डायरेक्टर श्रीनिधी प्रदिपकुमार बिरला रा. इचलकरंजी,** यांचे कब्जे मालकीची असून त्यांनी आमचे अशिलांशी मिळकत निर्वेध व निष्कर्जी असलेचे सांगुन, संचकार रक्कम स्विकारून त्यांच्याशी मिळकत विक्री करण्याचे संचकारपत्र केले आहे. तरी सदर मिळकतीबाबत कोणाचा हक्क, दावा, बोजा, वारसा, करार, इजमेंट इ. वगैरे असल्यास सदर नोटीस प्रसिध्दीपासुन ७ दिवसांचे मुदतीत खालील पत्त्यावर कागदपत्रासह लेखी तक्रार नोंदवावी. म्हणून दिली नोटीस.सही

ता.१२/१०/२०२६

**ॲड. अर्जुन तात्यासाहेब माने**
**गाळा नं . ३४, दुय्यम निबंधक ऑफीस शेजारी, राजाराम स्टेडियम, इचलकरंजी, मो .७८२०९०९७०५**

## जाहीर नोटीस

**मौजे खोतवाडी** येथील क.ग.नं. ९० पैकी बि. शे. प्लॉ.नं. १/अ मधील उत्तरेकडील क्षेत्र २०५३ चौ. फुटची मिळकत यासी चतुः सिमा-**पुर्वेस**-रस्ता, **पश्चिमेस** -प्लॉ.नं. १ / ब ची मिळकत, **दक्षिणेस** - प्लॉ.नं. १ / अ पैकी मिळकत, **उत्तरेस**- रस्ता. येणेप्रमाणे चतु:सिमेतील मिळकत ही सुजाता सुनिल शेडशाळे व श्वेता गिरीष शेटे, रा.खोतवाडी यांच्या मालकीची असुन त्यांनी सदरची मिळकत निर्वेध व निष्कर्जी असलेचा निर्वाळा देवून आमचे अशिलांना संचकारपत्राने खरेदी देवू केलेली आहे. सबब, सदर मिळकती बाबत कोणाचाही कसलाही हक्क संबंध, करार, बोजा वगैरे असलेस तो त्यांनी आजपासुन ०७ दिवसाचे आत आम्हास लेखी पटवून द्यावा. म्हणून दिली जाहीर नोटीस अशी दिनांक १२/१०/२०२६ इसवी रोजी.

**ॲड.ए.टी.पाटील**
**मु.पो. कोरोची, ता. हातकणंगले, जि. कोल्हापुर. मो.नं.९८६०८५९०२७.**

## जाहीर नोटीस

**मौजे शहापुर** येथील **गट नं.** २०२ पैकी प्लॉट नं. ०२ क्षेत्र चे क्षेत्र - ११९ - १ चौ. मी. खुली जागा मिळकत चतुः सिमा **पुर्वेस** - ४ फुट रूंदिचा बोळ, **पश्चिमेस** - कांबळे यांची मिळकत, **दक्षिणेस** - २० फुट रस्ता, **उत्तरेस**- जाधव यांची मिळकत, येणेप्रमाणे चतुः सिमेतील मिळकत ही **संजय धोंडिराम कापसे रा.शहापुर,** यांचे कब्जेमालकीची असून त्यांनी आमचे अशिलांशी मिळकत निर्वेध व निष्कर्जी असलेचे सांगुन, संचकार रक्कम स्विकारून त्यांच्याशी मिळकत विक्री करण्याचे संचकारपत्र केले आहे. तरी सदर मिळकतीबाबत विश्वमित्र नागरी सह. पतसंस्था मर्या. यांचा कर्ज बोजा वगळता कोणाचा हक्क, दावा, बोजा, वारसा, करार, इजमेंट इ. वगैरे असल्यास सदर नोटीस प्रसिध्दीपासून ७ दिवसांचे मुदतीत खालील पत्त्यावर कागद पत्रासह लेखी तक्रार नोंदवावी.म्हणून दिली नोटीस सही

ता.१२/१०/२०२६

**ॲड. अर्जुन तात्यासाहेब माने**
**गाळा नं . ३४, दुय्यम निबंधक ऑफीस शेजारी, राजाराम स्टेडियम, इचलकरंजी, मो .७८२०९०९७०५**

## जाहीर नोटीस

**मौजे तारदाळ येथील गट नं.** ४८५ /अ पैकी समजुतीच्या नकाशाप्रमाणे **प्लॉट नं. ९ चे क्षेत्र ८६५ चौरस फुटची मिळकत,** यासी चतु:सिमा- **पुर्वेस** - प्लॉट नं १०, **पश्चिमेस** - याच गटातील मिळकत, **दक्षिणेस** - प्लॉट नं ८, **उत्तरेस**- १८ फुट रुंदीचा रस्ता, सदरची मिळकत ही **रश्मी जितेंद्रसिंह हजारे रा. इचलकरंजी** यांचे कब्जे मालकीची मिळकत असून त्यांनी श्री. विठ्ठल कोंडिबा सावंत व श्री. संदिप पंढरीनाथ चव्हाण यांना वटमुखत्यार दिले असून त्यांनी आमचे अशिलांचेकडून संचकार रक्कम स्वीकारून त्यांना करारपत्र करून दिलेले आहे. सदर मिळकती संदर्भात छाया कॉर्नर नागरी सह. पतसंस्था मर्या. इचल. व्यतिरिक्त अन्य कोणाचा कोणताही हक्क, दावा, पोटगी, बोजा, करार, इजमेंट इत्यादी वगैरे असलेस सदर नोटीस प्रसिध्दीपासून ७ दिवसांचे मुदतीत खालील पत्यावर कागदपत्रासह लेखी तक्रार नोंदवावी. म्हणून दिली नोटीस सही ता. १२/१०/२०२६

**ॲड.आनंद प्रकाश पटवा**
**रा.आसरानगर,बस स्टॉप जवळ, सांगली रोड, इचलकरंजी मो.९४२०७७६४८६**

## खरेदीपूर्व जाहीर नोटीस

१) ता.हातकणंगले पैकी इचलकरंजी महानगरपालिका हद्दीत समाविष्ट असलेली मौजे शहापूर येथील क. ग.नं.३८, क्षेत्र हे. ३.०३.०० आर, आकार रू २.८० पैसे यापैकी बिगरशेती भूखंड नं. ७ याचा सि. स.नं. १८६२५/ब/७ चे क्षेत्र ९९.८० चौ.मी.ची खुली मिळकत यांसी चतुः सिमा पुर्वेस :-भुंखड नं.८ ची मिळकत, पश्चिमेस :- भूखंड नं.६ ची मिळकत, दक्षिणेस :- श्री. कुबेर मगदुम यांची मिळकत व उत्तरेस :- ६ मीटर रूंदीचा रस्ता.येणेप्रमाणे चतुः सिमेतील खूली प्लॉट मिळकत.२) वरील मिळकत ही "श्री सुर्यकांत शंकर पवार" यांचे मालकी वहीवाटीची असून सदरील मिळकती संदर्भात त्यांनी आमच्या अशिलांशी करारपत्र करून संचकार दाखल रक्कम स्विकारलेली आहे.३) सबब, सदरील मिळकतीवर कोणाचाही, कोणताही हक्क, करार, तारण गहाण दस्त, बक्षिस, वारसा हक्क, कोर्ट केसेस वगैरे हक्कसंबंध असतील तर तो त्यांनी सदरील नोटीस प्रसिध्द झालेपासून सात (७) दिवसांच्या आत खालील पत्यावरती लेखी कागदपत्रासह कळवावे. म्हणून दिली जाहीर नोटीस सही ता.१२.१०.२०२६

**ॲड.पंकज आ.पाटील**
**'श्री दत्त अपार्टमेंट'गाळा नं. १ सांगली नाका, इचलकरंजी मो. न. ९०२१२३७६८७**

## जाहीर नोटीस

मिळकतीचे वर्णन - जि. व तु. कोल्हापूर ता व पो. तु. हातकणंगले इचलकरंजी म न पा हद्दीत नव्याने समाविष्ट झालेले शहापूर येथील क.ग.नं. १३८ क्षेत्र हे. २.९४ आर आ.रु. १५.३० पै. यापैकी तुकडा नं. १ चे पुर्व बाजू कडील क्षेत्र २००० चौ. फुट व त्यावरील पडसर बांधीव घर मिळकत यासी चतु:सिमा पुर्वेस - २० फुट रस्ता, पश्चिमेस - कुंभार, दक्षिणेस - श्री. पिले व उत्तरेस - कांबळे यांची मिळकत येणेप्रमाणे चतु:सिमेतील मिळकत तदंगभूत वस्तुसह सर्व.

वर वर्णन केलेली मिळकत ही भरत निवृत्ती जाधव व इतर यांचे मालकी व वहिवाटीची मिळकत होय. सदर मिळकत भरत जाधव यांनी आमचे अशिलांना कायम खुश खरेदी देणेचे ठरवून तसा करार आमचे अशिलांचे लाभांत लिहून देऊन संचकार व पार्ट पेमेंट म्हणून भरीव रक्कम स्विकारली आहे. सदर करारन्वये आमचे अशिलांना मिळकत खरेदी करण्याचा अग्रहक्क आहे असे असताना भरत जाधव हे आमचे अशिलांचा हक्क डावलण्याचे हेतूने सदर मिळकत तिऱ्हाईत इसमांना विक्री करण्याच्या प्रयत्नात आहेत. तरी भरत जाधव यांचेशी वरील मिळकती संबंधी कोणीही कसल्याही प्रकारचा व्यवहार करु नये. याउपर ही सदर मिळकती संबंधी कोणी व्यवहार केलेस तो व्यवहार आमचे अशिलांचे मिळकत खरेदी करणेचे हक्कांवर बंधनकारक असणार नाही म्हणून कोणाचीही फसवणूक होऊ नये या उद्देशाने दिला जाहीर इशारा दि. ११/१०/२०२६

**ॲड.उदयसिंह वि.जाधव**
**नोटरी पब्लिकसो (भारत सरकार) १५/४१०, बंडगर माळ, इचलकरंजी ता. हातकणंगले जि. कोल्हापूर मो.८३२९६६१२४१**

## जाहीर नोटीस

तमाम लोकांना कळणेकरिता,

तालुका हातकणंगले पैकी मौजे कबनूर येथील गट नं. ७४७, क्षेत्र हे.१३.९५ आर, आकार रू.२८.१२ पैसे यापैकी हे. ०.१८.५९ आर,आकार रू.०.३७ पैसेची शेतजमीन मिळकत, यासी चतुःसिमा :- पूर्वेस नियोजित डी.पी. रस्ता, पश्चिमेस श्री. तांबे यांची याच गट नंबरमधील मिळकत, दक्षिणेस श्री. तांबे यांची याच गट नंबरमधील मिळकत व उत्तरेस याच गट नंबरमधील आळतेकर वगैरे यांची जमीन.

येणेप्रमाणे चतुःसिमेतील मिळकत ही शमशाद मेहबूब कलायगार यांच्या मालकी वहिवाटीची आहे. वर नमूद मालकांनी वरील मिळकत आमचे अशिलांना खरेदी देणेचे ठरवून संचकार रक्कम स्विकारली आहे. वर नमूद मिळकत निर्वेध व निष्कर्जी असलेची हमी वरील मिळकत मालकांनी आमचे अशिलांना दिली आहे. तथापि, सदर मिळकतीबाबत कोणाचाही खरेदी विक्री, करार,दावा,कब्जा, कूळ, तारण गहाण, बक्षीस, वाटणी, वारसा, वहिवाट, पोटगी, आरक्षण, संपादन, अन्य कोणाचा कर्ज, देणी अगर अन्य कोणत्याही स्वरूपाचे हक्कसंबंध असलेस सदर नोटीस प्रसिध्द झालेपासून सात दिवसाचे आत हक्काच्या कागदपत्राच्या अस्सल प्रतिसह लेखी हरकत आमचे खालील पत्यावर द्यावी.मुदतीनंतर कोणाचीही तक्रार चालणार नाही. म्हणून दिली जाहीर नोटीस सही.

तारीख १२/१०/२०२६ इ. रोजी.

**ॲड. सुनिल जे.विभुते**
**१३/११२७/२, महर्षि वाल्मिकी सोसायटी, पुजारी मळा, जुना चंदूर रोड, इचलकरंजी. मो.नं.९८८१७०३८३८**

## जाहीर इशारा नोटीस

**१) मिळकतीचे वर्णन**- १ अ. मौजे शिरढोण, ता.-शिरोळ येथील नवीन **क. ग.नं. ३४६/२ क. ग.नं. ३४६/ब,** क्षेत्र हे . ६ आर २२, यापैकी क्षेत्र हे.**० आर ८४,** आ.रु. ६५.७० पैसेची शेत मिळकत, १ब. **मौजे शिरढोण,** ता.- शिरोळ येथिल **क.ग.नं.** ९९४, क्षेत्र हे.० आर ७९, यापैकी **क्षेत्र हे. ० आर १३.१६,** आ.रु.६५.७० पैसेची शेत मिळकत, १क. मौजे शिरढोण, ता-शिरोळ येथिल सि.स.नं. ३१६ यापैकी **क्षेत्र १४४.६० चौ.मीची** मिळकत, सदर मिळकतीबाबत आमचे अशिल १. समीक्षा संजय आडगाणे २. राजश्री संजय आडगाणे रा- प. कोडोली यांनी **राजेंद्र बंडु आडगाणे**, रा-शिरढोण वगैरे ५ यांचे विरुध्द मे. दि.न्या.क.स्तर कुरुंदवाड यांचे कोर्टात रे.क.नं. ११७/२०२६ हा वाटपाचा, मनाईचा व हक्कज्ञापनाचा दावा दाखल केलेला आहे. सदरचा दावा हा मे. कोर्ट मजकुरी न्यायप्रविष्ठ आहे. याउप्पर वरील इसम हे आमचे अशिलांचा दावा मिळकतीमधील हक्क डावलणेचे हेतुने वरील मिळकत ही विक्री, तबदिल करु पाहत आहेत.

२) सबब, राजेंद्र बंडु आडगाणे रा.-शिरढोण वगैरे ५ यांचे बरोबर वरील मिळकतीबाबत कोणीही कोणताही व्यवहार करु नये. याउप्पर कोणीही व्यवहार केलेस तो मुळातच बेकायदेशीर असुन त्यांना कोणत्याही प्रकारचे हक्क वा अधिकर प्राप्त होणार नाहीत. व झालेले कथित व्यवहार हे आमचे अशिलांचे कायदेशीर हक्कावर बंधनकारक असणार नाहीत याची नोंद घ्यावी. कोणाचीही कोणतीही फसगत होवू नये म्हणुन दिली जाहीर इशारा नोटीस सही.

ता. १२/१०/२०२६.

**ॲड.आर.एम कुरणे**
**नारायण टॉकीज जवळ, मंगळवार पेठ, इचलकरंजी, मोबा.नं.९७६६९३७००९.**

# इतर कारखान्यांच्या बरोबरीने ऊस दर देणार

## प्रा.शिवाजीराव पाटील;भोगावती कारखान्याचा बॉयलर अग्नीप्रदीपन संपन्न

भोगावती,ता.१२(प्रतिनिधी)–

**गेल्या गळीत हंगामात उच्चांकी ऊस दर देणारा भोगावती सहकारी साखर कारखाना आगामी हंगामातही इतर कारखान्यांच्या बरोबरीने ऊस दर देण्यामध्ये कुठेही मागे राहणार नाही, असा ठाम विश्वास कारखान्याचे अध्यक्ष प्रा. शिवाजीराव पाटील यांनी व्यक्त केला आहे.**


भोगावती कारखान्याचे अग्नीप्रदीपन करताना संतोष पोर्लेकर, सौ.सुनिता पोर्लेकर,प्रा.शिवाजीराव पाटील व संचालक मंडळ.

शाहूनगर परिते (ता. करवीर) येथे भोगावती सहकारी साखर कारखान्याच्या बॉयलर अग्नीप्रदीपन प्रसंगी ते बोलत होते. यावेळी बोलताना प्रा. पाटील यांनी चालू वर्षातील हवामानावर भाष्य केले. एल निनोच्या प्रभावामुळे यावर्षी दुष्काळाचे सावट असून देशात साखर टंचाई निर्माण होण्याची शक्यता आहे. या पार्श्वभूमीवर सर्वच कारखाने अडचणीत आले आहेत. त्यामुळे केंद्र सरकारने साखरेला प्रतिक्विंटल ५ हजार रुपये आणि इथेनॉलला प्रतिलिटर ७० रुपये दर द्यावा, अशी महत्त्वपूर्ण मागणी त्यांनी केली.तसेच, स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे नेते राजू शेट्टी यांनी कारखाने व ऊस उत्पादक शेतकऱ्यांच्या हिताची भूमिका घेतल्याबद्दल प्रा.पाटील यांनी त्यांचे विशेष अभिनंदन केले. प्रारंभी कारखान्याचे संचालक संतोष पोर्लेकर आणि सौ. सुनिता पोर्लेकर यांच्या हस्ते विधीवत पूजा करून बॉयलरचे अग्नीप्रदीपन करण्यात आले.

यावेळी उपाध्यक्ष राजाराम कवडे, विश्वनाथ पाटील, सर्जेराव पाटील हळदीकर, जनरल मॅनेजर संजय पाटील, बाजीराव पाटील, शिवाजी डोंगळे,शशिकांत पाटील, प्रदीप पाटील यांच्यासह विविध संस्थांचे पदाधिकारी, सभासद, अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. स्वागत सागर पाटील यांनी केले.सूत्रसंचालन जनसंपर्क अधिकारी राजेंद्र पाटील यांनी केले. आभार उपाध्यक्ष राजाराम कवडे यांनी मानले.

# आपली सायबर सुरक्षा आपल्याच हातात

## पोलीस अधीक्षक नीलोत्पल;सायबर जनजागृती मोहिमेचा शुभारंभ

कोल्हापूर,ता.१२(प्रतिनिधी)

**देशात गेल्या वर्षी सायबर गुन्हेगारांनी लोकांना तब्बल २३००० कोटी रुपयांना गंडा घातला आहे. कॉलेजवयीन तरूण–तरूणींच्या फोटोंचे एआयद्वारे मॉर्फिंग करणे, अॅप, ईमेल व मेसेजमधून आमिष दाखवून मोबाईलचा ताबा घेणे, डिजिटल अटक करणे असे प्रकार वाढले आहेत. त्यांना आळा घालण्यासाठी मोबाईलचा वापर गरजेपुरता ठेवावा.**

आपली बँकिंग माहिती, फोटो, व्हिडिओ इतरांना देवू नयेत व तत्सम फाईल्स उघडू नयेत, ऑनलाईन आर्थिक व्यवहार खात्री करूनच करावेत.आपली सायबर सुरक्षा आपल्याच हातात असल्याचे प्रतिपादन जिल्हा पोलीस अधीक्षक नीलोत्पल यांनी केले.


सायबर जनजागृती मोहिमेच्या शुभारंभ प्रसंगी बोलताना पोलीस अधीक्षक नीलोत्पल.

कोल्हापूर जिल्हा पोलीस दलातर्फे महिनाभर चालणाऱ्या सायबर जनजागृती मोहिमेचा शानदार शुभारंभ जिल्हा पोलीस अधीक्षक नीलोत्पल यांचे हस्ते उंचगांव येथील न्यू इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजीमधून झाला.यावेळी ते बोलत होते.एनआयटीचे प्राचार्य डॉ. संजय दाभोळे यांनी सायबर सुरक्षेस पूरक असलेल्या मोबाईलमधील संयोजनांची व क्लुप्त्यांची माहिती दिली. यावेळी सायबर संस्थेच्या डी. के. शिंदे समाजकार्य विभागातील विद्यार्थ्यांनी प्रा. महेंद्र जनवाडे यांच्या मार्गदर्शनात सायबर क्राईम विषयावर पथनाट्य सादर केले. एनआयटीमधील एनएसएस आणि एआय नेक्सस क्लबच्या विद्यार्थ्यांनी सायबर सुरक्षा विषयक फलक प्रदर्शित केले.सायबर जनजागृती रथाला नीलोत्पल यांनी हिरवा झेंडा दाखवून रॅलीद्वारे रवाना केले. हा रथ या महिनाअखेरपर्यंत जिल्हाभर फिरून नागरिकांना सायबर जनजागृती करणार आहे. चुकून सायबर गुन्ह्यास बळी पडल्यास हेल्पलाईन नंबर १९३० द्वारे आमच्याकडे तक्रार नोंदवावी, असे सायबर क्राईम कोल्हापूरचे पोलीस निरीक्षक हारूगडे यांनी प्रस्तावना करताना सांगितले. सूत्रसंचालन प्रा. संग्रामसिंह पाटील यांनी केले. यावेळी सायबर क्राईम विभागाचे पोलीस अधिकारी व कर्मचारी, एनआयटीमधील रजिस्ट्रार संदीप पंडे, विभागप्रमुख, स्टाफ,विद्यार्थी उपस्थित होते.


शारदीय नवरात्रोत्सवाच्या पार्श्वभूमीवर श्री अंबाबाई देवीच्या दर्शनासाठी झालेली भाविकांची गर्दी.

## १ लाख ३७ हजार भाविकांनी घेतले श्री अंबाबाईचे दर्शन

कोल्हापूर,ता.१२(प्रतिनिधी)–

**शारदीय नवरात्रोत्सवाच्या पार्श्वभूमीवर कोल्हापूरात भाविकांची मोठी गर्दी झाली असून रविवारी नवरात्रोत्सवाच्या पहिल्याच दिवशी १ लाख ३७ हजार ९२१ भाविकांनी करवीर निवासिनी श्री अंबाबाईचे दर्शन घेतले.**

कोल्हापूरात भाविकांची श्री अंबाबाई देवीच्या दर्शनासह नवदुर्गाच्या दर्शनाला रीघ लागली असून सलग तीन दिवसांच्या सुट्टयामुळे कोल्हापूरात अंबाबाईच्या भाविकांच्या संख्येत लक्षणीय वाढ झाली आहे.राज्यभरातून अनेक भाविक कोल्हापूरात दाखल झाले. त्यामुळे कोल्हापूर शहर गर्दीने फुलून गेले आहे. पर्यटक व भाविकांच्या गर्दीमुळे वाहतूक व्यवस्थेवर मोठा ताण पडला असून वाहतूक पोलिसांची दमछाक होत असल्याचे दिसत आहे.पश्चिम महाराष्ट्र देवस्थान व्यवस्थापन समितीने भाविकांना श्री अंबाबाईचे सुलभ दर्शन व्हावे यासाठी दर्शन मंडप व दर्शन रांगेचे योग्य नियोजन केले असल्याचे पश्चिम महाराष्ट्र देवस्थान व्यवस्थापन समितीच्या सचिव वर्षा सांळुखे यांनी सांगितले. याशिवाय असंख्य भाविकांनी देवीचे मूखदर्शन घेतले.

## विद्यार्थ्यांना वह्यांचे वाटप

कोल्हापूर,ता.१२(प्रतिनिधी)–

**आत्मस्वरूप प्रमोद महाराज दत्त चॅरिटेबल ट्रस्ट, बोंद्रेनगर, पाडळी रोड, मथुरा नगरी, ता. करवीर यांच्या वतीने प. पू. आत्मस्वरूप प्रमोद महाराज यांच्या मार्गदर्शनाखाली आदर्श विद्यामंदिर, नागदेववाडी येथील विद्यार्थ्यांना वह्यांचे वाटप करण्यात आले.**

या कार्यक्रमाला महाराजांचे चिरंजीव प्रसाद आणि पराग उपस्थित होते. यावेळी आत्मस्वरूप प्रमोद महाराज संप्रदायाचे अनुयायी मारुती पवार , सुनील पिंपळे, सुरेश गावडे, प्रवीण ठाणेकर, अनिल पिंपळे, मोहन सुतार तसेच शाळेच्या मुख्याध्यापिका एस. एम. चरापले, वाय.जी. मोहिते, ए.पी. नाळे यांचीही उपस्थिती होती.

# वृत्तपत्र विक्रेता महामंडळाची त्वरित अंमलबजावणी करा

## जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा ; संघटनेचे जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन

कोल्हापूर,ता.१२(प्रतिनिधी)–

**वृत्तपत्र विक्रेता कल्याणकारी महामंडळाची लवकरात लवकर अंमलबजावणी करावी, या प्रमुख मागणीसाठी महाराष्ट्र राज्य वृत्तपत्र विक्रेता संघटनेच्या वतीने जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा काढण्यात आला व जिल्हाधिकारी डॉ.विजय राठोड यांना निवेदन सादर करण्यात आले.**

महाराष्ट्र राज्य वृत्तपत्र विक्रेता संघटना न्याय्य हक्कांसाठी आणि कल्याणकारी महामंडळासाठी सातत्याने संघर्ष करत आहे. कित्येक वर्षांच्या या लढ्यानंतर १० ऑक्टोबर २०२४ रोजी मंत्रिमंडळामध्ये


जिल्हाधिकारी कार्यालयावर काढण्यात आलेल्या मोर्चाप्रसंगी वृत्तपत्र विक्रेता संघटनेचे अध्यक्ष, पदाधिकारी व सदस्य

महामंडळाचा महाराष्ट्र राज्य वृत्तपत्र विक्रेता संघटनेच्या कल्याणकारी महामंडळाचा निर्णय झाला. पण कॅबिनेटमध्ये मंजुरी मिळूनही अजूनपर्यंत महामंडळाची प्रत्यक्ष अंमलबजावणी झालेली नाही. सरकारचे या विषयाकडे गांभीर्यपूर्वक लक्ष वेधण्यासाठी जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा काढण्यात आला.पंधरा दिवसात ते तीन आठवड्यात मागण्या मान्य न झाल्यास प्रत्येक जिल्ह्यात पालकमंत्र्यांच्या घरावर मोर्चा काढणार असल्याचा इशाराही यावेळी संघटनेच्या वतीने देण्यात आला. उन्हा–पावसात, थंडी–वाऱ्यात जनतेपर्यंत वृत्तपत्र पोहोचवणाऱ्या छपाई माध्यमातील महत्त्वाच्या कष्टकरी असंघटित घटकाला न्याय मिळवून देण्यासाठी हा मोर्चा असल्याचे यावेळी सांगण्यात आले.

यावेळी रघुनाथ कांबळे, किरण व्हणगुत्ते, शिवाजी मगदूम, आण्णा गुंडे, शिवगोंडा खोत, रवी लाड, राजाराम पाटील, रमेश जाधव, किशन शहापुरे, परशुराम सावंत, सुरेश ब्रम्हपुरे, धनंजय शिराळकर, शिवाजी मगदूम यासह चंदगड, शाहूवाडी, हातकणंगले तालुका वृत्तपत्र संघटना अध्यक्ष, उपाध्यक्ष उपस्थित होते.

# वन्यप्राण्यांचे जतन व संवर्धन करणे काळाची गरज

सुनिता मंटोरे
इचलकरंजी १२

**वन्यप्राणी हे निसर्गाच्या समतोलाचे महत्त्वपूर्ण घटक असून त्यांच्या संवर्धनाशिवाय पर्यावरणाचा समतोल राखणे शक्य नाही. वृक्षारोपण व वन्य प्राण्यांचे जतन व संवर्धन करणे काळाची गरज आहे. आधिवासाचा नाश झाल्यास त्याचा थेट परिणाम अन्नसाखळीवर व पर्यावरणावर होतो, असे प्रतिपादन वनपाल सुनिता मंटोरे यांनी केले.**


चित्रकला व निबंध स्पर्धेतील गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करताना सुनिता मंटोरे सोबत बी.ए.कोळी,सौ.आर.एस.पाटील आदी.

सामाजिक वनीकरण विभाग परिक्षेत्र हातकणंगले यांच्या अंतर्गत दि न्यू हायस्कूल व ज्युनियर कॉलेज इचलकरंजी या विद्यालयातील राष्ट्रीय हरित सेना–इको क्लब यांच्यावतीने वन्यजीव सप्ताह संपन्न झाला.यावेळी चित्रकला व निबंध स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. यानिमित्ताने वनपाल सुनिता मंटोरे यांचे वन्यजीव व पर्यावरण या विषयावर त्या बोलत होत्या.पर्यवेक्षिका सौ.आर.एस. पाटील यांनी वन्य प्राण्यांचे पर्यावरणातील गरज व महत्त्व मुलांना पटवून दिले. याप्रसंगी चित्रकला व निबंध स्पर्धेतील गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार हायस्कूलचे मुख्याध्यापक बी.ए.कोळी व वनपाल सुनिता मंटोरे यांच्या करण्यात आला.

प्रास्ताविक व स्वागत कलाशिक्षक पी.एस. कोळेकर यांनी केले. कलाशिक्षक सुभाष शेवाळे, सौ.व्ही.टी.खेडकर यांनी स्पर्धेचे परीक्षण केले. एस. एम.शिंदे यांनी आभार मानले. यावेळी सर्व विद्यार्थी,शिक्षक–शिक्षिका, शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.

## महसूल लोक अदालतमध्ये प्रलंबित रस्त्याचा प्रश्न मार्गी

गगनबावडा,ता.१२(प्रतिनिधी)

**महात्मा जोतिराव फुले महसूल लोक अदालत च्या निमित्ताने गगनबावडा तालुक्यातील तिसंगी गावातील रस्त्याचा प्रलंबित प्रश्न सामंजस्याने मिटविण्यात आला. या तोडग्यामुळे गावातील ४७ शेतकऱ्यांना थेट फायदा झाला आहे.**

अनेक दिवसांपासून या रस्त्याबाबत संबंधित शेतकऱ्यांमध्ये मतभेद होते. त्यामुळे शेतात जाण्या–येण्यास,शेतमालाची वाहतूक करण्यास आणि शेतीच्या कामांना अडचणी येत होत्या.लोक अदालतीत महसूल अधिकाऱ्यांनी दोन्ही बाजूंशी संवाद साधला. सर्व संबंधितांनी परस्पर सहमतीने तोडगा काढल्याने हा प्रश्न कायमस्वरूपी निकाली निघाला.यावेळी तहसीलदार रूपाली सुर्यवंशी, मंडळ अधिकारी विनय बोळके, सरपंच, पोलीस पाटील तसेच संबंधित शेतकरी उपस्थित होते. सर्वांच्या सहकार्याने व समन्वयाने हा प्रश्न मार्गी लागला. न्यायालयीन प्रक्रियेत न अडकता आपापसातील समजुतीने वाद सोडविण्याचा हा उपक्रम ग्रामीण भागासाठी दिशादर्शक ठरला आहे,असे उपस्थितांनी सांगितले. यावेळी सर्व शेतकऱ्यांनी प्रशासनाचे आभार मानले.



केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्या हस्ते पुरस्कार स्वीकारताना डॉ. निकिता टकले व इतर मान्यवर.

## प्रा.निकिता टकले पुरस्काराने सन्मानित

वारणानगर,ता.१२(प्रतिनिधी)–

**तात्यासाहेब कोरे कॉलेज ऑफ फार्मसी वारणानगर च्या सहाय्यक प्राध्यापिका डॉ. निकिता राजेंद्र टकले यांना त्यांच्या पीएच.डी. संशोधन कार्यासाठी केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्या हस्ते राष्ट्रीय स्तरावरील बेस्ट थेसिस इन फार्मास्युटिकल सायन्सेस पुरस्कार २०२६, प्रशस्तीपत्रक आणि तीन लाख रुपये रोख पारितोषिक देऊन गौरविण्यात आले.**

सदर पुरस्कार सोहळा रजनीभाई वी. पटेल ट्रस्ट यांच्या तर्फे अहमदाबाद (गुजरात) येथे आयोजित केला होता. भारतातून फार्मसी क्षेत्रातील सर्वोत्कृष्ट शोधनिबंध निवडून संशोधकांना हा राष्ट्रीय फार्मिनोवा पुरस्कार देण्यात येतो.

श्रीहरी
शुक्रवार, ता. ९/१०/२०२६ पासून
रोज २ खेळ, दु. १ वा.
मस्त रोमँटीक हिंदी चित्र
मदनिका
A मसाज पार्लर दु. ४ व ७ वा.
प्रौढांसाठी

श्रीदत्त
शुक्रवार, ता. ९ पासून
रोज ४ खेळ १*४*७ व १० वाजता
मस्त रोमँटीक इंग्रजी चित्रपट
हिडन ब्युटी
A फक्त प्रौढांसाठी A

पंचवटी चित्रमंदिर, इचलकरंजी.
संपर्क : 9623150103
पंचवटी वॉटसअॅप ग्रुप
गर्दीचा २ रा आठवडा
रोज ४ खेळ १२-३-६ व रात्री ९.३० वा.
नवीन स्क्रीनसह फुल एचडी चित्रपटाचा आनंद घ्या


दृश्यम–३ (हिंदी)
अॅडव्हान्स बुकिंग सकाळी 10 वाजल्यापासून सुरू राहील
DOLBY DIGITAL PLUS 7.1
मनोरंजनाचा धमाका अनुभवा आपल्या आवडत्या पंचवटी चित्रमंदिरात
ऑनलाईन पेमेंट स्विकारले जाईल G Pay PhonePe
ऑनलाईन बुकिंग साठी bookmyshow

५७ वर्षे सिनेरसिकांच्या सेवेत
DOLBY DIGITAL
भाग्यरेखा चित्रमंदिर इचलकरंजी
नवीन डॉल्बी डिजीटल साऊंड सिस्टीम
गर्दीचा २ रा आठवडा
रोज ४ खेळ १२-३-६-९ वा.


दृश्यम–३ (हिंदी)

कल्पना
लेजर प्रोजेक्टरसहीत
शुक्रवार ता. २ पा
१२,३,६,९ वा
वाढत्या गर्दीचा २ रा आठवडा, जनता रेट ६०/–



गुरु
शुक्रवार,ता.९ पासून रोज ४ खेळ
ऑनलाईन बुकींग bookmyshow
१२*३०.३.३०*६.३०*९.३० वा.
आता खास कमी केलेल्या पुर्वीच्याच दरात


दृश्यम–३ – द कन्क्ल्युजन

RK CINEMA
3 SCREEN MULTIPLEX
राधाकृष्ण सिनेमा
3 स्क्रीन मल्टिप्लेक्स
REAL 3D EFFECTS & DOLBY ATMOS SOUND
ONLY IN RADHAKRISHNA MULTIPLEX
7447440070 bookmyshow


ADVANCE BOOKINGS OPEN
" जेलर 2 " ( हिंदी )
From 15 Oct, 2026
09:30 AM, 12:45 PM
04:00 PM, 07:15 PM
10:30 PM
" दृश्यम 3 " ( हिंदी )
10:30 AM, 01:30 PM
04:30 PM, 07:30 PM
09:30 PM, 10:30 PM
" प्रेमदा ऊरली " ( कन्नड )
12:30 PM, 03:30 PM
06:30 PM
" हनुमान अंश " ( हिंदी )
03:30 PM
चित्रपटाचा भरघोस आनंद घ्या आमच्या नवीन खाद्य प्रकारासह, खासकरून पिज्जा, पास्ता, सँडविच, गार्लिक ब्रेड आणि बरिस्ता एक्सप्रेसो कॉफी इचलकरंजीत प्रथमच

फोर्च्युन सिनेफ्लेक्स
इचलकरंजी
Now Book Tickets on bookmyshow
OR Via www.fortuneshahgroup.com
अधिक माहितीसाठी संपर्क
+91 88 88 01 51 11


दृश्यम 3 : द कन्क्लुजन (HIN) (U/A)
10.45am, 12.00, 01.30, 03.00, 04.30, 06.00, 07.30, 09.00, 10.30pm
प्रेमदा ऊरली (KAN) (U/A)
10.30am, 01.15, 04.15, 07.15, 10.15pm
आता पहा प्रेमदा ऊरली मूवी कन्नड शो फक्त फॉर्च्यून सिनेप्लेक्स मध्ये

# कोरेगावात माने, खत्री मैत्री जपणार की आव्हान देणार?

## सातारा जिल्हा बँकेसाठी जावळी सोसायटीतून शशिकांत शिंदे यांच्यासह १८ उमेदवार

कोरेगाव,ता.१२(वार्ताहर)–

**जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या निवडणुकीत कोरेगाव सोसायटी मतदारसंघ पुन्हा एकदा चर्चेच्या केंद्रस्थानी आला आहे .वेगवेगळ्या पक्षाचे झेंडे खांद्यावर असले तरी गेल्या दोन पंचवार्षिक निवडणुकीत एकमेकांसाठी राजकीय मैत्री जपणारे राष्ट्रवादीचे सुनील माने व भाजपचे सुनील खत्री यंदा समोरासमोर उभे ठाकले आहेत. त्यातच घनश्याम शिंदे यांच्या उमेदवारीने निवडणुकीत रंगत आणली आहे.**

भूतकाळात एकमेकांसाठी माघार घेत सत्तेची वाट मोकळी करून देणारे हे दोन्ही सुनील यंदा मैत्री टिकवून एक जण माघारीचा मार्ग निवडणार की थेट संघर्षाचा बिगुल फुंकणार याकडे संपूर्ण कोरेगाव तालुक्याचे लक्ष लागले आहे.

जिल्हा बँकेत कोरेगाव तालुक्यातील राष्ट्रवादीचे नेते सुनील माने यांनी निवडून येऊन उपाध्यक्ष पदापर्यंत मजल मारली तर मागील वेळी सुनील माने यांनी आपले मित्र सुनील खत्री यांना मदत करून त्यांना संचालक म्हणून पाठविले.या दोन मित्रांनी वेगवेगळ्या पक्षात असूनही एकमेकांना मदत केली. यावेळेस सोसायटी मतदारसंघातून पुन्हा दोघेही रिंगणात उतरले आहेत. तसेच

### शशिकांत शिंदे यांचे आव्हान कायम राहणार

**कोरेगावचे माजी आमदार व राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे शशिकांत शिंदे यांनी औद्योगिक विणकर आणि मजूर संस्था मतदारसंघातून अर्ज भरला कआहे.या मतदारसंघातून तब्बल १८ उमेदवार रिंगणात आहेत.तालुक्यातील श्रीमंत झांजुर्णे हेही रिंगणात आहेत.यासह इतर दिग्गज उमेदवारी या मतदारसंघात असल्याने शशिकांत शिंदे यांच्यासमोर आव्हान राहणार का याकडे लक्ष लागले आहे.**




घनश्याम शिंदे यांचाही अर्ज आहे.

त्यामुळे याच मतदारसंघात दोन्ही सुनील मैत्रीपूर्ण लढत करत एकाला संधी देण्याचा निर्णय घेणार का? याची उत्सुकता आहे तसेच जावळी विकास सेवा सोसायटीतून राष्ट्रवादीचे प्रदेशाध्यक्ष शशिकांत शिंदे यांनी अर्ज भरलेला आहे तेथील लढत ही त्यांच्यासाठी प्रतिष्ठेची असेल.

महिला राखीव मतदार संघातून कोरेगाव तालुक्यातील अनुपमा फाळके, मोनल साळुंखे, सुनिता भोईटे यांनीही अर्ज भरलेले आहेत तसेच बँका व पतसंस्था मतदारसंघातून विद्यमान संचालक रामभाऊ लेंभे यांनी पुन्हा अर्ज भरला आहे. त्यांना यावेळेस पुन्हा या मतदारसंघातून संधी मिळणार का? हेही पहावे लागणार आहे, तसेच अनुसूचित जाती जमातीतून सुरेश गायकवाड रिंगणात आहेत.

एकूणच कोरेगाव तालुक्यातील हालचालींकडे सर्वांच्या नजरा आहेत. कोरेगाव तालुक्यातील जिल्हा बँकेचे एकूण १२८ मतदार आहेत. यामध्ये सोसायटीचे ९०, खरेदी विक्री संघाचा एक, नागरी बँका पतसंस्थेतून १८, गृहनिर्माण आणि दुग्ध संस्था मतदारसंघातील सात, औद्योगिक विणकर आणि मजूर संस्था मतदारसंघातून ११ मतदार आहेत. त्यामुळे यातील राष्ट्रवादी काँग्रेसचे मतदार जास्त असल्याचा दावा केला जात आहे, त्यामुळे पक्षीय पातळीवर तरतुदीचे राजकारण या मतदारसंघात पाहायला मिळणार का? याचीही उत्सुकता आहे. उमेदवारी अर्ज मागे घेण्याच्या दिवशी कोरेगाव तालुक्यातील किती उमेदवार रिंगणात राहणार यावरही सर्व काही अवलंबून असेल.



निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर आयोजित मेळाव्यात बोलताना वैभव शिंदे,व्यासपीठावर उपस्थित विराज शिंदे,संभाजीराव कचरे,झुंजारराव पाटील व समोर उपस्थित कार्यकर्ते.

# आष्ट्यात महाविकास आघाडीकडून निवडणुक प्रचाराचे रणशिंग

## पदवीधर, शिक्षक मतदारसंघासह जिल्हा बँकेच्या निवडणुकीसाठी नेते,कार्यकर्त्यांचा एकजुटीचा निर्धार

आष्टा,ता.१२(प्रतिनिधी)–

**पुणे पदवीधर आणि शिक्षक मतदारसंघातील महाविकास आघाडीच्या उमेदवारांच्या विजयासह सांगली जिल्हा बँकेच्या आगामी निवडणुकीतही एकजुटीने ताकद दाखविण्याचा निर्धार आष्ट्यातील महाविकास आघाडीच्या व्यापक बैठकीत करण्यात आला. वैभव शिंदे यांच्या निवासस्थानी झालेल्या बैठकीत पदवीधर व शिक्षक मतदारसंघातील उमेदवारांना विजयी करण्याचे आवाहन करतानाच, जिल्हा बँकेच्या निवडणुकीत आम.जयंतराव पाटील जो उमेदवार देतील, त्याच्या पाठीशी ठामपणे उभे राहण्याचा निर्धार उपस्थितांनी व्यक्त केला.**

पुणे पदवीधर मतदारसंघाच्या उमेदवार हर्षदा देशमुख–जाधव आणि शिक्षक मतदारसंघाचे उमेदवार जयंत आसगावकर यांच्या प्रचारासंदर्भात तसेच जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या निवडणूक प्रचाराचे नियोजन करण्यासाठी ही बैठक आयोजित करण्यात आली होती. गटनेते झुंजारराव पाटील यांनी स्वागत व प्रास्ताविक केले.

यावेळी उपनगराध्यक्ष दिलीपराव वग्याणी, डॉ.तुषार कणसे, शिवाजीराव ढोले, मानसिंग हाके, अॅड.साईनाथ पाटील, अल्लाउद्दीन चौगले, पै.गुलाबराव पाटील, संभाजी खोत, पै.हणमंतराव सूर्यवंशी, तेजश्री बोंडे, स्नेहल शिंदे, शबाना मुल्ला, श्रद्धा लांडे, अमर शेळके, विजय कटारे, भास्कर पाटील आणि संभाजी कचरे यांनी मनोगत व्यक्त केले.पदवीधर मतदारसंघातून हर्षदा देशमुख–जाधव या उच्चशिक्षित उमेदवार असून शिक्षक मतदारसंघात जयंत आसगावकर यांना उमेदवारी देण्यात आली आहे. पहिल्या पसंतीचे मत देऊन दोन्ही उमेदवारांना विजयी करण्यासाठी पदवीधर आणि शिक्षक मतदारांनी एकजुटीने प्रयत्न करावेत, असे मत उपस्थितांनी व्यक्त केले.

वैभव शिंदे यांनी सांगली जिल्हा बँकेच्या मागील पाच वर्षांतील कामकाजाचा आढावा दिला. बँकेच्या ठेवी, कर्जवाटप, नफा आणि अनुत्पादित कर्जांचे (एनपीए) प्रमाण याबाबत त्यांनी माहिती दिली.आम. जयंत पाटील यांनी आगामी जिल्हा बँक निवडणुकीत पुन्हा उमेदवारी दिल्यास सर्वांनी आशीर्वाद आणि सहकार्य द्यावे, अशी अपेक्षा शिंदे यांनी व्यक्त केली. जिल्हा बँकेच्या निवडणुकीत एकजूट कायम ठेवून पक्षनेतृत्वाच्या निर्णयानुसार उमेदवाराला विजयी करण्यासाठी सर्वांनी प्रयत्न करावेत, असे आवाहनही त्यांनी केले.आजी–माजी नगरसेवक, सहकारी संस्थांचे पदाधिकारी, पदवीधर युवक आणि शिक्षक मोठ्या संख्येने उपस्थित होते.प्रकाशराव रुकडे यांनी आभार मानले.

## भुरकवडी येथे नवरात्र उत्सवास उत्साहात प्रारंभ

वडूज,ता.१२(वार्ताहर)–

**भुरकवडी (ता.खटाव)येथील नवसाला पावणारी व माहेरवाशिणींच्या हाकेला धावणारी देवी म्हणून प्रसिद्ध असलेली श्री निनाई देवी व श्री तुळजा भवानी देवीच्या नवरात्र उत्सवाला सुरुवात झाली असून मंदिराभोवती विद्युत रोषणाई करण्यात आली आहे.**

या नऊ दिवसांमध्ये दररोज पहाटे ५ वाजता काकडा आरती, पूजा आरती, दिवसभराच्या धार्मिक कार्यक्रमांबरोबर रोज संध्याकाळी आरती करून रात्री ९ वाजता भजने, देवीची गाणी, भारूडी भजन, गरबा दांडिया, ऑकेस्ट्रा यासह नऊ दिवस विविध कार्यक्रम होणार असल्याची माहिती पुजारी मंडळींनी दिली आहे.

# भाजप प्रदेशाध्यक्ष चव्हाणांकडून बैठकांचा धडाका

## दोन दिवसात पाच जिल्ह्यात दहा बैठका;शिक्षक,पदवीधरसाठी यंत्रणा सक्रीय

कवठेमहांकाळ,ता.१२(प्रतिनिधी)–

**पुणे विभाग शिक्षक व पदवीधर मतदारसंघ निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर भाजपचे महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष आमदार रविंद्र चव्हाण यांनी दोन दिवसीय पुणे विभागीय दौरा केला. या दौऱ्यात भाजप–महायुतीच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांच्या संमेलनातून पदवीधर मतदारसंघाच्या उमेदवार डॉ.स्मिता योगेश जाधव आणि शिक्षक मतदारसंघाचे उमेदवार कौस्तुभ गावडे यांच्या प्रचाराचा शुभारंभ करण्यात आला.**



या दौऱ्यात पुणे शहर, पुणे ग्रामीण, सातारा, सांगली, कोल्हापूर आणि सोलापूर या जिल्ह्यांतील भाजप कोअर कमिटीच्या संघटनात्मक आढावा बैठका घेण्यात आल्या. मतदार नोंदणी मोहीम तीव्र करणे, बूथनिहाय सूक्ष्म नियोजन करणे आणि प्रचार यंत्रणा प्रभावीपणे राबविणे याबाबत रविंद्र चव्हाण यांनी पदाधिकाऱ्यांना सूचना केल्या.महाराष्ट्र राज्य जुनी पेन्शन समन्वय संघाच्या पदाधिकाऱ्यांसोबत झालेल्या बैठकीत शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांसाठी जुनी पेन्शन योजना सुरू ठेवण्याबाबत निवेदन सादर करण्यात आले. यावेळी संघाने भाजप–महायुतीच्या दोन्ही उमेदवारांना पाठिंबा जाहीर केला.

दरम्यान, कोल्हापूर व सोलापूर जिल्ह्यांतील बैठकीदरम्यान अपक्ष उमेदवार नंदकुमार सागर यांनी उमेदवारी अर्ज मागे घेत भाजप–महायुतीला समर्थन जाहीर केले. पुण्यातील कार्यकर्ता संमेलनात शरद लाड यांना भाजप महाराष्ट्र प्रदेशाच्या सचिवपदी नियुक्तीचे पत्र रविंद्र चव्हाण यांच्या हस्ते देण्यात आले.

युवा वर्गाला शिक्षण, करिअर आणि स्टार्टअपच्या माध्यमातून प्रगतीच्या संधी उपलब्ध करून देण्यासह शिक्षक व पदवीधरांचे प्रश्न सोडविण्यासाठी सरकार कटिबद्ध असल्याचे रविंद्र चव्हाण यांनी सांगितले. आगामी निवडणुकीसाठी महायुतीच्या सर्व पदाधिकाऱ्यांनी एकजुटीने आणि पूर्ण ताकदीने काम करावे, असे आवाहनही त्यांनी केले.

या बैठकांना केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ, मंत्री चंद्रकांत पाटील, जयकुमार गोरे, शिवेंद्रराजे भोसले, राज्यमंत्री माधुरी मिसाळ, प्रदेश सरचिटणीस आम.निरंजन डावखरे, राजेश पांडे यांच्यासह खासदार, आमदार, जिल्हाध्यक्ष, स्थानिक पदाधिकारी आणि कार्यकर्ते उपस्थित होते.या दौऱ्यातून पुणे विभागातील निवडणूक तयारी,जिल्हानिहाय संघटनात्मक समन्वय आणि बूथस्तरीय नियोजनाचा आढावा घेण्यात आला.

# लोणंद येथे नव चेतना बाल मेळावा उत्साहात संपन्न

सातारा,ता.१२(प्रतिनिधी)–

**महिला व बाल विकास अधिकारी कार्यालय, सातारा अंतर्गत सेवा संकल्प अभियान अंतर्गत जिल्हा महिला सक्षमीकरण केंद्र व महिला व बालविकास एकात्मिक बालविकास सेवा योजना बाल विकास नागरी प्रकल्प सातारा यांच्या संयुक्त विद्यमाने बीट–लोणंद येथे नव चेतना बाल मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते.**

या मेळाव्यात महिला सक्षमीकरण केंद्र, सखी वन स्टॉप सेंटर आणि चाईल्ड हेल्पलाईनबाबत सविस्तर माहिती देण्यात आली. केंद्रामार्फत हिंसाग्रस्त महिलांना दिल्या जाणाऱ्या मोफत सुविधा जसे की समुपदेशन,वैद्यकीय सेवा, पोलीस मदत, कायदेशीर सल्ला व तात्पुरत्या राहण्याची सोय याविषयी मार्गदर्शन करण्यात आले.या कार्यक्रमास मृण्मयी जाधव, सोनाली देसाई,तनया घोरपडे, मानसी शिर्के, ज्ञानेश्वर यादव,अंगणवाडी सेविका, मदतनीस आणि माता–पालक उपस्थित होते.

# सातारा जिल्ह्यात नवरात्रोत्सवाला प्रारंभ

सातारा,ता.१२(प्रतिनिधी)–

**सातारा जिल्ह्यातील अनेक देवी मंदिरांमध्ये भक्ती आणि शक्तीचा उत्सव मोठ्या उत्साहात साजरा होत आहे.श्री क्षेत्र औंध येथील मूळ पीठ निवास यमाई देवी मंदिरात नवरात्रीचा उत्सव मोठ्या उत्साहात प्रारंभ झाला.औंध गावातील राजवाड्यातील यमाई देवीचे स्थान असलेल्या मंदिरातही हा उत्सव सुरू झाला.**



सातारा जिल्ह्यातील वाई नजीकच्या मांढरदेव येथील श्री काळेश्वरी अर्थात काळुबाई मंदिरातही नवरात्री उत्सवाचा विशेष उत्साह दिसून येत आहे .सातारा जिल्ह्यातील वाठार स्टेशनच्या श्री क्षेत्र देऊर येथील मुधाई देवी मंदिर तसेच राजघराण्याची कुलदेवता असणाऱ्या श्रीक्षेत्र प्रतापगड येथेही तुळजाभवानी मंदिरात सकाळीच घटस्थापना करून नवरात्री उत्सवाला प्रारंभ झाला.

सातारा शहरातील छ.शिवाजी महाराजांचे थेट वंशज असणाऱ्या खासदार श्री उदयनराजे भोसले यांच्या जलमंदिर येथील निवासस्थानी असलेल्या श्री तुळजाभवानीची ही विधिवत प्राणप्रतिष्ठा करून नवरात्र उत्सवाला पारंपारिक पद्धतीने सुरुवात झाली. अनेक भक्तांचे कुलदैवत असलेल्या औंध येथील यमाई मंदिरात विशेष कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले असून सातारा शहरातील विविध देवी मंदिरांमध्ये महिला वर्गामध्ये विशेष उत्साह दिसून येत आहे. राजवाडा परिसरातील पंचपाळे हौद परिसरातील श्री दुर्गादेवी मंदिरातही विशेष सालंकृत पूजा बांधण्यात आली होती.आता पुढील नऊ दिवस विविध रूपातील देवीची पूजा केली जाणार असल्याचे मंदिर व्यवस्थापन समितीने सांगितले. मंगळवार तळे परिसरातील छ.शिवाजी महाराजांच्या काळापासून असलेल्या श्री तुळजाभवानी मंदिरात तसेच पोलीस मुख्यालया नजीकच्या तुळजाभवानी मंदिर, पवई नाका परिसरातील फोडजाई मंदिर, माची पेठेतील सप्तशृंगी देवीचे स्थान असलेल्या सदाशिव सपकाळ यांच्या सप्तशृंगी मंदिरात, शनिवार पेठ येथील श्री रेणुका मंदिर तसेच अजिंक्यतारा किल्ल्यावरील ग्रामदैवत असलेल्या श्री मंगळाई देवी मंदिर तसेच तटाखालील मंगळाई देवी मंदिरात नवरात्रीचे आयोजन करण्यात आले आहे.

# स्वाभिमानी शेतकरी संघटनेने कृष्णा कारखान्याची ऊस वाहतूक रोखली

## पाच हजार पहिली उचल देण्याची मागणी;बैलगाड्यांमधील हवा सोडली

ईश्वरपूर,ता.१२(प्रतिनिधी)–

**चालू गळीत हंगामाच्या पार्श्वभूमीवर ऊसदराच्या प्रश्नावरून वाळवा तालुक्यात स्वाभिमानी शेतकरी संघटनेने आक्रमक भूमिका घेतली आहे. उसाला प्रति टन पाच हजार पाचशे रुपये पहिली उचल मिळाल्याशिवाय साखर कारखाने सुरू करू देणार नाही, असा इशारा संघटनेच्या कार्यकर्त्यांनी दिला.**

य.मो.कृष्णा सहकारी साखर कारखाना शिवनगर स्वाभिमानी शेतकरी संघटनेच्या कार्यकर्त्यांनी अडविले. यावेळी ४० ऊसाची भरलेली वाहने रोखून धरत सहा ते सात बैलगाडी मधील हवा सोडण्यात आली. ऊस वाहतूक करणारी वाहने थांबवून कार्यकर्त्यांनी घोषणाबाजी केली.

कृष्णा सहकारी साखर कारखान्याने गळीत हंगाम सुरू केला आहे.ऊसदराचा प्रश्न निकाली निघेपर्यंत कारखाना सुरू करू नये, अशी मागणी स्वाभिमानी शेतकरी संघटनेने निवेदनाद्वारे केली होती. मात्र कारखाना प्रशासनाने संघटनेच्या मागणीकडे दुर्लक्ष करून गळीत हंगाम सुरू ठेवल्याने कार्यकर्त्यांनी ऊस वाहतूक रोखल्याचे संघटनेने सांगितले. कृष्णा नदीवरील बहे पुल येथे सुमारे ४० ट्रॅक्टरमधील भरलेल्या उसाची वाहतूक रोखण्यात आली. ऊस उत्पादक शेतकऱ्यांना योग्य दर मिळाल्याशिवाय कारखान्यांचा गळीत हंगाम सुरळीत चालू देणार नाही, अशी भूमिका कार्यकर्त्यांनी घेतली.यावेळी स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे नेते भागवत जाधव, संतोष शेळके, प्रदीप नागरे, प्रताप पाटील,शहाजी पाटील,बळीराजा शेवाळे, दत्तात्रेय जाधव, गणेश शेवाळे, रामचंद्र देवकुळे, कृष्णा कुंभार सह स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे कार्यकर्ते उपस्थित होते. पर्जन्यमान कमी असल्याने उसाचे उत्पादन घटण्याची शक्यता आहे. त्यामुळे ५५०० रुपयेचा निर्णय होईपर्यंत साखर कारखाने चालू होऊन देणार नसल्याचा इशारा स्वाभिमानीचे भागवत जाधव यावेळी यांनी दिला.



मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते पुरस्कार स्विकारताना मुख्य कार्यकारी अधिकारी विशाल नरवाडे व शशिकांत शिंदे

## समृद्ध पंचायतराज अभियानात सांगली राज्यात तिसरा

सांगली,ता.१२(प्रतिनिधी)–

**राज्य शासनाच्या मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानात सांगली जिल्हा परिषदेने राज्यात तिसरा क्रमांक पटकावला आहे.या उल्लेखनीय कामगिरीबद्दल नाशिक येथे आयोजित राज्यस्तरीय सोहळ्यात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते जिल्हा परिषदेचा गौरव करण्यात आला.मुख्य कार्यकारी अधिकारी विशाल नरवाडे आणि उपमुख्य कार्यकारी अधिकारी शशिकांत शिंदे यांनी हा सन्मान स्वीकारला.**

यावेळी ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे, शिक्षणमंत्री दादा भुसे आदी उपस्थित होते. ग्रामपंचायती अधिक सक्षम, स्वावलंबी, पारदर्शक आणि लोकाभिमुख बनविण्याच्या उद्देशाने राबविण्यात आलेल्या या अभियानात सांगली जिल्ह्याने नियोजनबद्ध कार्यपद्धती आणि सामूहिक सहभागाच्या जोरावर ठसा उमटविला.यासाठी सीईओ विशाल नरवाडे ग्रामपंचायत विभागाचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी शशिकांत शिंदे यांच्यासह जिल्हा परिषद अभियान कक्षातून अत्यंत प्रभावीपणे काम करणारे संतोष सपकाळ,रवींद्र शिंदे,अजय शिंदे,विनायक माळी व श्रीधर कुलकर्णी यांच्यावर कौतुकाचा वर्षाव होत आहे.

## यशश्री मुंढेकरचे तलवारबाजीमध्ये यश

कराड ,ता.१२(प्रतिनिधी)–

**अवघ्या आठव्या वर्षी कराडच्या यशश्री मुंढेकर हिने तलवारबाजी या क्रीडा प्रकारात उल्लेखनीय कामगिरी करत आपल्या कर्तृत्वाची छाप उमटवली आहे.**

यशश्रीने राज्यस्तरीय तलवारबाजी स्पर्धेत उल्लेखनीय कामगिरी करत यश मिळवले. त्यानंतर जम्मू–कश्मीर येथे झालेल्या राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धेतही तिने यश संपादन केले. या कामगिरीच्या जोरावर आंतरराष्ट्रीय स्तरावरील स्पर्धेसाठी तिची निवड झाली आहे. लहान वयातच अत्यंत चपळ, शिस्तप्रिय व मेहनती यशश्रीने शिक्षणासोबत तलवारबाजीच्या सरावातही सातत्य राखले आहे. तिच्या या कामगिरीमुळे कराडच्या क्रीडा क्षेत्रात एक नवे नाव पुढे आले आहे. यशश्री हिच्या या उल्लेखनीय कामगिरीबद्दल तिचे कुटुंबीय, शाळा, प्रशिक्षक यांचे अभिनंदन करण्यात येत आहे.

# केंद्रीय पथकाकडून दुष्काळी परिस्थितीची पाहणी

## सोलापूर जिल्ह्यातील पीक नुकसान, पाणीटंचाईचा घेतला आढावा

पंढरपूर,ता.१२(प्रतिनिधी)–

**केंद्र शासनाच्या केंद्रीय पथकाने सोलापूर जिल्ह्यातील दुष्काळी परिस्थितीची प्रत्यक्ष पाहणी करून पीक नुकसान, पिण्याच्या पाण्याची टंचाई, भूजल पातळी, जनावरांसाठी चारा व पाण्याची उपलब्धता तसेच रब्बी हंगामाच्या शक्यतांचा आढावा घेतला.**

उत्तर सोलापूर तालुक्यातील बेलाटी, मंगळवेढा तालुक्यातील विविध गावांमध्ये पथकाने शेतकऱ्यांशी संवाद साधून दुष्काळामुळे झालेल्या नुकसानीची माहिती जाणून घेतली. पावसातील दीर्घ खंडामुळे तूर व अन्य पिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले असून, काही भागांतील विहिरी आणि साठवण तलाव कोरडे पडल्याचे निदर्शनास आले. चारा व पाण्याच्या टंचाईमुळे पशुपालन व्यवसायावरही गंभीर परिणाम झाला आहे. या पार्श्वभूमीवर शेतकऱ्यांनी शासनाकडून जास्तीत जास्त आर्थिक मदत वेळेत मिळावी, अशी मागणी केंद्रीय पथकाकडे केली.



सोलापूर जिल्ह्यातील विविध गावातील प्रत्यक्ष शेतात जावून दुष्काळी परिस्थितीची पाहणी करताना केंद्रीय पथकातील अधिकारी.

केंद्रीय पथकाचे नेतृत्व कृषी व शेतकरी कल्याण विभागाच्या पीक विभागाचे संचालक डॉ.के. पोनुसामी यांनी केले. पथकामध्ये पेयजल व स्वच्छता विभागाचे टीम लीडर अबसार अहमद खान आणि अन्न व सार्वजनिक वितरण विभागाचे सहाय्य क संचालक सुमित शर्मा यांचा समावेश होता.

केंद्रीय पथकाच्या पाहणीदरम्यान विविध गावांतील शेतकऱ्यांनी पीक नुकसान, पिण्याच्या पाण्याची टंचाई, जनावरांसाठी चारा व पाण्याची कमतरता आणि घटलेले उत्पन्न याबाबत आपली परिस्थिती मांडली. पावसाअभावी खरीप पिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले असून, रब्बी हंगामही हातचा जाण्याची शक्यता आहे. त्यामुळे शासनाने दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना जास्तीत जास्त आर्थिक मदत द्यावी आणि ती वेळेत उपलब्ध करून द्यावी, अशी मागणी करण्यात आली.

पाहणीदरम्यान संबंधित गावांतील तलाठी, ग्रामसेवक आणि कृषी सहाय्यक यांनी पीक परिस्थिती, पाणीटंचाई, जनावरांसाठी चारा व पिण्याच्या पाण्याची उपलब्धता तसेच नागरिकांच्या पिण्याच्या पाण्याची सद्यस्थिती याबाबत केंद्रीय पथकाला माहिती दिली.

या पाहणी दौऱ्यावेळी राज्याचे कृषी आयुक्त सुरेश मांढरे, जिल्हाधिकारी एस.कार्तिकेयन, मंगळवेढ्याचे आम.समाधान आवताडे, कृषी सहसंचालक सुभाष काटकर, कृषी विज्ञान केंद्राचे वरिष्ठ शास्त्रज्ञ लालासाहेब तांबडे, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी शुक्राचार्य भोसले, निवासी उपजिल्हाधिकारी अभिजीत पाटील, पृथ्वीराज माने, प्रांताधिकारी सदाशिव पडदुने, निलेश पाटील, रामचंद्र माळी, मंगळवेढ्याचे उपविभागीय अधिकारी अमित माळी, मंगळवेढ्याचे तहसीलदार मदन यादव, सांगोल्याच्या तहसीलदार बाळूबाई भागवत, संबंधित तालुका कृषी अधिकारी, तसेच विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

## ‘वारी’वरील माहितीपटाचा जागतिक स्तरावर सन्मान

पंढरपूर,ता.१२(प्रतिनिधी)–

**पंढरपूर आषाढी वारीचा आध्यात्मिक आणि सांस्कृतिक वारसा जागतिक प्रेक्षकांपर्यंत पोहोचविण्यासाठी माहिती व जनसंपर्क विभागामार्फत निर्मिती करण्यात आलेल्या ‘पंढरपूर वारी–इन द फूटस्टेप्स ऑफ द सेंट्स’ या माहितीपटाची प्रतिष्ठित ‘एशियन अकॅडमी क्रिएटिव्ह अवॉर्ड्स २०२६’मध्ये ‘सर्वोत्कृष्ट ब्रँडेड कार्यक्रम’ श्रेणीत भारताचा राष्ट्रीय विजेता म्हणून निवड झाली आहे.**




महाराष्ट्राचे वैभव असलेली पंढरपूर वारीची भक्तीमार्गातली समृद्ध परंपरा जगासमोर आणण्याच्या उद्देशाने या माहितीपटाची निर्मिती करण्यात आली. माहिती व जनसंपर्क विभाग आणि वॉर्नर ब्रदर्स डिस्कवरी यांच्यामार्फत निर्मित या माहितीपटाचे डिस्कवरीच्या जगभरातील विविध वाहिन्यांवरून प्रसारण करण्यात आले आहे.महाराष्ट्राच्या संतपरंपरेचा, वारकरी संप्रदायाचा आणि शेकडो वर्षांची परंपरा असलेल्या पंढरपूर वारीचा जागतिक प्रेक्षकांना परिचय करून देण्यासाठी २२ मिनिटांचा इंग्रजी भाषेतील माहितीपट तयार करण्यात आला आहे. संत ज्ञानेश्वर आणि संत तुकाराम महाराजांनी दिलेला भक्ती, समता आणि बंधुभावाचा संदेश भाषेच्या मर्यादा ओलांडून आंतरराष्ट्रीय व्यासपीठावर पोहोचविण्याच्या दृष्टीने हा माहितीपट महत्त्वपूर्ण ठरला आहे.



# कुंतीलालजी पाटणी : सामाजिक बांधिलकी आणि दातृत्वाचा आदर्श

प्रतिकुल परिस्थितीवर मात करत जीवनात सुस्थिर होणारे अनेकजण असतात. मात्र त्यातील कितीजण यशस्वी झाल्यानंतरही सामाजिक बांधिलकी जोपासतात, हा संशोधनाचा विषय ठरतो. परंतु यामध्ये संतुलन व समन्वय राखत सामाजिक, धार्मिक, औद्योगिक अशा तिन्ही क्षेत्रात यशस्वी ठरलेले व भाईसाहब अशी ओळख निर्माण झालेले कुंतीलालजी पाटणी यांच्याबद्दल.....



कुंतीलाल पाटणी आपली पत्नी मनोरमादेवी पाटणी यांच्यासमवेत.

इचलकरंजीच्या सामाजिक, धार्मिक आणि औद्योगिक पटलावर आपल्या कर्तृत्वाने आणि दातृत्वाने स्वतंत्र ठसा उमटवणारे ज्येष्ठ समाजसेवक तथा नामांकित बांधकाम व्यावसायिक कुंतीलाल मांगीलाल पाटणी यांच्या निधनाने इचलकरंजी परिसराची मोठी हानी झाली आहे. एक यशस्वी व्यावसायिक आणि त्याहूनही अधिक एक संवेदनशील, दानशूर व्यक्तिमत्त्व म्हणून त्यांनी समाजात मिळवलेले स्थान अढळ होते. ते भाईसाहब नावानेच वस्त्रनगरीच नव्हे तर संपूर्ण कोल्हापूर जिल्ह्यात ओळखले जात.

सन १९४१ मध्ये राजस्थानमधील नागौर जिल्ह्यातील आलनियावास या छोट्याशा गावात कुंतीलाल उर्फ भाईसाहब पाटणी यांचा जन्म झाला. घरची परिस्थिती सर्वसाधारण असले कारणाने त्यांना इयत्ता ८ वी पर्यंतच शिक्षण घेता आले. लहान वयातच कौटुंबिक जबाबदारीच्या निमित्ताने सन १९६३ च्या दरम्यान भाईसाहब वस्त्रनगरी इचलकरंजी शहरामध्ये आले. याठिकाणी त्यांनी प्रारंभी वर्षभर नोकरी केली. परंतु आपल्याला व्यावहारीक जगात मोठे व्हायचे आणि आपल्या कार्याचा आदर्श इतरांना द्यायचा, या भूमिकेतून भाईसाहब यांचे मन नोकरी ऐवजी उद्योगधंद्याकडे झेपावू लागले. अत्यंत प्रामाणिक, व्यावहारिक व तत्पर या गुणांमुळे भाईसाहब पाटणी यांच्यावर त्यावेळचे घरमालक रामचंद्र वरूटे यांचा विश्वास बळकट झाला. उद्योगपती भिमकरण छापरवाल यांच्या मार्गदर्शनाखाली सन १९६४ मध्ये रामचंद्र वरूटे यांनी भाईसाहब पाटणी यांना व्यापारासाठी मदत केली. त्यानंतर रामचंद्र वरूटे यांचे चिरंजीव मधुकर वरूटे यांच्यासोबत पाटणी यांनी भागीदारीत व्यवसाय सुरू केला.

कुंतीलालजी पाटणी यांनी बांधकाम व्यवसायात पदार्पण करून गुणवत्तेवर आणि प्रामाणिकतेवर आधारित कार्यसंस्कृती निर्माण केली. शहराच्या वाढत्या विस्तारात आणि आधुनिक रचनेत त्यांच्या प्रकल्पांचे मोठे योगदान राहिले. केवळ नफा हा उद्देश न ठेवता ग्राहकांशी पारदर्शकता आणि विश्वासाचे नाते जपणे हे त्यांच्या व्यावसायिक यशाचे मुख्य सूत्र होते. नव्या पिढीतील व्यावसायिकांसाठी त्यांची ही सचोटी नेहमीच मार्गदर्शक ठरली.



बिल्डर्स असोसिएशनतर्फे कुंतीलालजी पाटणी व मनोरमादेवी पाटणी यांना 'जीवन गौरव पुरस्कार' देऊन सन्मानित करताना मान्यवर.

भाईसाहब पाटणी यांनी १९७२ मध्ये लालनगर झोपडपट्टीचे बांधकाम केले. पूर्वाश्रमीचे इंदिरा गांधी मेमोरियल हॉस्पिटल (आय. जी. एम.) चे बांधकाम, हुपरी येथील हुतात्मा स्मारकाचे बांधकाम पाटणी यांनी केले. त्याचबरोबर इचलकरंजीतील थोरात चौकातील शॉपिंग सेंटर, पंचवटी चित्रमंदिर मागील कॉम्प्लेक्स, महेश भवन जवळील पोलिस क्वार्टर्स, नाट्यगृहाशेजारील जलतरण तलाव आदी महत्वाच्या वास्तूंचे बांधकाम भाईसाहेब यांनी करून आपल्या बांधकाम कौशल्याचा अजोड नमूना दाखवला. इचलकरंजी शहरातील अनेक रस्त्यांची बांधणी त्यांनी उत्तम प्रकारे केली. ग्रामीण भागात दळणवळण यंत्रणा कमी असताना आणि विविध प्रकारच्या समस्या समोर असतानाही जिल्हा परिषद सार्वजनिक बांधकाम विभागातर्फे अनेक कठीण व अडचणीतील कामे अत्यंत जबाबदारीने पूर्ण केली. ग्रामीण भागात विशेषतः हातकणंगले ते कुंभोज हा मार्ग प्रथम भाईसाहब यांनी केला. एखादे काम हातात घेतले की ते काम पूर्ण होईपर्यंत त्याचा पाठपुरावा करायचे आणि ते आदर्श व गुणवत्तेने पूर्ण करायचे, हा नियमच जणू भाईसाहब यांनी मनाशी बाळगला होता. सध्याची गंगामाई विद्या मंदिराची वास्तू राज्य सरकारतर्फे अवघ्या २३ हजार रुपयास मिळवून देण्यात भाईसाहब तथा कुंतीलाल पाटणी यांचा वाटा सिंहाचा राहिला.

मक्तेदार म्हणून कार्य करत असतानाच धार्मिक क्षेत्रामध्ये भाईसाहब अत्यंत कर्तबगार व कार्यरत होते. कागवाडे मळा येथील पार्श्वनाथ दिगंबर आचार्य वर्धमान सागर मंदिरासाठी जागा घेवून बांधकाम होऊन ते पूर्ण होइपर्यंत त्यांनी योगदान दिले. परम पूज्य गणाधिपती गणधराचार्य कुंथुसागरजी महाराज यांच्या आशिर्वादाने रामलिंग रोड येथील कुंथुगिरी क्षेत्राची जागा घेवून त्याठिकाणी अतिभव्य असे कुंथुगिरी क्षेत्राची स्थापना करून संस्थापक कार्याध्यक्ष म्हणून त्यांनी काम पाहिले. अनेक धार्मिक कार्य करण्यात त्यांचा नेहमीच वाटा राहिला. साजणी येथील पार्श्वनाथ मंदिराची स्थापना करण्यासाठी पुढाकार घेऊन ते काम त्यांनी पूर्ण केले. बिल्डर्स असोसिएशन ऑफ इचलकरंजीचे संस्थापक अध्यक्ष म्हणून त्यांनी काम पाहिले आहे.

दक्षिण भारत दिगंबर जैन सभेचे माजी उपाध्यक्ष, दिगंबर जैन बोडींग इचलकरंजीचे माजी अध्यक्ष, आदिनाथ बँकेचे आजपर्यंत संस्थापक संचालक व माजी उपाध्यक्ष ही पदे त्यांनी भुषविली आहेत. त्याचबरोबर महावीर जयंती उत्सव मंडळाची स्थापना करून अध्यक्षपद भुषविले. भगवान महावीर आयुर्वेदिक दवाखान्याची स्थापना, दक्षिण भारत दिगंबर जैन समन्वय समितीचे सदस्य म्हणून त्यांनी जबाबदारी सांभाळली होती.



कुंतीलाल पाटणी आपल्या कुटुंबासमवेत.

कुंतीलालजींचा खरा परिचय म्हणजे त्यांची समाजोपयोगी दृष्टी. जैन समाजातील विविध धार्मिक उपक्रम, तीर्थक्षेत्रांचे जीर्णोद्धार आणि शैक्षणिक कामांमध्ये त्यांचा नेहमीच पुढाकार असायचा. समाजातील अनेक संस्थांचे ते मार्गदर्शक आणि आधारस्तंभ होते. कोणत्याही विधायक कार्यासाठी मदतीची हाक येताच हात सैल सोडून सढळ हस्ते दान देण्याची त्यांची वृत्ती होती. गरीबांना वैद्यकीय मदत, गरजू विद्यार्थ्यांना शैक्षणिक सहकार्य आणि दुष्काळ किंवा नैसर्गिक संकटांच्या काळात त्यांनी दिलेले योगदान नेहमीच स्मरणात राहील. राजस्थानी समाजाबरोबर महाराष्ट्रीयन, जैन लिंगायत, देवांग कोष्टी, मुस्लिम समाजामध्ये भाईसाहबांना मानणारा मोठा वर्ग आहे.



कुंतीलालजी पाटणी हे आपले भाऊ जुगराजजी, शांतीलालजी, टिकमचंदजी यांच्या समवेत.

यश, प्रतिष्ठा आणि संपत्ती लाभूनही त्यांच्या स्वभावात कमालीची नम्रता आणि साधेपणा होता. लहानांपासून थोरांपर्यंत प्रत्येकाशी आपुलकीने संवाद साधणे, सर्वांची विचारपूस करणे हा त्यांचा स्वभावविशेष होता. विविध सामाजिक संघटना, राजकीय क्षेत्रातील मान्यवर आणि सर्वसामान्य नागरिक अशा सर्वांशीच त्यांचे जिव्हाळ्याचे संबंध होते. अजातशत्रू म्हणून ओळखल्या जाणाऱ्या कुंतीलालजींनी अनेक संस्थांमध्ये निर्माण होणारे वाद सामंजस्याने सोडवण्यात मध्यस्थी केली. एकत्रित कुटुंब कसं असावं याचं उत्तम उदाहरण म्हणून भाईसाहब पाटणी यांचे घराकडे पहावे. आजीही त्यांच्या घरात त्यांच्या मार्गदर्शनाखाली २० ते २२ कुटुंबिय घटक एकत्रित आनंदाने रहात आहेत. त्यांच्याकडे जो कोणीही मदतीच्या अपेक्षेने गेला, तो रिकाम्या हाताने कधीच माघारी फिरला नाही. त्यांच्या निधनाने इचलकरंजीने केवळ एक निष्णात व्यावसायिकच नव्हे, तर संकटात धावून येणारा एक कणखर आधारवड गमावला आहे. समाजाच्या प्रगतीत त्यांनी दिलेले योगदान आणि त्यांचे सेवाभावी विचार पुढील पिढ्यांसाठी सदैव प्रेरणादायी राहतील. त्यांच्या पावन स्मृतीस भावपूर्ण श्रद्धांजली!

उदय चौगुले, इचलकरंजी.




श्री. कुंतीलालजी मांगीलालजी पाटणी (भाई साहब)

भावपूर्ण आदरांजली!

आमचे आधारस्तंभ,
श्री. कुंतीलालजी मांगीलालजी पाटणी (भाई साहब) यांचे शुक्रवार, दि. २/१०/२०२६ रोजी दुःखद निधन झाले.
त्यांच्या आत्म्यास चिरशांती लाभो हिच ईश्वरचरणी प्रार्थना..!
त्यांच्या कुटुंबियांवर कोसळलेल्या दुःखात आम्ही सहभागी आहोत.

**सुरभी सिंथेटिक्स**
इचलकरंजी



श्री. कुंतीलालजी मांगीलालजी पाटणी (भाई साहब)

भावपूर्ण.... आदरांजली!

आमचे आधारस्तंभ,
श्री. कुंतीलालजी मांगीलालजी पाटणी (भाई साहब) यांचे शुक्रवार, दि. २/१०/२०२६ रोजी दुःखद निधन झाले.
त्यांच्या आत्म्यास चिरशांती लाभो हिच ईश्वरचरणी प्रार्थना..!
त्यांच्या कुटुंबियांवर कोसळलेल्या दुःखात आम्ही सहभागी आहोत.

**गिरनार टेक्स्टाईल्स**
इचलकरंजी



श्री. कुंतीलालजी मांगीलालजी पाटणी (भाई साहब)

भावपूर्ण.... आदरांजली!

आमचे आधारस्तंभ,
श्री. कुंतीलालजी मांगीलालजी पाटणी (भाई साहब) यांचे शुक्रवार, दि. २/१०/२०२६ रोजी दुःखद निधन झाले.
त्यांच्या आत्म्यास चिरशांती लाभो हिच ईश्वरचरणी प्रार्थना..!
त्यांच्या कुटुंबियांवर कोसळलेल्या दुःखात आम्ही सहभागी आहोत.

**हत्ती चौक युवक मंडळ**
इचलकरंजी



श्री. कुंतीलालजी मांगीलालजी पाटणी (भाई साहब)

भावपूर्ण.... आदरांजली!

आमचे आधारस्तंभ,
श्री. कुंतीलालजी मांगीलालजी पाटणी (भाई साहब) यांचे शुक्रवार, दि. २/१०/२०२६ रोजी दुःखद निधन झाले.
त्यांच्या आत्म्यास चिरशांती लाभो हिच ईश्वरचरणी प्रार्थना..!
त्यांच्या कुटुंबियांवर कोसळलेल्या दुःखात आम्ही सहभागी आहोत.

**संग्राम चौक युवक मंडळ**
इचलकरंजी

# निवडणूक आयुक्तांच्या विरोधात माकपची निदर्शने

इचलकरंजी, ता.१२



**निवडणूक प्रक्रियेत पक्षपातीपणा होत असल्याचा आरोप करत मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांची पदावरून हकालपट्टी करावी, त्यांच्यावर देशद्रोहाचा खटला दाखल करण्याची मागणी मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाच्या वतीने करण्यात आली आहे. या मागणीसाठी महात्मा गांधी चौकात जोरदार निदर्शने करण्यात आली.**

मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या हकालपट्टीच्या मागणीसाठी दिल्ली, मुंबई आणि पुणे येथे आंदोलन सुरू असून ते केंद्र सरकार दडपण्याचा प्रयत्न करत आहे. या भूमिकेच्या निषेधार्थ मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाच्या वतीने महात्मा गांधी चौकात निदर्शने करण्यात आली. यावेळी पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्या सूचनेनुसार निवडणूक आयोगाचे काम सुरू आहे. बिहार, पश्चिम बंगाल आणि महाराष्ट्रात विशेष सखोल मतदार यादी पुनरीक्षणाच्या प्रक्रियेत लाखो मतदारांची नावे कमी करून भाजपला फायदा करून दिला जात आहे. निवडणूक आयोग ही स्वतंत्र आणि स्वायत्त संस्था असल्याने कोणाचाही हस्तक्षेप किंवा पक्षपात न करता संविधानातील तरतुदींनुसार काम करणे अपेक्षित आहे. मात्र, मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार हे लोकशाही संकेतांचे पालन करत नसल्याचा आरोप करत करण्यात आला. यावेळी ज्ञानेश कुमार यांच्या विरोधात जोरदार घोषणाबाजी करत निदर्शने आली. त्यानंतर प्रांत कार्यालयात शिरस्तेदार संजय काटकर यांची भेट घेऊन मागण्यांचे निवेदन देण्यात आले.

या आंदोलनात भरमा कांबळे, सदा मलाबादे, भाऊसाहेब कसबे, रामचंद्र सौंदते, दत्ता माने, धनाजी जाधव, आनंदा चव्हाण, पार्वती म्हेत्रे यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते सहभागी झाले होते.

# पाणी टंचाईच्या पार्श्वभुमीवर पाण्याचा अपव्यय रोखावा

## –आयुक्त पल्लवी पाटील

इचलकरंजी, ता.१२ –

**राज्यात उद्भवलेली दुष्काळसदृश्य परिस्थिती लक्षात घेता पाणी बचतीच्या दृष्टीने इचलकरंजी शहर हद्दीमध्ये सुरु असलेल्या बांधकामासाठी पिण्याच्या पाण्याऐवजी मलशुद्धीकरण केंद्रातील प्रक्रिया केलेल्या पाण्याचा वापर करावा, असे आवाहन प्रशासनाच्या वतीने करण्यात आले आहे. त्याचबरोबर पाणी टंचाईच्या पार्श्वभूमीवर पाण्याचा अपव्यय रोखण्यासाठी मिळकतधारकांनी नळांना ७ दिवसांत तोट्या (चाव्या) बसवुन घेण्याच्या सूचनाही दिल्या आहेत.**

महाराष्ट्र शासनाकडून अल निनोच्या संभाव्य प्रभावामुळे उद्भवू शकणारी दुष्काळ सदृश परिस्थिती लक्षात घेवुन १० टक्के पाणी कपात लागू करणेबाबत निर्देश प्राप्त झाले आहेत. त्या अनुषंगाने इचलकरंजी शहरातील सर्व मिळकतधारक, बांधकाम व्यावसायिक, विकासक, बांधकाम ठेकेदार तसेच सुरू असलेल्या बांधकामांच्या मालकांनी बांधकामाच्या कोणत्याही कामासाठी पिण्याच्या पाण्याचा तसेच सार्वजनिक विंधन विहिरींचा वापर करु नये, अशी सक्त सूचना देण्यात आली आहे. बांधकामासाठी लागणाऱ्या पाण्याची व्यवस्था म्हणुन इचलकरंजी महानगरपालिकाकडील मलशुध्दीकरण केंद्रातील प्रक्रिया केलेले पाणी टँकरव्दारे घेवुन जावे, असे आवाहन करतानाच सूचनेचे उल्लंघन आढळून आल्यास नियमानुसार कारवाई करण्याचा इशाराही देण्यात आला आहे.

इचलकरंजी शहरास सध्या दररोज सुमारे ४६ दशलक्ष लिटर पाणी उपलब्ध होत असून शहराची दैनंदिन पाण्याची गरज सुमारे ६९ एमएलडी इतकी आहे. उपलब्ध पाणी व प्रत्यक्ष गरज यामध्ये मोठी तफावत असल्यामुळे शहराच्या पाणीपुरवठ्यावर ताण निर्माण होत आहे. त्यामुळे सद्यस्थितीत शहरातील उपलब्ध पाण्याचा काटकसरीने वापर करणे व अपव्यय रोखणे आवश्यक आहे. त्या अनुषंगाने प्रत्येक नळाला योग्य प्रकारची तोटी ७ दिवसांमध्ये बसवून घ्यावी, नळ सुरू ठेवून पाणी वाहू देणे किंवा अन्य कोणत्याही प्रकारे पाण्याचा अपव्यय करणे टाळावे, पिण्याच्या पाण्याचा वापर वाहन, रस्ते, परिसराची अनावश्यक धुलाईसाठी करु नये, महानगरपालिकेच्या पाणीपुरवठा यंत्रणेत गळती अथवा पाण्याचा अपव्यय निदर्शनास आल्यास संबंधित विभागास त्वरित कळवावे, महानगरपालिकेकडून वेळोवेळी जारी करण्यात येणाऱ्या पाणी पुरवठ्या संबंधीच्या सूचना, निर्बंध व सक्षम प्राधिकाऱ्यांचे आदेश सर्व नळ जोडणी धारकांनी पालन करावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

या सर्व सुचनांचे पालन होते अथवा नाही याची अधिकृत अधिकारी व कर्मचाऱ्यांमार्फत तपासणी करणेत येणार आहे. येत्या ७ दिवसांमध्ये नळांना तोटी बसवुन घेणेची असून त्यानंतर कोणतीही पूर्वकल्पना न देता नळ कनेक्शन तोडण्यासह दंडात्मक कारवाई करण्याचा इशारा देण्यात आला आहे. सर्व सूचनांचे पालन करणे व पाण्याचा अपव्यय रोखणे यासाठी सर्व नागरिकांनी सहकार्य करावे, असे आवाहन प्रशासनाने केले आहे.


॥ भावपूर्ण श्रध्दांजली ॥



श्री. कुंतीलालजी मांगीलालजी पाटणी (भाई साहब)
आमचे आदरणीय,
श्री. कुंतीलालजी मांगीलालजी पाटणी (भाई साहब)
यांचे शुक्रवार, दि. २/१०/२०२६ रोजी दुःखद निधन झाले.
त्यांच्या आत्म्यास चिरशांती लाभो हिच ईश्वरचरणी प्रार्थना..!

श्री वर्धन केमिकल
* नांदणी *

॥ भावपूर्ण श्रध्दांजली ॥



श्री. कुंतीलालजी मांगीलालजी पाटणी (भाई साहब)
आमचे आदरणीय,
श्री. कुंतीलालजी मांगीलालजी पाटणी (भाई साहब)
यांचे शुक्रवार, दि. २/१०/२०२६ रोजी दुःखद निधन झाले.
त्यांच्या आत्म्यास चिरशांती लाभो हिच ईश्वरचरणी प्रार्थना..!

पुष्पेंद्र बिल्डींग मटेरियल सप्लायर्स
* जयसिंगपूर *

॥ भावपूर्ण श्रध्दांजली ॥



श्री. कुंतीलालजी मांगीलालजी पाटणी (भाई साहब)
आमचे परममित्र श्री. नितेश कुंतीलालजी पाटणी यांचे वडिल,
श्री. कुंतीलालजी मांगीलालजी पाटणी (भाई साहब) यांचे
शुक्रवार, दि. २/१०/२०२६ रोजी दुःखद निधन झाले.
त्यांच्या आत्म्यास चिरशांती लाभो हिच ईश्वरचरणी प्रार्थना..!

माऊली ट्रेडर्स, इचलकरंजी

॥ भावपूर्ण श्रध्दांजली ॥



श्री. कुंतीलालजी मांगीलालजी पाटणी (भाई साहब)
आमचे मार्गदर्शक,
श्री. कुंतीलालजी मांगीलालजी पाटणी (भाई साहब)
यांचे शुक्रवार, दि. २/१०/२०२६ रोजी दुःखद निधन झाले.
त्यांच्या आत्म्यास चिरशांती लाभो हिच ईश्वरचरणी प्रार्थना..!

मनोज पाटील * अविनाश पाटील
धिरज पाटील

॥ भावपूर्ण श्रध्दांजली ॥



श्री. कुंतीलालजी मांगीलालजी पाटणी (भाई साहब)
आमचे आदरणीय,
श्री. कुंतीलालजी मांगीलालजी पाटणी (भाई साहब)
यांचे शुक्रवार, दि. २/१०/२०२६ रोजी दुःखद निधन झाले.
त्यांच्या आत्म्यास चिरशांती लाभो हिच ईश्वरचरणी प्रार्थना..!

रामचंद्र कुरणे * अविनाश कुरणे
इचलकरंजी

॥ भावपूर्ण श्रध्दांजली ॥



श्री. कुंतीलालजी मांगीलालजी पाटणी (भाई साहब)
आमचे मार्गदर्शक,
श्री. कुंतीलालजी मांगीलालजी पाटणी (भाई साहब)
यांचे शुक्रवार, दि. २/१०/२०२६ रोजी दुःखद निधन झाले.
त्यांच्या आत्म्यास चिरशांती लाभो हिच ईश्वरचरणी प्रार्थना..!

शितल पाटील * अविनाश मोरे
प्रमोद कांबळे, इचलकरंजी

॥ भावपूर्ण श्रध्दांजली ॥



श्री. कुंतीलालजी मांगीलालजी पाटणी (भाई साहब)
आमचे आदरणीय,
श्री. कुंतीलालजी मांगीलालजी पाटणी (भाई साहब)
यांचे शुक्रवार, दि. २/१०/२०२६ रोजी दुःखद निधन झाले.
त्यांच्या आत्म्यास चिरशांती लाभो हिच ईश्वरचरणी प्रार्थना..!

पार्श्व बायोकेमिकल
* जयसिंगपूर *

॥ भावपूर्ण श्रध्दांजली ॥



श्री. कुंतीलालजी मांगीलालजी पाटणी (भाई साहब)
आमचे परममित्र श्री. नितेश कुंतीलालजी पाटणी यांचे वडिल,
श्री. कुंतीलालजी मांगीलालजी पाटणी (भाई साहब) यांचे
शुक्रवार, दि. २/१०/२०२६ रोजी दुःखद निधन झाले.
त्यांच्या आत्म्यास चिरशांती लाभो हिच ईश्वरचरणी प्रार्थना..!

K.G.N. स्क्रॅप मर्चंट, शिरोली

॥ भावपूर्ण आदरांजली ॥



श्री. कुंतीलालजी मांगीलालजी पाटणी (भाई साहब)
आमचे आदरणीय,
श्री. कुंतीलालजी मांगीलालजी पाटणी (भाई साहब)
यांचे शुक्रवार, दि. २/१०/२०२६ रोजी दुःखद निधन झाले.
त्यांच्या आत्म्यास चिरशांती लाभो हिच ईश्वरचरणी प्रार्थना..!

श्री आदिनाथ मेडिकल सर्व्हिसेस
कोल्हापूर -(का॥ बावडा रोड)

॥ भावपूर्ण श्रध्दांजली ॥



श्री. कुंतीलालजी मांगीलालजी पाटणी (भाई साहब)
आमचे मार्गदर्शक,
श्री. कुंतीलालजी मांगीलालजी पाटणी (भाई साहब)
यांचे शुक्रवार, दि. २/१०/२०२६ रोजी दुःखद निधन झाले.
त्यांच्या आत्म्यास चिरशांती लाभो हिच ईश्वरचरणी प्रार्थना..!

इचलकरंजी मंडप व लायटिंग
असोसिएशन, इचलकरंजी

॥ भावपूर्ण श्रध्दांजली ॥



आमचे आदरणीय,
श्री. कुंतीलालजी मांगीलालजी पाटणी (भाई साहब) यांचे
शुक्रवार,
दि. २/१०/२०२६ रोजी दुःखद निधन झाले.
त्यांच्या आत्म्यास चिरशांती लाभो हिच ईश्वरचरणी प्रार्थना..!

श्री. कुंतीलालजी मांगीलालजी पाटणी (भाई साहब)

श्री समर्थ प्लॅस्टीक, सावर्डे

॥ भावपूर्ण श्रध्दांजली ॥



श्री. कुंतीलालजी मांगीलालजी पाटणी (भाई साहब)
आमचे आदरणीय,
श्री. कुंतीलालजी मांगीलालजी पाटणी (भाई साहब)
यांचे शुक्रवार, दि. २/१०/२०२६ रोजी दुःखद निधन झाले.
त्यांच्या आत्म्यास चिरशांती लाभो हिच ईश्वरचरणी प्रार्थना..!

• आदि स्टील यार्ड •
चौगुले परिवार, इचलकरंजी



भावपूर्ण.... आदरांजली!

आमचे आधारस्तंभ,
श्री. कुंतीलालजी मांगीलालजी पाटणी (भाई साहब) यांचे शुक्रवार,
दि. २/१०/२०२६ रोजी दुःखद निधन झाले.
त्यांच्या आत्म्यास चिरशांती लाभो हिच ईश्वरचरणी प्रार्थना..!
त्यांच्या कुटुंबियांवर कोसळलेल्या दुःखात आम्ही सहभागी आहोत.

श्री. कुंतीलालजी मांगीलालजी पाटणी (भाई साहब)

इचलकरंजी टेनिस बॉल क्रिकेट असोसिएशन, इचलकरंजी



भावपूर्ण.... आदरांजली!

आमचे आधारस्तंभ,
श्री. कुंतीलालजी मांगीलालजी पाटणी (भाई साहब) यांचे शुक्रवार,
दि. २/१०/२०२६ रोजी दुःखद निधन झाले.
त्यांच्या आत्म्यास चिरशांती लाभो हिच ईश्वरचरणी प्रार्थना..!
त्यांच्या कुटुंबियांवर कोसळलेल्या दुःखात आम्ही सहभागी आहोत.

श्री. कुंतीलालजी मांगीलालजी पाटणी (भाई साहब)

रवी साहेब रजपुते
नगरसेवक, इचलकरंजी महानगरपालिका



# डालमिया भारत शुगरच्या गाळप हंगामास प्रारंभ

कोतोली, ता.१२(प्रतिनिधी) –

**आसुर्ले–पोर्ले येथील डालमिया भारत शुगर इंडस्ट्रीज लिमिटेडच्या १५ व्या गाळप हंगामाचा प्रारंभ सोमवारी पारंपरिक मोळी पूजनाने झाला.कारखान्याचे युनिट हेड संतोष कुंभार आणि त्यांच्या पत्नी जयश्री कुंभार यांच्या हस्ते सकाळी ९ वाजता विधिवत मोळी पूजन करण्यात आले.कारखाना प्रशासनाचे अधिकारी, कर्मचारी, स्थानिक मान्यवर आणि ऊस उत्पादक शेतकरी सहभागी झाले होते.**

साखर कारखान्याच्या गाळप हंगामाच्या प्रारंभी मोळी पूजनाला विशेष महत्त्व असते.या पारंपरिक विधीनंतर आगामी हंगामाच्या कामकाजाला सुरुवात झाली. यावेळी डेप्युटी जनरल मॅनेजर (केन) संग्राम पाटील, असिस्टंट जनरल मॅनेजर (केन) शिवप्रसाद देसाई यांच्यासह कारखान्याचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. हंगाम यशस्वी करण्यासाठी कारखाना प्रशासन, कर्मचारी आणि ऊस उत्पादक शेतकरी यांचे सहकार्य आवश्यक असून शेतकऱ्यांनी कारखान्यावर दाखविलेल्या विश्वासाबद्दल आणि ऊस पुरवठ्यात दिलेल्या सहकार्याबद्दल आभार मानतो. हंगामाचे नियोजन यशस्वी करण्यासाठी सर्वांनी समन्वयाने काम करावे, असे आवाहन संतोष कुंभार यांनी केले.२०२५–२६ च्या गाळप हंगामात कारखान्याला सर्वाधिक ऊस पुरवठा करणाऱ्या शेतकऱ्यांचा सन्मानचिन्ह देऊन गौरव करण्यात आला. कारखान्याच्या गाळप प्रक्रियेत ऊस उत्पादक शेतकऱ्यांचे योगदान महत्त्वाचे असल्याने त्यांच्या कार्याची दखल घेण्यात आली.

# चंदुकाका सराफ ज्वेल्सच्या कोल्हापूर सुवर्णदालनाचा उद्या शुभारंभ

## उद्‌घाटनानिमित्त ग्राहकांना विशेष ऑफर्स




कोल्हापूर येथील दाभोळकर कॉर्नर येथील चंदुकाका सराफ ज्वेल्सचे सुवर्णदालन.

कोल्हापूर,ता.१२–

**दागिन्यांच्या क्षेत्रात दोनशे वर्षांची समृद्ध परंपरा जपणारे चंदुकाका सराफ ज्वेल्स आपल्या कोल्हापूरकरांच्या आग्रहास्तव, सौंदर्य आणि सर्वोत्तम सेवेचा नवा अनुभव घेऊन नवीन पत्त्यावर भव्य स्वरूपात सज्ज झाले आहे. या भव्य शोरूमचा शुभारंभ बुधवारी १४ ऑक्टोबर रोजी सकाळी १०:३० वाजता विविध मान्यवरांच्या हस्ते होणार आहे.**

कोल्हापूरमधील ७ वर्षांचा विश्वासरूपी वारसा, निष्ठा आणि परंपरा जपत, २०० वर्षांच्या समृद्ध वारशात दिमाखदार पदार्पण करणारी विश्वासाची सुवर्णपिढी म्हणजे चंदुकाका सराफ ज्वेल्स. कोल्हापूरच्या सौंदर्यात अधिक भर घालण्यासाठी, चंदुकाका सराफ ज्वेल्स आता भव्य आणि दिव्य स्वरूपात नवीन पत्त्यावर आपल्या भेटीला येत आहे. कोल्हापूरकरांसाठी सोने, चांदी आणि हिऱ्यांच्या आकर्षक, पारंपरिक तसेच आधुनिक डिझाइन्सचा विशेष सुवर्णसंग्रह नव्या शोरूममध्ये एकाच छताखाली उपलब्ध होणार आहे.

या शुभारंभानिमित्त चंदुकाका सराफ ज्वेल्स कोल्हापूरकरांसाठी खास आकर्षक ऑफर्स घेऊन आले आहे. यामध्ये सोन्याच्या दागिन्यांवर प्रति ग्रॅम फक्त ३.९९ टक्के ते ९.९९ टक्के मजुरी, हिऱ्यांच्या दागिन्यांच्या मजुरीवर १०० टक्के पर्यंत सूट, तसेच चांदीच्या दागिन्यांच्या मजुरीवर फ्लॅट ३० टक्के सूट मिळणार आहे. या सर्व ऑफर्स ११ ऑक्टोबर ते १५ नोव्हेंबर या कालावधीत लागू राहतील. चंदुकाका सराफ ज्वेल्सचे नवीन शोरूम दाभोळकर कॉर्नर, शाहूपुरी, काँग्रेस भवनशेजारी, स्टेशन रोड, कोल्हापूर येथे सुरू होत असून, ग्राहकांना आधुनिक सुविधा, प्रशस्त पार्किंग आणि उच्च दर्जाच्या सेवेसह उत्कृष्ट खरेदीचा अनुभव देण्यासाठी आम्ही सज्ज आहोत. या उदघाटन सोहळयास शहरातील प्रतिष्ठित नागरिक,व्यापारी,ग्राहक आणि सुवर्णप्रेमींनी उपस्थित रहावे,असे आवाहन चंदुकाका सराफ ज्वेल्सतर्फे संचालक अतुल शहा, सिध्दार्थ शहा, आदित्य शहा यांनी केले आहे.



निपाणीतील श्रीमंत निपाणकर यांच्या राजवाड्यात नवरात्रौत्सवाच्या दुसऱ्या दिवशी सोमवारी श्री तुळजाभवानी देवीची पार्वती मातेच्या रूपात पूजा बांधण्यात आली.

# श्री जोतिबाची कमळ पुष्पात सालंकृत महापूजा

जोतिबा,ता.१२(वार्ताहर) –

**नवरात्रौत्सवाच्या दुसऱ्या माळेला सोमवारी श्री जोतिबाची कमळ पुष्प तीन पाकळ्यामध्ये सालंकृत महापूजा बांधली.जोतिबा मंदिराला आकर्षक विद्युत रोषणाई केली आहे. जोतिबा देवाचा जागर शनिवारी होणार आहे.**



श्री जोतिबा देव नवरात्रौत्सवात वैविध्यपूर्ण महापूजा बांधल्या जातात. नवरात्रौत्सवाच्या दुसऱ्या माळेनिमित्त कमळ पुष्प तीन पाकळ्यातील महापूजा बांधली. ही पूजा समस्त मानाचे दहा गावकर यांनी बांधली. पुजेला आध्यात्मिक व शास्त्राचा आधार आहे.

नवरात्रामध्ये भैरवाने काशीहून सुवर्ण कमळे आणून श्री जोतिबाची पूजा बांधल्याची आख्यायिका सांगितली जाते. त्यांचे स्मरण म्हणून आजही रंगीबेरंगी कपड्याच्या कमळ पुष्प पाकळ्या करून ही पूजा बांधली जाते.

तीन पाकळ्या या त्रिदेवात्मक अवताराचे प्रतिक आहे. दरम्यान, सकाळी १० वाजता यमाई मंदिराकडे उंट, घोडे, देव सेवकांच्या लवाजम्यासह वाजत गाजत धुपारती सोहळा निघाला.मंदिरात रात्री भजनाचा कार्यक्रम झाला. रात्री १२ .३० वाजता त्रिकाळ आरती करून १ वाजता मंदिराचे दरवाजे बंद केले.भाविकांची दर्शनासाठी गर्दी झाली होती.

# श्री विठ्ठल-रुक्मिणी मातेस पारंपरिक अलंकार

पंढरपूर,ता.१२(प्रतिनिधी)–

**नवरात्रौत्सवानिमित्त श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिरे समितीतर्फे श्री विठ्ठल, श्री रुक्मिणी माता व परिवार देवतांना पारंपरिक पोशाखासह विविध अलंकार परिधान करण्यात आले. रुक्मिणी मातेला पारंपरिक लमाणी पोशाख परिधान करण्यात आला असून, अलंकारांनी सजलेल्या श्रींच्या रूपाचे दर्शन घेण्यासाठी भाविकांची गर्दी होत आहे.**



रुक्मिणी मातेला चिंचपेटी, हिरवी तनमई, भोर, झेला, दशावतारी हार, ठुशी, सोन्या-मोत्यांचे ताणवड, मोत्याचा कंठा, बाजीराव गरसोळी, मोत्याच्या पाटल्या, सोन्याचे बाजूबंद, रुळजोड, पैंजण, वाक्या, कंबरपट्टा व पुतळ्याची माळ असे पारंपरिक अलंकार परिधान करण्यात आले आहे.श्री विठ्ठलाला सोन्याचा मुकुट, बालाजी नाम, कौस्तुभ मणी, शिरपेच, मत्स्यजोड, तोडे, तीन पदरी तुळशीमाळ, तीन पदरी मोहनमाळ, अष्टपैलू मण्यांची कंठी, पुतळ्याची माळ, मोहरांची माळ, चांदीचा मत्स्य व हिऱ्यांचे कंगन परिधान करण्यात आले.

महालक्ष्मी मातेला सोन्याचे गंठण, मोत्याची कंठी, जनक-जनक हार, सूर्यकळ्यांचा हार, लक्ष्मीहार व चांदीची छत्री,सत्यभामा देवीला सिद्धेश्वर टॉप, जवेची माळ, तांबडी चिंचपेटी, पुतळ्यांची माळ, हायकोल व ठुशी तर राधिका मातेला लक्ष्मी टॉप, मोहरांची माळ, जवेची माळ, लक्ष्मीहार व जवमणी पदक परिधान करण्यात आले आहे. श्री व्यंकटेशाला सोन्याचा टॉप, एकदानी, जवेची माळ, तुळशीमाळ व अष्टपैलू मण्यांची कंठी परिधान करण्यात आली आहे.

# श्री चौंडेश्वरी मातेची ब्रम्हचारीणी रुपात पूजा



नवरात्रौत्सवाच्या दुसऱ्यादिवशी श्री चौंडेश्वरी मातेची ब्रम्हचारीणी रुपात पूजा बांधण्यात आली.यावेळी देवीची आरती करताना मानकरी.

इचलकरंजी,ता.१२–

**आदिशक्ती श्री चौंडेश्वरी मातेच्या नवरात्रौत्सवाच्या दुसऱ्यादिवशी मंदिरात श्री चौंडेश्वरी मातेची ब्रम्हचारीणी रुपात पूजा बांधण्यात आली होती.यावेळी भक्ती व चैतन्याने भारलेले वातावरण अनुभवायला मिळाले. समाजातील विविध स्तरातील भाविकांच्या हस्ते श्री चौंडेश्वरी देवीची आरती करण्यात येते.**

सोमवारी श्री चौंडेश्वरी गृहनिर्माण संस्थेतील श्री. व सौ.सरिता महेश तांबे, श्री. व सौ. तेजस्विनी ओंकार फाटक, श्री. व सौ. रेश्मा घनश्याम कोल्हापुरे, श्री. व सौ. सीमा विकास दौंडे, श्री. व सौ. रोहिणी उमेश टकले, श्री.व सौ.श्रावणी प्रतीक ढवळे, श्री. व सौ.कोमल किशोर कांबळे, श्री. व सौ.श्रेया अवधूत सोनटक्के, श्री. व सौ.गौरी अनिल बुचडे, श्री.व सौ.स्नेहल अमर बुचडे, श्री.व सौ. राणी दामोदर भंडारे यांच्या हस्ते आरती झाली.यावेळी पूजा भालचंद्र टाकवडे यांना दुर्गा पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले.

आरतीवेळी विश्वनाथ मुसळे, राजेंद्र सांगले, मधुकर वरुटे, मुरलीधर निमणकर, प्रमोद मुसळे, प्रशांत सपाटे, श्रीनिवास फाटक, आनंदराव साखरे, सचिन भरते, पोपटराव सातपुते, संतोष वरुटे, यश कांबळे, गणेश खेतमर, अरुण बुचडे, सचिन नाकील, माधव चौगुले, महेशराव सातपुते, सुनील फाटक, अरुंधती सातपुते, दीपा सातपुते, शांता कोष्टी,सुशीला फाटक, माया सातपुते, सुवर्णा म्हेतर, सुजाता ठिगळे, सुप्रिया ठिगळे, प्रिती बुगड उपस्थित होते.

## पीव्ही सिंधूला कठीण ड्रॉ

नवी दिल्ली,ता.१२ –

'डेन्मार्क ओपन सुपर ७५०' स्पर्धेत, दोन वेळा ऑलिम्पिक पदक विजेती पी.व्ही. सिंधू भारतीय मोहिमेचे नेतृत्व करताना पहिल्याच फेरीत जागतिक क्रमवारीत अव्वल स्थानी असलेल्या आणि गतविजेत्या आन से-यंगच्या आव्हानाचा सामना करणार आहे. पुरुष गटातही लक्ष्य सेनसमोर कठीण आव्हान असेल. त्याला तिसऱ्या मानांकितचो टिएन चेनचे आव्हान असणार आहे. सिंधूने 'जपान ओपन सुपर ७५०'चे विजेतेपद पटकावले होते.



त्रिमूर्ती नागरी सहकारी पतसंस्थेच्या उद्‌घाटनप्रसंगी सहाय्यक निबंधक चंद्रकांत मगर, सरदार पाटील, संस्थापक अध्यक्ष सागर सागावकर, पांडुरंग सागावकर, सागर चौगले आदी.

# कोतोलीत त्रिमूर्ती पतसंस्थेच्या उद्‌घाटनाच्या दिवशी ५७ लाख ७५ हजारांच्या ठेवी

कोतोली, ता. १२ (प्रतिनिधी) –

**पन्हाळा तालुक्यातील कोतोली येथे नव्याने सुरू झालेल्या त्रिमूर्ती नागरी सहकारी पतसंस्थेचे उद्‌घाटन घटस्थापनेच्या मुहूर्तावर झाले. संस्थेच्या कामकाजाच्या पहिल्याच दिवशी सभासद आणि ग्रामस्थांनी तब्बल ५७ लाख ७५ हजार ५०० रुपयांच्या ठेवी जमा केल्या. पहिल्याच दिवशी मिळालेल्या या प्रतिसादामुळे संस्थेच्या आर्थिक वाटचालीला सुरुवात झाली.**

पन्हाळा येथील सहाय्यक निबंधक (सहकारी संस्था) चंद्रकांत मगर यांच्या अध्यक्षतेखाली उद्‌घाटन सोहळा झाला. पतसंस्थेचे संस्थापक अध्यक्ष सागर सागावकर यांच्या पुढाकारातून संस्थेची स्थापना करण्यात आली आहे. स्थानिक नागरिकांना बचत आणि ठेवींसाठी सहकारी संस्थेचा पर्याय उपलब्ध व्हावा, या दृष्टीने संस्थेच्या कामकाजाला सुरुवात झाली.

यावेळी मराठा महासंघाच्या सहकार, व्यापार व कौशल्य विकास सेलचे जिल्हाध्यक्ष सरदार पाटील यांच्यासह सुनील चौगले, शंकर पाटील, प्रशांत पाटील, अरुण पाटील प्रशांत विठ्ठल पाटील, सागर चौगले, पांडुरंग सागावकर यांच्यासह संस्थेचे संचालक मंडळ, तज्ज्ञ संचालक, सल्लागार संचालक, सभासद, ठेवीदार आणि परिसरातील नागरिक उपस्थित होते.

# खिलार जोडीला १७ लाखांची बोली; मुऱ्हा म्हशींना लाखोंचा भाव

पेठवडगाव,ता.१२(प्रतिनिधी)–

**येथील प्रसिद्ध लक्ष्मी जनावरांचा बाजार सोमवारी उत्साहात झाला. यंदा दुष्काळाची काहीशी झळ बसल्याने व्यापाराचा वेग मंदावला असला, तरी दिवसभरात तब्बल ७ ते ८ कोटी रुपयांची उलाढाल नोंदवली गेली.**

पश्चिम महाराष्ट्रातील या प्रमुख बाजारात कोल्हापूर, सांगली, सातारा, सोलापूर, सांगोला, पुणे आणि सिंधुदुर्ग जिल्ह्यातून शेतकरी, व्यापारी आणि पशुपालकांनी गर्दी केली होती. बाजारात कोसा खिलार, जर्शी जातीचे खोंड, एच.एफ. गायींसह मेहूणा, मेंढा, पंढरपुरी आणि साध्या जातीच्या म्हशींची मोठी आवक पाहायला मिळाली.

बावची येथील शेतकरी

**वडगावच्या लक्ष्मी बाजारात कोट्यवधींची उलाढाल**



नायकू भोसले यांनी आणलेल्या देखण्या खिलार बैलजोडीने सर्वांचे लक्ष वेधून घेतले. त्यांनी २५ लाख रुपये किंमत मागितली होती, तर पुण्यातील अभिजीत दगडे पाटील यांनी १७ लाख रुपयांची उच्चांकी बोली लावली; मात्र शेतकऱ्याची अपेक्षा २१ लाखांची असल्याने हा सौदा होऊ शकला नाही.मिणचे येथील अनिल जाधव यांची तब्बल २० लिटर दूध देणारी मुऱ्हा म्हैस ईश्वरपूरचे विनायक पाटील यांनी २ लाख ५१ हजार रुपयांना विकत घेतली. अनिल जाधव यांच्याच मुऱ्हा जातीच्या तीन जातिवंत म्हशी आम. राजेंद्र पाटील यड्रावकर यांनी ६ लाख १० हजार रुपयांना खरेदी केल्या. कवठेमहांकाळ येथील रंगराव भोसले यांची एच.एफ. गाय अंबपचे विक्रम डोंगरे यांनी १ लाख ७५ हजार रुपयांना खरेदी केली.बाजार समितीच्या वतीने जनावरांच्या बाजाराचे आयोजन करण्यात आले होते. मात्र, दूरवरून आलेल्या मुक्या जनावरांसाठी पुरेशा चारा-पाण्याची व्यवस्था करण्यात बाजार समिती अपयशी ठरली. कडक उन्हात जनावरांना पाणी न मिळाल्याने शेतकऱ्यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली. या संदर्भात प्रशासनाकडे विचारणा केली असता अधिकाऱ्यांकडून उडवाउडवीची उत्तरे मिळाल्याचा आरोप शेतकऱ्यांनी केला.दरम्यान, वडगाव पोलीस ठाण्याच्या नियोजनामुळे बाजार परिसरातील वाहतूक व्यवस्था सुरळीत राहिली.


हार्दिक अभिनंदन....शुभेच्छा..!



मा.श्री. उदय बबनराव बुगड  मा.श्री. जयेश उदय बुगड

आमचे स्नेही मा.श्री. उदय बबनराव बुगड यांना वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा..! तसेच मा.श्री. जयेश उदय बुगड यांची भारतीय जनता पार्टीच्या महाराष्ट्र प्रदेश सचिवपदी निवड झालेबद्दल हार्दिक अभिनंदन...! त्यांच्या भावी कार्यास शुभेच्छा..!

▪ संजय महादेवराव कांबळे ▪

नगरसेवक, इचलकरंजी महानगरपालिका



हार्दिक अभिनंदन....शुभेच्छा..!



मा.श्री. उदय बबनराव बुगड  मा.श्री. जयेश उदय बुगड

आमचे भाऊजी मा.श्री. उदय बबनराव बुगड यांना वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा.
तसेच आमचे भाचे मा.श्री. जयेश उदय बुगड यांची भारतीय जनता पार्टीच्या
महाराष्ट्र प्रदेश सचिवपदी निवड झालेबद्दल हार्दिक अभिनंदन...!
त्यांच्या भावी कार्यास शुभेच्छा..!

▪ शैलेंद्र शंकरराव सातपुते ▪ अभिजीत शंकरराव सातपुते

समस्त सातपुते परिवार, इचलकरंजी